साप्ताहिक
# माणूस
१४ जानेवारी ८४ / दोन रुपये

पानवलकर
तेंडुलकर
निहलानींचा

## अर्ध सत्य

परिक्षण
मुलाखती
प्रेक्षकचर्चा



## मुंबईत मराठी माणसाचं स्वच्छीकरण!

साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : तेविसावे

अंक : तेहतिसावा

□

१४ जानेवारी १९८४

किंमत : दोन रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेघा राजहंस

□

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

। पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ

संजय पवार



# मुंबापुरी

मनाला परम संतोष होऊन जीवनमूल्यांवरची श्रद्धा पालवून जावी, अशा काही घटना गेल्या आठवडयात घडून गेल्या. उदाहरणार्थ फिल्मोत्सवाच्या उद्‌घाटनसोहळ्याला झीनत अमान साडी नेसून आल्या होत्या. अगदी चक्क साडी हं ! अन तीही 'सत्यं शिवं सुंदरम्' मधली साडी नव्हे तर अगदी सोज्ज्वळ, कौटुंबिक जिव्हाळ्याच्या नाटकात आशा काळे नेसतात ना तशी लफ्फेदार साडी ! झीनतने मंचावर प्रवेश घेऊन टाळ्या मिळवल्या त्या काही उगाच नव्हे. झीनत एकदम जंटलमेन दिसत होती म्हणून पब्लिक खुश झालं. झीनत मूळची सोज्ज्वळ अन् कुलवानच आहे. ह्या मेल्या पत्रकारांनी तिला बदनाम केलंय, आपल्या शालिनीताईंना केलं तसं,

आम्ही म्हणतो शालिनीताईंनी घातला असेल सलवार–कमीज, म्हणून काय बिघडलं ? उद्या वसंतदादाही नवा पोषाख पेहनून मंत्रालयात येतील. कपडयावर काय माणसाचं चरित्र अन् चारित्र्य ठरत नाही असं बर्नार्ड शॉ म्हणालाय असं इंद्रायणी सावकारांनी शालिनीताईंना सांगून त्यांची समजूत काढली म्हणतात. असो. मात्र शिवरायाच्या काळात बायकांना (खास करून दमा झालेल्या बायकांना) सलवार कमीज घालण्याची मुभा होती का याची शास्त्रीय चर्चा एकदा व्हायला हवी. एरवी, शालिनीताईंनी सलवार–कमीज घालताना अजिबात संकोच करू नये. त्या एकदम तरुण दिसतात अन् तारुण्य हेच देवाचं देणं आहे.

□

आता आमचे मोरारजीकाका देसाईच पाहा ना, अजून किती तरुण अन् सणसणीत आहेत. एक तारखेला जनता पक्ष कार्यकर्त्यांच्या मेळाव्याला गेले तर तिथे वाजपेयींवर तोफ डागली. एकदम अँग्री यंग मॅनच्या थाटात ते ज्या पक्षात आहेत त्या पक्षाला सुरकुत्या पडल्या आहेत; पण मोरारजी अजून किती यंग वाटतात !

तसेच आमचे चरणसिंग, परवा मुंबईत आले अन् 'सेंटॉर'मध्ये पत्रकारांशी गप्पा मारून गेले. आम्हाला परम संतोष झाला. चरणसिंग खरं तर एक साधा, सालस, कष्टाळू शेतकरी; पण हल्ली भारतात शेतकऱ्यांची स्थिती इतकी सुधारलीये की चरणसिंग 'सेंटॉर'मध्ये पत्रकार-परिषद घ्यायला लागले. शेतकऱ्यांना असेच बरे दिवस लवकर येवोत !

तळागाळातल्या लोकांना अन् गोरगरिबांना बरं वाटावं अशी दुसरी घटना म्हणजे अंतुल्यांच्या मुलीचं लग्न. या लग्नाला सत्तर हजार प्लेट कुल्फीची ऑर्डर पारशी डेअरीला देण्यात आली होती म्हणतात. म्हणजे हा लोकशक्तीचा विजय आहे, हो की नाही ? अंतुल्यांच्या मुलीच्या लग्नाला राष्ट्रपती झैलसिंग, पी. व्ही. नरसिंहरावपासून ते थेट कोकणातल्या तळागाळातल्या कष्टकरी लोकांपर्यंत सगळे येऊन गेले. आता अंतुले सामाजिक क्रांतीच्या दिशेनं पहिलं पाऊल टाकण्यास सिद्ध झाले आहेत. आता फक्त मंत्रालयातल्या सहाव्या मजल्यावरची 'ती' खोली मिळाली की पुरे. हे सगळं वाचून–ऐकून ज्याला परम संतोष होणार नाही तो कपाळकरंटा !

□

## श्रवणीय भाषण

वेगवेगळ्या राज्यांतील विधानसभा, विधानपरिषद आणि नगरपालिका यांच्या सभापतींची गेल्या आठवडयात मुंबापुरीत बैठक भरली होती. ह्या परिषदेच्या शेवटी मुंबई महानगरपालिकेने या सर्व सदस्यांचा

कमला नेहरू उद्यानात भव्य सत्कार केला. त्याला लोकसभेचे सभापती बलराम जाखर प्रमुख पाहुणे होते. जाखर उंचीने एवढे आहेत की, महापौर बेदीचा फेटा त्यांच्या हनुवटीला लागतो.

मुंबापुरीचे नवे शेरीफ, नगरसेवक, वेगवेगळ्या पक्षाचे पुढारी आणि परदेशी वकिलातीतील अधिकारी ह्यांच्या उपस्थितीत हा समारंभ सायंकाळी सहा वाजता सुरू झाला.

सुरुवातीस मराठीशी थोडी झटापट करून महापौरांनी भाषण इंग्रजीत वाचायला सुरुवात केली. जाखर मात्र अस्खलित हिंदीत बोलले. सभा पाहिली की, सभापतीना उत्साह चढत असावा. कारण त्यांनी तब्बल पाऊण तास भाषण ठोकले. भाषणात त्यानी लोकशाहीची मुळे मजबूत करणे वगैरे सारख्या नेहमीच्याच झाडाझुडपांच्या गोष्टी सांगितल्या, परंतु हिंदी, पंजाबी आणि संस्कृत वचनांच्या अधूनमधून केलेल्या पेरणीमुळे भाषण मात्र श्रवणीय झाले.

या समारंभास अनपेक्षितपणे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील आणि कर्नाटकातील जनता पार्टीचा थरकाप उडविणाऱ्या त्यांच्या पत्नी वीरांगना शालिनीताई ह्याही आल्या. दादा थोडाच वेळ बसले आणि जाताना शालिनीबाईंना बरोबर घेऊन गेले. जाखरसाहेबाचे लोकशाहीवरचे विचार बाईंना रुचले नसावेत !

¤

सुट्या पैशाच्या अभूतपूर्व टंचाईमुळे बेस्टने सुरू केलेली कुपने ही सध्या मुंबापुरीतील चर्चेचा विषय झालेली आहेत. पु. बा. केरकरांनी म्हणे एकूण तीन कोटी रुपयांची कुपने छापली आहेत. त्यापैकी आतापर्यंत केवळ पाच ते सात लाख रुपयांच्या कुपनांची विक्री झालेली आहे यातच पुन्हा काही कुपने वेगळी दिसत असल्याने हा मुद्रणदोष आहे की, खोटी कुपने बाजारात आली आहेत अशी शंकाही निर्माण झालेली आहे.

एक जानेवारीला ही कुपनांची पद्धत सुरू झाली आणि नेमक्या याच दिवसापासून अचानक बेस्टच्या कॅश कलेक्शन डिपार्टमेन्टमधील ४३० कारकून संपावर गेले. ह्या कुपनांच्या पद्धतीमळे त्यांना नेहमी मिळणाऱ्या इन्सेटिव्हमध्ये घट होईल असे त्याचे म्हणणे होते. बेस्टच्या केरकरांची मात्र ह्या संपामुळे भर रस्त्यात टायर पंक्चर झाल्यासारखी अवस्था झाली ! असो.

मुंबई महानगरपालिकेत बऱ्याच नगरसेवकांनी ह्या नव्या पद्धतीवर खरपूस टीका केली. जनता पार्टीचे शरदराव म्हणाले की, ज्या सरकारला साधी सुटी नाणीही पुरविता येत नाही त्यांनी ओंजळभर पाण्यात जीव द्यावा ! यावर महापालिका आयुक्त द. म. सुखटणकरांनी सर्वांना सुनावले की, इतके पाणी महापालिका सरकारला पुरवू शकणार नाही!

¤

महापालिकाआयुक्त द. म. सुखटणकर आणि बॉम्बे टेलिफोन्सचे महाव्यवस्थापक जोहारी याचा डिसेंबर ते जून हा फेअर सीझन (fair season) सुरू झाला असल्याने मुंबापुरीत आता रस्तोरस्ती, गल्लोगल्ली खड्डे खणून ठेवण्यात आलेले आहेत वाहने आणि पादचारी ह्यांच्या दृष्टीने मात्र हा 'अनफेअर' सीझन समजला जातो.

—विष्णू जयदेव

# फिल्मोत्सव — ८४

## ३ तारखेची चमकती संध्याकाळ

'मेट्रो' चित्रपटगृहाचं आवार—रंगीबिरंगी गर्दीनं फुलून आलेलं. गाड्या सुळकन् येत होत्या. देशी-परदेशी चित्रपटसृष्टीतील विविध कलाकार उतरत होते आणि क्षणार्धात 'मेट्रो'च्या आतल्या बाजूला केव्हाच गुप्त होत होते. आपल्या आवडत्या कलाकाराना पाहायला 'मेट्रो'च्या आवारात गर्दी करून दाटीवाटीन उभे राहलेले चित्रपट-शौकीन या कलाकारांच्या तेवढ्या चुटपुटत्या दर्शनावरही खूष होते. निळ्या चमचमत्या चुणीदारमध्ये आलेली पूनम, सपत्नीक आलेला राजेंद्रकुमार, १० ते ५ ऑफिसमध्ये जाणाऱ्या माणसाप्रमाणे साधीशीच शर्ट-पॅंट घालून आलेला ओम पुरी, डोक्याचा तुळतुळीत गोटा करून आलेला अमरीश पुरी, पांढऱ्या शुभ्र झब्बा-पायजमात आलेला गुलजार, पांढराशुभ्र सलवार—कुर्ता आणि खांद्यावर शाल घेऊन आलेला संजीवकुमार... एकेक कलाकार येत होते आणि बाहेरच्या गर्दीला किती पाहू आणि किती नको असं होऊन गेलं होत; पण चित्रपटमहोत्सवासाठी आलेली अनेक लाल-गोरी आणि निळ्या डोळ्यांची माणसं पाहून प्रत्येक वेळेस राजकपूर आला, राजकपूर आला, अशी ओरड व्हायची आणि परदेशी पाहुणे कुणाच्याच ओळखीचे नसल्यानं प्रत्येक वेळेस या गर्दीची निराशाही होत होती. शेवटी घड्याळाचा काटा सहाकडे झुकत असतानाच निळ्या सुटातला, निळ्या डोळ्यांचा राजकपूर आला आणि मग मात्र उसळलेल्या गर्दीला थोपवता थोपवता पोलिसाना नाकी नऊ आले.

गुलाबपाण्याच्या थंडगार हलक्या शिडकाव्यानं आणि टपोऱ्या गुलाबकळीच्या भारदस्त स्वागताचा स्वीकार करत एकेक निमंत्रित आत येत होते आणि बघता बघता 'मेट्रो'चे प्रेक्षागृह 'हाउसफुल्ल' झालं !

चित्रपटमहोत्सवाच्या कार्यक्रमाचं संचलन करत होता झब्बा, पायजमा, शाल या पोशाखातला अमोल पालेकर आणि हिरवीकंच घागरा-चोळी ल्यायलेली झीनत अमान. अमोल हिंदीत आणि झीनत फड्या इंग्लिशमध्ये. नव्या वर्षाच्या शुभकामना देत अमोल पालेकरनं कार्यक्रमाला सुरुवात केली. नंतर चित्रपटमहोत्सवाचे संयोजक विरेन ल्यूथर, फिल्म फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष श्रीराम बोहरा याची भाषणं झाली. त्यानंतर दीप प्रज्वलित करून राजकपूरनं महोत्सवाचं उद्घाटन केलं यासाठी हातात दिव्याचं तबक घेऊन निळी—जांभळी नऊवारी साडी, नाकात नथ, गळ्यात वज्रटीक, डोक्यावरून पदर अशा रोहिणीन ('गांधी' फेम रोहिणी हट्टंगडी) खास महाराष्ट्रियन वेशात स्टेजवर येऊन महोत्सव मुंबईत भरत असलेल्या प्रसंगाचं औचित्य साधलं. राजकपूरनं जितका वेळ भाषण करणं आवश्यक होतं तितकाच वेळ भाषण करून फारस

बोअर केलं नाही त्यानंतर सूचना व प्रसारणमंत्री एच. के. एल. भगत यांचं भाषण झालं.

देशी–परदेशी पाहुण्यांची ओळख करून देण्याचा कार्यक्रम (बहुतेक) आयत्या वेळेस ठरवलेला; पण तरीही अनपेक्षितपणे रंगला. बहुतांशी परदेशी कलाकारांनी भारतीय पद्धतीनुसार 'नमस्कार' करून कार्यक्रमास उपस्थित प्रेक्षकांची मनं जिंकून घेतली. आपल्याकडच्या ओम पुरी, अमरीश पुरी, शबाना आझमी वगैरे कलाकारांनी जास्तीत जास्त टाळ्या घेतल्या; पण खास महोत्सवासाठी म्हणून आलेल्या मुमताजनं मात्र आपल्याकडच्या साऱ्या कलाकारांना कानामागून आली आणि तिखट झाली–चा अनुभव दिला. साहजिकच या अनपेक्षित पण गोड धक्क्यानं पांढऱ्याशुभ्र साडीतली मुमताज रंगमंचावर येताच टाळ्यांचा एकच कडकडाट झाला. कलात्मक चित्रपटांसाठी म्हणून प्रसिद्ध असलेले स्मिता पाटील, नसीरुद्दीन शाह, दीप्ती नवल या कलाकारांची अनुपस्थिती सगळ्यांनाच जाणवली. महोत्सवात सामील झालेल्या चार हिंदी चित्रपटांपैकी तीन हिंदी चित्रपटांचा ( मंडी, खडहर, जाने भी दो यारो) नायक असलेल्या आणि १९८३ साल गाजवणाऱ्या नसीरुद्दीननं न येऊन प्रेक्षकांची चांगलीच निराशा केली.

कार्यक्रम संपल्यानंतर मृणाल सेन याच्या 'खंडहर' चित्रपटाचं प्रदर्शन झालं.

¤

## मृणाल सेनची एकजीव परिपक्व कृती

शहरापासून दूर... म्हणजे जेथे एसटीही जात नाही अशा एका 'खंडहरा' पाशी ते तिघे मित्र सुट्टीसाठी जातात. अगदी दोन–तीन दिवसांकरिता. केवळ रोजच्या यांत्रिक, शहरी जीवनापासून थोडा मोकळेपणा मिळावा, हुंदडता यावं, मौज–मजा करावी आणि परत यावं या माफक अपेक्षेने.

त्या तिघांतील एक फोटोग्राफर, तर दुसरा असाच गप्पिष्ट, थोडासा कामसू व फुटकळ बडबड्या, तर तिसरा थोडा वेगळा, माहितगार. ज्या ठिकाणी ते जाणार असतात त्या ठिकाणाशी नातं असणारा. तेथे त्याच्या पूर्वजांचा पडका वाडा.

रानावनातून बैलगाडीचा प्रवास केल्यानंतर रात्री ते त्या ठिकाणी येतात. मुकादमाने थोडीफार व्यवस्था केल्यानंतर ते थकलेले शहरी युवक झोपी जातात आणि सकाळी उठून पाहतात तर समोर असतो एक उध्वस्त पडका वाडा. काहीसे अचंबित चेहरे करून ते तो परिसर बारकाईने न्याहाळतात. प्रचंड दगडी भिंती, कमानी, उंच–उंच जाणारे पण तुटलेले– अर्धवट तुटलेले खांब, त्यातच अधून–मधून उगवलेली झाडे-झुडपे, कोणे एके काळी त्या गावात मलेरियाची साथ आली. बरेच जण दगावले, काही निघून गेले म्हणून आज ही अवस्था. सर्वच परिसर उध्वस्त पण प्रेक्षणीय. तिघांचे मन हरपते तर फोटोग्राफरला त्याचे 'पॅरेडाईज' सापडते.

पण या उध्वस्त नंदनवनात आणखी एक पडका वाडा असतो आणि त्यात दोन स्त्रिया राहत असतात. अगदी एकाकी. त्यातील एक ७० वर्षांची वृद्धा, अंध, त्यात अर्धांगवायू झालेली. जवळजवळ पडूनच. पडून कसली म्हणा या कुशीवरून त्या कुशीवर वळायला तिला मदत घ्यावी लागते. तर दुसरी तिची मुलगी. अशीच विशी–बाविशितील. चेहरा मलूल, कोमजलेला. दोघींच्या चेहऱ्यांवर त्या वाड्याप्रमाणेच एकाकीपणाचे, उध्वस्तपणाचे ठसे. एक केव्हा जीव सोडेल सागता येत नाही तर तिने जीव सोडल्यावर दुसरीचे भवितव्य काय तेही सांगता येत नाही.

पण त्या दोघींसाठी एक सलता फ्लॅशबॅक–कोणा एका निरंजनशी त्या मुलीचा विवाह ठरलेला असतो. तसे आश्वासन देऊन तो परगावी गेलेला असतो. तो अद्याप परत आलेला नसतो– खरं तर हा त्या वृद्धेचा समज असतो. तसे निरंजनचे लग्न झाले असल्याचे त्या मुलीला माहीत असते; पण हे सांगितले तर... नाही या धक्क्यानेच ती माय जीव सोडेल, या भीतीपोटीच तिने त्याबद्दल मौन पाळलेले असते. त्यामुळे त्या वृद्धेला तो परत येईल अशी आशा असते, तर तिला सारंच माहीत असतं. हाच फ्लॅशबॅक त्यांचं एकाकी जीवन उध्वस्त करत असतो.

ते तिघे आल्याची कुणकुण त्या वृद्धेला लागते. त्यातील तो तिसरा दीपू तिचा लांबचा पुतण्या का कोणी तरी असतो. तिला वाटतं दीपूबरोबर निरंजन आला आहे. दीपूला घरी बोलाविण्यासाठी ती तिच्या मुलीकडे, जामिनीकडे आग्रह धरत असते; पण निरजन येणार नाही हे माहीत असणारी जामिनी हे उसने बोलावणे सातत्याने टाळत असते. कितीही झालं तरी तो फ्लॅशबॅक तिलाही क्लेशदायक असतो.

अखेर जामिनीच्याच सागण्यावरून दीपू एकदा तिच्या घरी येतो. सहजच म्हणून बरोबर तो फोटोग्राफर–मित्रही असतो. ती वृद्धा दीपूबरोबर निरंजनच आला आहे असे समजून आपली व्यथा बडबडू लागते. तिघेही गप्प असतात. कोणीच तिला प्रतिसाद देत नसते. अखेर जिवाच्या आकांताने ती 'निरंजन निरंजन' असा पुकारा करते तो फोटोग्राफर त्या वृद्धेची दशा बघून तिला प्रतिसाद देतो. 'हो मी निरजन आहे' असे म्हणतो आणि पुढे तो फक्त वृद्धेच्या आशा–आकांक्षांना गोंजारतो.

बस त्या वृद्धेने हेच स्वप्न जपलेले असते आणि ते तिला मिळालेले असते. ती शांत होते; पण तो तिचा आभास असतो, देखावा असतो. परिस्थितीने लादलेला. न बोलता ते दोघे परततात. त्याच्या 'हो' म्हणण्यावरून त्या तिघातही धुस-फुस होते.

सुट्टी संपत आलेली असते. तो फोटोग्राफर जमेल तेवढा परिसर कॅमेऱ्यात टिपण्याच्या निमित्ताने भटकत असतो. त्या भटकंतीतच दोनदा–तीनदा त्याची जामिनीशी गाठ पडते. क्वचित नजरभेट होते. थोडंफार बोलणंही होतं. तेसुद्धा एकमेकाला सावरण्याचे. दोघांनाही चुकल्या–चुकल्यासारखे होते. पण कुठं तरी दोघानाही जखम झालेली असते.

सुट्टी संपते. तो तिचा एक 'फोटो' काढून ते तिघेही आल्या पावली शहरी परततात. तो पडका वाडा, ती उध्वस्त मनं; तो सलता फ्लॅश बॅक सारं काही अधिक गडद करून ते तिघे निघून जातात आणि पुन्हा आपल्या कामात मग्न होतात. त्या तरुणीचा त्या 'खंडहरा'शी एकरूप झालेला फोटो त्या फोटोग्राफरच्या केबिनमध्ये असतो एवढेच !

फिल्मोत्सव–८४ च्या उद्घाटनाचे मुख्य आकर्षण बनलेला मृणाल सेनचा 'खंडहर' हा हिंदी चित्रपट या दोन वेगळ्या विश्वांना

काही क्षणांपुरते आमने-सामने उभे करतो. एक ती आई-मुलगी यांचे विश्व...त्या 'खडहर' प्रमाणेच साऱ्या जगापासून अलिप्त, एकाकी, उदास, भग्न...तर दुसरे ते शहरी युवक. त्याना त्या दोघीचे औदासिन्य, उध्वस्तपणा जाणवतो पण ते काही करत नाहीत किंवा काही करू शकण्याची त्याच्यात ताकद नसते.

त्या तरुणीच्या छायाचित्राच्या निगेटिव्हचे पॉझिटिव्हमध्ये रूपांतर करत असताना त्या फोटोग्राफरला आठवलेल्या फ्लॅशबॅक'च्या निमित्ताने हा चित्रपट सपूर्णत: उलगडत जातो.

एरवी 'गिमिक्स'च्या तंत्राचा वापर, तथाकथित राजकीय चित्रपटासाठी मशहूर असलेल्या सेन याचा हा अगदी वेगळ्या पठडीतला चित्रपट. तसा सेन याच्यात गेल्या काही वर्षांत एक मोठा बदल जाणवत आहे. 'भूवन शोम'चा अपवाद वगळता त्यानतरची काही वर्षे त्याच्या चित्रपटात वृत्तपत्रीय मथळ्याचेच राजकारण प्रतिबिंबित झालेले दिसते आणि तेही त्या मथळ्याइतकेच टिकाऊ, काहीसे टाकाउही. पण अलिकडच्या काळात त्याच्या चित्रपटात स्वत:ची स्वतंत्र शैली निर्माण करण्याचा अट्टाहास दिसत नाही. त्याचे अलिकडचे चित्रपट पूर्णत: परिपक्व अशा सिनेमाच्या भाषेत बोलू लागले आहेत आणि त्यालाही दूब मिळाली आहे. त्यांच्यातील अलीकडच्या या बदलाबाबत 'गार्डियन'चा प्रसिद्ध चित्रसमीक्षक डेरेक माल्कम म्हणतो– 'His newer film's are the magnificent example of a control & restraint we were beginning to think he might not possess' आणि याच प्रकारची संयमित हाताळणी याही चित्रपटात दिसते. त्या तिघाना आलेला 'अनुभव' जसाच्या तसा अचूक आणि जिवतपणे सेन यानी पकडला आहे.

पटकथेच्या बांधणीतही नवलाई दिसते. तसा बैलगाडीचा प्रवास बिमल रायच्या 'देवदास'मधील त्या प्रसिद्ध दृश्यांची आठवण करून देतो तर मूळ कल्पनेतच सत्यजित रे च्या 'अरण्येर दिन-रात्री'ची आठवण होते. मुकादमाच्या मुलीची व्यक्तिरेखा व त्या फोटोग्राफरला एका जुनाट चित्राच्या निमित्ताने नववधूच्या वेषात जामिनी दिसते ते दृश्य एखाद्या व्यावसायिक हिंदी चित्रपटाची आठवण करून देते. (सदमा पाहिला असेल तर आठवेल) पण ही काही ठिसूळ, अनावश्यक व मोजकी ठिगळ वगळता सपूर्ण चित्रपटात सेन याची राजकीय, सलग अशी 'सिनेमॅटिक' परिपक्वता प्रतीत होते.

पाच-सहा व्यक्तिरेखांमध्येच फिरणाऱ्या या चित्रपटात जामिनी बनलेली शबाना आझमी, तिची आई गीता सेन आणि फोटोग्राफर बनलेला नसीरउद्दीन शहा याना तर नेमकी व्यक्तिमत्त्व सापडली आहेत काय इतपत त्यानी आपला अभिनय केला आहे. गीता सेनने असहाय वृद्धत्व, म्हातारपणची दमछाक करणारी बडबड त्यातील सुस्काऱ्यासह उभी केली आहे. केवळ चेहरा आणि आवाज यानाच वाव असलेल्या या भूमिकेत त्यानी अगदी पडल्या-पडल्या सहजपणे अभिनय केला आहे. तर उदास, कोमजलेली तरीही संयम ठेवणारी जामिनी शबानाच्या मिताभिनयात उभी राहते. नसिरउद्दीन तर सर्वार्थाने परिपक्व अभिनेता. गेल्या वर्षातील 'बेजुबान' व फिल्मोत्सवातील 'खडहर' आणि 'जाने भी दो यारो' या तिन्ही चित्रपटात त्याच्या वाट्याला फोटोग्राफरचीच भूमिका आलेली आहे. एक काहीशी व्हिलनीश तर दुसरी भुरटा फोटोग्राफर विनोदी, तर 'खडहर'मध्ये काहीसा सवेदनक्षम गभीर, सूचक पण अबोल. या तिन्ही भूमिकात त्याच्यातील विविध क्वालिटीज् दिसतात. विविधागी व्यक्तिरेखेला भिडण्याची त्याची समज, ताकद दिसते. या शिवाय 'खंडहर'मधील ते दोघे मित्रही लक्षात राहतात. त्यातला फुटकळ बडबड्या उध्वस्ततेत 'रिलीफ' वाटला तरी अनावश्यक वाटत नाही.

पण या व्यक्तिरेखांवर अंमल गाजवते ते व्यक्तीमत्त्व म्हणजे कॅमेरामन के. के. महाजन. सपूर्ण परिसरच त्याच्या कॅमेऱ्यातून बोलका

---

आकाशवाणी ऑडिटेरियममध्ये 'खंडहर' दाखविण्यात आला. विशेष म्हणजे बाहेर हाउसफुल्लचा बोर्ड झळकत होता. तसे यंदाच्या फिल्ममहोत्सवात दहा-बारा चित्रपटगृहांपैकी काही दोन-तीन चित्रपटगृहे वगळता तिकिटे सहजगत्यां मिळतात. कदाचित दिल्लीसारखे अश्लीलतेचे 'कोड-कौतुक पुरविणारे चित्रपट यंदा कमी...यंदा म्हणजे 'फोकस ऑन थर्ड वर्ल्ड'ते कोण पाहणार !! आणि हो, आपापले भाषिक कानडी, मल्याळी, तेलगुला गर्दी करतात; पण 'मणिपुरी' कोण पाहणार ? फिल्मोत्सवाचे मुख्य स्थान त्या 'मेट्रो'लाही रिकाम्या खुर्च्यांना हे चित्रपट बघावेच लागतात !

असो. 'खडहर'च्या वेळी एक मजेदार घटना घडली. मृणाल सेन आपली पत्नी गीता सेन व निर्माते यांच्यासह पहिल्या रांगेत बसले होते; पण त्या खुर्च्यांची तिकिटे विकत घेतलेल्या प्रेक्षकांनी 'डोअरकीपर'ला सांगून त्या तिघाना उठविले.

अर्थात मृणालचे व्यक्तिमत्त्वही तितकेच साधे 'हा कोण उपटसुंभ बसला' असं म्हणण्याइतके. चुस्त पायजमा आणि लांबसडक छब्ब्यातले हे बंगाली व्यक्तिमत्त्व एका कोपऱ्यात उभे होते आपल्या सत्काराची वाट पाहात. आतरराष्ट्रीय महोत्सवात ज्याचे स्वागत टाळ्यानी होते ते व्यक्तिमत्त्व किती 'ग्लॅमरलेस' याची जाणीव झाली.

अर्थात 'फस्टिव्हल'ला ग्लॅमर आले होते ते पहिल्या दिवशी सजीवकुमार, शशीकपूर, जीनत अमान यासारख्या चदेरी ताऱ्यामुळे. नाही तर आपल्याकडचे नव सिनेमावाले व आंतरराष्ट्रीय चित्रपटात ज्याना मानाचे स्थान आहे असे काही दिग्दर्शक व इतर मडळी 'मेट्रो'च्या परिसरात अगदी सामान्य प्रेक्षकासारखे रेंगाळताना दिसतात. त्यातल्या त्यात 'आद्य शंकराचार्य' या पहिल्या सस्कृत चित्रपटाचे दिग्दर्शक आय. व्ही. अय्यर लक्ष वेधून घेतात ते त्यांच्या अनवाणीपणामुळे.

'खडहर' च्या वेळी झालेल्या सत्काराला मृणालने अगदी थोडक्यात उत्तर दिले. ते म्हणाले, 'तुम्ही माझ्यासारख्या फ्लॉपमेकरच्या चित्रपटाला 'हाउस फुल्ल' चा बोर्ड लावून नसते संकट ओढवून घेतले आहे. त्यामुळे तुम्ही मला पुन्हा आणखी एक फ्लॉप चित्रपट निर्माण करण्याचा उत्साह दिला आहे. त्याबद्दल तुमचा ऋणी आहे !

□

होतो. खऱ्या अर्थाने त्यालाही 'फोटोग्राफर्स पॅरडाईज' मिळाल्याचे जाणवते. त्याच्या सच पण प्रवाही व तितक्याच सुगम कॅमेऱ्याच्या हालचाली 'खडहरा'चा आवाका लक्षात घेऊन दिवसाचे व विशेषत: रात्रीचे लाइटिंग, काही उत्कृष्ट अँगल्स यामुळे मृणालच्या कल्पनेत विश्व व्यक्त होण्यास बरीच मदत झाली आहे -

प्रामुख्याने बंगाली भाषेत चित्रपट काढणाऱ्या सेन यांचा हा चौथा हिंदी चित्रपट १९६९ मध्ये भुवन शोम'ने समातर सिनेमाची चळवळ सुरू केली. आता 'खंडहर' त्या चळवळीला बॉक्सऑफिसवर पाय रोवण्यास मदत करतो का ते बघू या !

— सतीश जकातदार

## मुक्काम कोल्हापूर

# तर्कतीर्थांची व्याख्यानं

डॉ. भा शं. भणगे हे शिवाजी विद्यापीठाचे तिसरे कुलगुरु होते; पण त्यापूर्वीपासूनच त्याचा कोल्हापूरशी जवळचा संबंध होता. कोल्हापुरातल्या कॉमर्स कॉलेजचे ते पहिले प्राचार्य. मुंबई व कोल्हापूर पर्यायाने महाराष्ट्रातल्या शिक्षणक्षेत्रातलं कै. भणगे हे एक मोठं व्यक्तिमत्त्व होतं. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ इथल्या कॉमर्स कॉलेजनं या वर्षीपासून व्याख्यानमाला सुरू केली. पहिल्या वर्षी या व्याख्यानमालेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यानी तीन व्याख्याने दिली. महाराष्ट्रातल्या एका अग्रगण्य विचारवंतानं केलेलं जागतिक, राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचं विश्लेषण इथल्या लोकाना फार हलवून गेलं नाही; पण मूलभूत गोष्टीचा ऊहापोह सुद्धा आजकाल चागलाच.

१९८४ साल उजाडलं तेव्हापासून आणि डिसेंबर ८३ च्या शेवटापासून जिकडे-तिकडे जॉर्ज ऑरवेलच्या दोन्ही जगप्रसिद्ध कादंबऱ्या पुन:पुन्हा चविष्टपणे वाचल्या जात आहेत. विशेषत: '१९८४' तर सध्या तेजीत आहे. एकूणच रशिया आणि तिचं अवलोकन याला आज महत्त्व आहे. युनेस्कोत वा अलिप्त राष्ट्रांच्या परिषदेत रशियन राजनीती थोडी शिरजोर दिसते आणि अशा वेळी त्यासंबंधातील विषय लोकांना इंटरेस्टिंग वाटतात.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीच्या तीन व्याख्यानाचे विषय साम्यवादी क्रांतीनंतरचे जागतिक राजकारण, दुसऱ्या महायुद्धानंतरच्या तीन राजकीय प्रवृत्ती आणि स्वातंत्र्योत्तर भारतातील बदलते राजकीय प्रवाह असे होते. पहिल्या दोन्ही विषयांत साम्यवाद, मार्क्स, लेनिन, माओ यांचे संदर्भ अपरिहार्य आणि तिसरा भारताच्या संदर्भातला विषय. तुलनात्मकदृष्ट्या पहिली दोन्ही व्याख्यानं अधिक रंगली. भारतीय परिस्थितीच्या विश्लेषणाबाबत मला असं वाटतं की, आपल्यामध्येच इतके विचारप्रवाह आहेत की, तर्कतीर्थांच विवेचन हे प्रभावी त्यामुळेच वाटलं नसणार.

### साम्यवादामागचा अर्थ

साम्यवादी राज्यक्रांतीनंतरचे जागतिक राजकारण या विषयात मार्क्स आणि मार्क्सचं यशापयश यावरच त्यांच बोलणं एक सूत्र ठेवून होतं. मार्क्स एकदा म्हणाला, For God's sake Marx himself is not a marxist. मार्क्सच्या अनुयायानी मार्क्सवादाची जी प्रगती वा अधोगती केली त्यासंबंधानही ते बोलले. अखेर प्रत्येक सिद्धांताला काही मर्यादा असतात हे मार्क्स जाणून होता. म्हणून तो तसं म्हणाला. साम्यवादी .राजकारणातही गरीब गरीब होत गेला आणि गब्बर आणखी गब्बर होत गेला. गबर आणि गरिबांच्या लढ्यात अर्थातच गबरांची सत्ता स्थापन होते. अशा वेळी मार्क्सनं विग्रह नष्ट करायचा प्रयत्न केला. मार्क्सनं बनवलेली मोठी कामगिरी म्हणजे Utopia ( जी कुठंच नाही अशी स्वप्ननगरी वा नंदनवन ) चित्रित करण्याचे जे समकालीन प्रयत्न होते त्याला त्यानं जोडलेला शास्त्रीय भाग. न्यूटन वा कार्यकारणभावासारखे तर्क म्हणूनच प्रकाशझोतात आले. मार्क्सच्या या अर्थकारणावर आधारित अशी रशियन राज्यक्रांती जेव्हा झाली तेव्हा टिळकही हादरले होते. 'चातुर्वर्ण्याशिवाय समाज ?' असा त्यांचा सवाल हा कालसुसंगतच होता; पण विज्ञानदृष्टीतून झालेल्या साम्यवादी क्रांतीनंतरचं चित्र वेगळंच होतं. एकपक्षीय सत्ता, विचारस्वातंत्र्याची मुस्कटदाबी, खाजगी मालक नाही; पण सामुदायिक संस्थांची झुंडशाही, कामगाराच्या नावावर काही मोजक्या लोकानी चालवलेलं राज्य ही परिस्थिती साम्यवादी देशात निर्माण झाली आणि एक लक्षणीय गोष्ट घडावी ती म्हणजे साम्यवादी देशाचा 'राष्ट्रवाद'. स्वत.ला नेता नव्हे तर शिक्षक मानणारा मार्क्स Manifesto of Communist या पुस्तकात 'Workers of the World Unite' असा पुकारा साम्यवादाच्या प्रेरणेतून देतो; पण अखेर चीनमधला कामगार हा चीन राष्ट्राचा व रशियातला रशियन आणि त्यातही कडवेपणात इतकंच नाही तर राष्ट्रवादाबरोबर साम्यवादात धर्मही प्रबळ राहिला. अफूची गोळी कष्टमय जीवन रंगीत बनवते म्हणूनच धर्म बलवान राहतो. काही भविष्यं वगळली तर मार्क्सची भविष्यं म्हणूनच आज खोटी ठरली आहेत.

वरील आशयाच्या पहिल्या व्याख्यानातील आणि दुसऱ्या महायुद्धानतरचे तीन महत्त्वाचे राजकीय प्रवाह या विषयावरील भाषणातील समान दुवा म्हणजे साम्यवाद आणि त्यामागं दडलेला अर्थ. साम्राज्यशाहीचा अंत, लाल साम्यवादाचा उदय आणि द्वितीय महायुद्धोत्तर निर्माण झालेले अलिप्ततावादी देश हे तीन राजकीय प्रवाह. जर्मनीनं अनाक्रमणाचा करार मोडून रशियावर हल्ला केला, जपान हिंदुस्थानपर्यंत आला. इटलीनं हिटलरच्या बाजूनं युद्धात उडी घेतली आणि दोस्त राष्ट्रांचं साम्राज्य डळमळू लागलं. ज्या भांडवलावर साम्राज्य उभं होतं ते भाडवल युद्धांमध्ये अतोनात खर्च झालं. समृद्ध अमेरिका वगळली तर फ्रान्स किंवा इंग्लंडसारख्यांना हे झेपणारं नव्हतं आणि यातूनच ब्रिटनची मोठी साम्राज्यशाही अस्तंगत व्हायला आरंभ झाला; पण या महायुद्धात भारतात काही मतप्रवाह हिटलर वा मुसोलिनीला पाठिंबा देणारे होते. एम. एन. रॉयांसारख्या जाणत्या नेत्यानं मात्र 'लोकशाही टिकली तर स्वातंत्र्याची आशा आहे' असा उचित सूर लावला होता आणि

तसंच झालं. पुढे एकेक देश साम्राज्यातून स्वतंत्र झाले. विशेष कोणत्याही कटुतेशिवाय भारत स्वतंत्र झाला आणि इतरही काही देश. त्याची धोरण ठरू लागली आणि यातून पहिला प्रवाह आकारला. मात्र लाल साम्राज्यशाहीचा दुसरा गटही अस्तित्वात आला. चर्चिससारख्यानी हे ओळखलं होतच आणि यातून जो प्रवाह निर्माण झाला तो शीतयुद्धाचा. झेकोस्लाव्हिया. पोलड वा इतर कम्युनिस्ट देशात आणि आतरराष्ट्रीय क्षेत्रात हे शीतयुद्ध सुरू झाल. रशियाचा आसुरी चेहरा उघडकीस आला. तर्कतीर्थांनी रशियातील व्यक्तित्वहीन संस्कृतीचा एक अनुभव या संदर्भात कथन केला. स्वतःच्या शेतातली फळफळावळ व सार्वजनिक शेतामधील उत्पादन यात फार फरक रशियन शेतकरी करतो हे त्यानी सांगितले. प जर्मनीतील पसरलेली सुदर खाजगी शतं आणि पूर्व जर्मनीतील ओसाड सरकारी क्षेत्रं हे चित्र राष्ट्रियीकरणामुळ उमटतं. एका झेक बाईनं तर्कतीर्थ जेव्हा झेकोस्लाव्हियात होते तेव्हा बक्षिसी म्हणून डॉलर मागितले; पण स्थानिक चलन नाकारलं. तर असा हा शीतयुद्धाचा परिणाम चलनावर होतो. तंत्रज्ञानाची आश्चर्यकारक प्रगती साम्यवादी देशात होते म्हणून परान्ससारखा देश रशियाशी मैत्रीसंबधाची इच्छा व्यक्त करतो. अन्यतः आवाज थाबविणाऱ्या व सक्तीची शातता असणाऱ्या साम्यवादी देशाच्या अतर्गत राजकारणात व जगाच्या बाजारात शीतयुद्धाचा प्रवाह असतोच असतो. शीतयुद्धापाठोपाठचा महत्त्वाचा प्रवाह अलिप्ततावादयाचा. चाऊ–एन–लाय, नेहरू, टिटो वगैरेंनी अलिप्ततावादी राष्ट्राची संघटना बांधली आणि पंचशील तत्त्वातून काही नियम व सकेत तयार झाले. परस्परस्वातंत्र्याचे संरक्षण हा त्यातला महत्त्वपूर्ण मुद्दा. भारतीय मुत्सद्देगिरीनं या तटस्थ देशाच्या चळवळीत अग्रक्रम घेतला व घेत आहे. तर्कतीर्थांनी यासंबंधी इदिराजीच्या विश्वशांतीच्या प्रयत्नाचं कौतुक केलं. युनोनं इंदिराजीना रशिया–अमेरिकेबरोबर एकत्रपणे बोलायला सागितल. हा त्यांचा गौरवच, हा तर्कतीर्थांचा सूर होता. तर असे तीन राजकीय प्रवाह असताना सामान्य माणसानं Great day is very near या सद्भावनेवरच विश्वास ठेवावा; 'Doom's day' (प्रलयदिन) जवळ आहे हे भाकित लक्षात घेऊ नये हेटी त्यांच्या भाषणानं सुचवलं.

### सर्वधर्मीय परंपरा

वरील दोन्ही व्याख्यानं जगाच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक स्थितीचं चित्रण करणारी होती तिसरं व्याख्यान भारताच्या राजकारणाचे बदलते प्रवाह हे होतं आणि त्यात एकात्मता प्रश्नावर भर होता. भारतातील सर्वधर्मीय परंपरा कशी श्रेष्ठ आहे हे सांगताना त्यानी एक श्लोक उद्धृत केला तो त्यांना त्या वेळी नीटसा आठवला नाही; पण ती मूळ वैष्णवी प्रार्थना व तिच्यातील तर्कतीर्थांनी केलेला बदल पुढीलप्रमाणे आहे. त्यांच्या लेखसंग्रहात अर्थासकट तो असा दिला आहे :

यं शैव: समुपासते
शिव इति ब्रह्मेति वेदान्तिनो।
बौद्धा बुद्ध इति
प्रमाणपटव: कर्तेति नैयायिका।
अर्हं नित्य च जैनशासनरत:
कर्मेति मीमांसक:।
सोयं वो विदधातु
वांच्छितफलं त्रैलोक्यनाथो हरि: ॥

ज्याची शैवलोक शिव म्हणून, वेदान्ती, ब्रह्म म्हणून, तर्कशास्त्री नैयायिक विधाता म्हणून, बौद्ध बुद्ध म्हणून, जैन तीर्थंकर म्हणून, मीमांसक कर्म म्हणून उपासना करतात तो हरी तुमची इष्टकामना पूर्ण करो.' तर्कतीर्थ यात मुसलमान व ख्रिश्चनांची भर घालून म्हणतात,

यं शैवा: समुपासते
शिव इति ब्रह्मेति वेदान्तिनो।
बौद्धा बुद्धपदे
कुराणशरणा अल्लेति माहंमदा: ॥
आकाशस्थपितेति ख्रिस्तनिरता
जैना विरागं मुनिम्।
सोयं वो विदधातु वांच्छितफलं
त्रैलोक्यनाथो हरि: ॥

असा सुंदर वैष्णवी दृष्टान्त तर्कतीर्थ देतात आणि त्यातून इथली सर्वधर्मीय परंपरा पुढं येते. जानेवारी ८४ ची सुरुवात या व्याख्यानांनी इथं झाली सखोल अभ्यासातून उमटलेल्या या उद्‌गारांमध्ये आग्रही मतप्रदर्शन नव्हते. तपशिलाच्या किरकोळ चुकाही थोड्या कारणीभूत होऊन काही जणांना ही व्याख्यानं सपक वाटली असावीत काय? एकंदरीत मात्र यातून जागतिक स्थिती नीटपणे समोर उभी राहण्याला श्रोत्यांना मदत झाली हे नि.संशय.

–सुनील धोपेश्वरकर

# अ. भा. वि. प.

## आंतरराज्य छात्र जीवनदर्शनाचा यशस्वी प्रयत्न

'क्या आप अरुणाचलकी कॅपिटल प्लेस का नाम जानते है?' ताना निकमच्या या प्रश्नावर वार्ताहर–परिषदेत एकदम शातता. या शाततेचा अर्थ समजल्यामुळे त्यानेच उत्तर देऊन टाकले की 'वैसे तो इटानगर आपकी बबई की तरह बडा नही है।'

मन सुन्न करून टाकणारा हा प्रसंग जळगाव येथे घडला.

'हमारी तरफ उंगलिया उठाकर लोग जब हमे चिनी या नेपाली सबोधित करते हैं तो हमारे मन को बडी ठेंस पहुचती है।' ११ वीत शिकणारा ताना काया आपल्या मतांसंबंधी अतिशय ठाम होता. चिनी अथवा नेपाळी लोकांशी साधर्म्य असणारे असे काही लोक हे भारतातीलच अतिपूर्वेकडील (पूर्वाचल) भागात रहातात. यासबंधीचे भारतीय लोकाचे अज्ञान हे अक्षम्य आहे असे त्याचे मत.

'आज आपल्या शहरात निरनिराळ्या देशातून विद्यार्थी आलेले आहेत त्यांचे आपण स्वागत करू या!' एका प्रसिद्ध शहरातील महापौरानी केलेले हे स्वागत. आपण भारतातीलच एका राज्यात रहात असतानाही आपल्याला वेगळ्या देशांचे समजणाऱ्या या स्वागताबद्दल नंतर पूर्वांचलातून आलेल्या विद्यार्थ्यांनी अभाविपच्या कार्यकर्त्यांना चांगलेच सतावले

'आंतरराज्य छात्रजीवनदर्शन' हा प्रकल्प राबवताना येणाऱ्या अनंत अडचणीपैकी घडलेली ही एक अडचणीची घटना १९७९ सालची.

'दि. २५ डिसेंबर १९८३ ला पोलीस-आयुक्त श्री. रंगा राजू याचे हस्ते झालेल्या पुण्यातील निरोपाच्या समारभात बोलताना ताना निकम म्हणाला की, आमच्याकडे स्वातंत्र्यवीरांची परपरा नाही. भारतीय स्वातंत्र्ययुद्धात आमचा सहभाग कमी खराच; परंतु याला कारण इंग्रजांची डिव्हायडेशन पॉलिसी. आज मात्र मी सांगू शकतो की यापुढे सर्वच क्षेत्रात आम्ही सर्वांच्या बरोबरीने राहू!'

ताना निकमचा हा आत्मविश्वास म्हणजे पूर्वांचलाचा प्रातिनिधिक आवाजच!

वरील सर्व घटना खूपच बोलक्या. आमच्या अज्ञानाला बऱ्याच अंतर्मुख करणाऱ्या तसेच पूर्वांचलातील वेगळेपणाच्या भावनेची कारणमीमांसा प्रतिबिंबित करणाऱ्या अशा असंख्य घटना; परंतु त्यातील अत्यंत थोड्याच येथे दिल्या आहेत

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद हे देशातील सर्व विद्यापीठांमध्ये कार्यरत असणारे, देशाच्या कानाकोपऱ्यात १२०० हून अधिक शाखा असणारे एकमेव राष्ट्रवादी छात्रसंघटन आहे. १९६४ सालच्या सुमारास पूर्वांचलांना भेटीसाठी गेलेल्या विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय एकात्मतेस असणारा धोका ओळखला. या ठिकाणी निर्माण झालेली वेगळेपणाची भावना दूर होण्यासाठी 'आम्ही सर्व एक आहोत' ही भावना दृढ होणे आवश्यक होते. त्यासाठी म्हणून आंतरराज्य छात्रजीवनदर्शन हा प्रकल्प १९६६ सालापासून विद्यार्थीपरिषदेने सुरू केला. राष्ट्रीय एकात्मता अबाधित राखण्यासाठी सुरू केलेल्या या प्रकल्पाचे सास्कृतिक देवाण–घेवाण ( cultural exchange) व भावनैक ऐक्य (emotional integration) हे प्रमुख हेतू आहेत.

पूर्वांचलातून आलेल्या विद्यार्थ्यांना उर्वरित भारतातील जीवनपद्धती, सास्कृतिक जडण-घडण यांचा प्रत्यय अनुभवातून देण्याचा हा एक प्रयत्न. उद्देश मात्र 'अलग भाषा अलग वेष फिर भी अपना एक देश' हाच. अर्थात पूर्वांचलातील विद्यार्थी उर्वरित भारतात आणण्यानेच कार्यभाग साधणार नाही त्याकरीता उर्वरित भारतातील विद्यार्थ्यांनाही पूर्वांचलात नेणे आवश्यक आहे याचेही भान विद्यार्थी परिषदेने ठेवले. त्यानुसार १९६७ सालापासून पूर्वांचलात विद्यार्थी नेणे सुरू झाले.

आसाम, अरुणाचल, मणिपूर, मेघालय, मिझोराम, त्रिपुरा, नागभूमी इ. प्रदेशांनी बनलेला भारताच्या अतिपूर्वेकडील भूभाग पूर्वांचल या नावाने ओळखला जातो. सूर्याची पहिली किरणे जेथे पडतात तो हा पूर्वांचलाचा भूभाग लष्करीदृष्टया जितका महत्त्वाचा तितकाच खजिजसपत्ती, जंगलसंपत्ती या दृष्टीनेही. दुर्दैवाने हा भाग ब्रिटिशाच्या काळापासून पूर्णपणे दुर्लक्षिला गेला. प्रचंड डोंगराळ भाग असल्याने डोंगरदऱ्यांतून रहाणारे आदिवासी लोक सर्वार्थाने अत्यत मागासलेले. या भागाचा औद्योगिक विकासही कमालीचा कमी. त्यामानाने उर्वरित भारत हा बराच पुढारलेला. याचा नेमका फायदा धूर्त व कावेबाज अशा विघटनवादी शक्तीनी घेण्यास सुरुवात केली आदिवासी बांधवांना निरनिराळ्या सोयी, सवलती, पैसा–अडका पुरविण्यास सुरुवात झाली. तुमचे रक्षण करणारे, कल्याण करणारे भारत सरकार नव्हे, भारतापासून तुम्ही वेगळे आहात अशी भावना फैलावण्यास सुरुवात झाली. नागभूमीचे उदाहरण या सदर्भात खूप काही सागून जाणारे आहे.

विघटनवादी शक्तींच्या पूर्वांचलातील राष्ट्रविरोधी कारवाया, भारत सरकारचे त्याकडील दुर्लक्ष, पूर्वांचलित वाढणारी वेगळेपणाची भावना व त्यातून उद्भवू पहाणारा राष्ट्रीय एकात्मतेला धोका यासर्वांना उत्तर म्हणून सुरू झालेल्या 'आतरराज्य छात्रजीवनदर्शन' प्रकल्पांतर्गत विद्यार्थीच आणण्यामागेही उद्देश आहे. आजचा विद्यार्थी हा आजचा नागरिक आहे यावर विद्यार्थीपरिषदेचा विश्वास आहे हा तरुण विद्यार्थी सक्षम, संवेदनाशील आहे अशा या विद्यार्थ्यांनाच आपल्या उदात्त संस्कृतीचे बधुभावाचे दर्शन घडवून त्यांच्यात आपण सर्वदूर एक आहोत ही भावना रुजविणे आवश्यक आहे असे विद्यार्थीपरिषदेला वाटते. या प्रकल्पातर्गत आलेल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीयत्वाची ही भावना त्यांच्या प्रदेशात रुजविण्याचा प्रयत्न पुढे चालू ठेवावा ही सुद्धा एक अपेक्षा. पूर्वांचलात विद्यार्थीपरिषदेचे चार पूर्णवेळ कार्यकर्ते आज या प्रकल्पाच्या उद्देशपूर्तीसाठी कार्यरत आहेत.

## मेर घर भारत देश

या वर्षीही २० डिसेंबर ८३ ते २५ जानेवारी ८४ अशा ३५ दिवसांच्या भारतभेटीसाठी अरुणाचल व आसामचे २० विद्यार्थी आले आहेत. दि २३ डिसेंबर ते २५ डिसेंबर असा ३ दिवस या मुलांचा मुक्काम पुण्यातही होता. २० विद्यार्थ्यांच्या या तुकडीत कला, वाणिज्य, शास्त्र या तीनही शाखांत शिकणारे विद्यार्थी होते. सुदर बासरी वाजवणारा देवव्रत कारडोंग हा ७ वीत शिकणारा सर्वात लहान विद्यार्थी होता, तर सुभाषचंद्र केयाल हा प्रथम वर्ष वाणिज्यशाखेचा विद्यार्थी सर्वांत मोठा होता. एकूण ५ विद्यार्थिनींपैकी कु. बुलो याखो ही अरुणाचलची लता मगेशकर म्हणून प्रसिद्ध असणारी विद्यार्थिनीही होती. ताना निकम हा विद्यार्थी या संपूर्ण टीमचा 'ग्रुपलीडर' होता.

या प्रकल्पातर्गत येणाऱ्या विद्यार्थ्यांची सोय नेहमीच कुटुबांतून केली जाते. या प्रकल्पाचे हे वैशिष्ट्य त्याच्या मूळ उद्देशाशी अत्यत प्रामाणिक असेच आहे. कुटुबातील वास्तव्यानेच या विद्यार्थ्यांना तेथील जीवनपद्धती, सास्कृतिक परपरा यांची होणारी माहिती, आपुलकी व जिव्हाळ्याच्या अनुभूतीतून निर्माण होणाऱ्या प्रेमातुर धाग्याचे नाते हे खचितच चिवट असते.

पुण्यात या विद्यार्थ्यांचे महापौर आणि कुलगुरूंच्या वतीने स्वागताचे कार्यक्रम झाले. त्याचबरोबर एन. डी. ए. वेधशाळा, आगाखान पॅलेस, महाराष्ट्रमडळ, स्वरूपवर्धिनी इ. स्थळांना भेटी देण्यात आल्या. त्याचप्रमाणे काही लघुउद्योगांनाही त्यांच्या भेटी झाल्या. एकूण ७२ तासांच्या वास्तव्यापैकी ४५ तास या विद्यार्थ्यांचा सहवास कुटुबाबरोबर (Host families) होता.

निरोपाच्या कार्यक्रमात पुण्याचे पोलीस-आयुक्त मा. रंगा राजू यांनी हा प्रकल्प म्हणजे काळाची गरज आहे असे सागून विद्यार्थीपरिषदेला कौतुकाची पावती दिली. याच वेळी झालेल्या सास्कृतिक कार्यक्रमांनी एकमेकांच्या कलागुणाची ओळख करून दिली.

## दुर्लक्ष नको

आंतरराज्य छात्रजीवनदर्शन हा प्रकल्प, प्रकल्प म्हणूनच न राहता ती एक चळवळ व्हावी असा विद्यार्थीपरिषदेचा प्रयत्न आहे. त्या दृष्टीने पुढचे पाऊल म्हणून 'मेरा घर भारत देश' (my home is India) या सारख्या नवनवीन कल्पना मूर्त स्वरूपात आणण्याचे कामही विद्यार्थीपरिषद करत आहे पूर्वांचलातील विद्यार्थी उर्वरित भारतात आणून त्याना ८–१० वर्षे येथील कुटुबात ठेवून त्याला तंत्रशिक्षण देण्यात येते उद्देश हा की, या तंत्रशिक्षणाचा उपयोग या विद्यार्थ्याने आपल्या प्रदेशात जाऊन करावा व त्या प्रदेशाचा विकास झपाट्याने करण्यास हातभार लावावा.

अभाविपने १९६६ साली सुरू केलेला हा प्रकल्प आज बरेच काही यश देत असल्याचे जाणवते. अरुणाचलाचे आजचे मुख्यमंत्री श्री गेगांग अपाग हे या प्रकल्पांतर्गत महाराष्ट्रात येऊन गेलेले आहेत. आजही ते मुबईत आल्यावर आपल्या त्या वेळच्या कुटुंबात (Host family) जाण्यास विसरत नाहीत. भावनैक ऐक्य ते याहून वेगळे काय असणार? ख्रिश्चन मिशनऱ्याच्या कारवायांचे खरे स्वरूप पटल्याने याच मुख्यमंत्र्यानी देशात सर्वप्रथम धर्मांतरावर बंदी आणली व मिशनऱ्यांच्या कामावर बधने आणली. याच प्रकाराने इतरही अनेक विद्यार्थी या ठिकाणी राष्ट्रीयत्वाची भावना उराशी बाळगून काम करताहेत. आमच्याच दुर्लक्षामुळे एकटा पडू पहाणारा हा सरहद्दीवरील प्रदेश आज या प्रकल्पामुळे नक्कीच राष्ट्रीय प्रवाहात सामील झाला आहे

—महेश रिसबूड

# मुंबईत मराठी माणसाचं खच्चीकरण झालंय !

अभय गोखले

दिवसेदिवस मोडकळीस येत असलेल्या मुंबईत मराठी माणसाचे काय स्थान आहे ? आज मुबईत तुम्ही कुठेही फिरा, बसमधून, टॅक्सीमधून, लोकलमधून प्रवास करा, तुमचे मराठीशिवाय चालेल; पण तुम्हाला हिंदी येत नसेल तर महाराष्ट्राच्या या राजधानीत तुम्हाला कोणताही व्यवहार करता येणार नाही. काही वर्षापूर्वी शाहीर साबळे यानी 'आधळ दळतंय !' नावाच एक सुदर प्रहसन लिहिलं होत. त्यात त्यानी मराठी माणूस मुबईत कसा परका होत चाललाय हे प्रभावीपणे दाखवलं होतं. आज मुबईत मराठी माणूस नुसता परकाच झालेला नाही तर त्याची जोरदार पीछेहाट शेजारच्या उपनगरातून चालू झालेली आहे. याचा सर्वच दोष राज्यकर्त्यांवर जात असला तरी मराठी माणसाने आत्मनिरीक्षण करण्याची वेळ आता आली आहे.

कॉस्मोपोलिटन सिटी या नावाखाली मुबईत मराठी माणसाचा गळा दाबला जात आहे; परतु त्याकडे एक शिवसेना सोडली तर कोणत्याही राजकीय पक्षाचे लक्ष जात नाही. सर्वच राजकीय पक्ष हे इतर प्रांतीयांची मते लाटण्यासाठी मराठी माणसावरील वाढत्या अन्यायाकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहेत. मागे खासदार राजाभाऊ भोळे यांनी लोकसभेत मुबईत येणाऱ्या परप्रांतीयाच्या वाढत्या लोढ्याकडे सरकारचे लक्ष वेधले असता सर्व खासदारानी (त्यात मुबईचे रतनसिंग राजदाही होते) भोळेयाच्या प्रस्तावाला विरोध करून त्याना सकुचित ठरवले. मुबईत येणाऱ्या परप्रांतीयाच्या लोढ्यात केरळी, मद्रासी, तेलगु, कानडी या दाक्षिणात्य लोकाचा मोठा भरणा आहे. त्यात पुन्हा केरळी व उत्तरप्रदेशातील भय्ये याची आवक सध्या जास्त वाढली आहे. या दाक्षिणात्य मडळीचे वैशिष्ट्य म्हणजे ते इथे आल्यावर येथील स्थानिक लोकाच्यात मिळूनमिसळून वागत नाहीत, मराठी भाषा आपल्या मुलांना शिकवत नाहीत, स्थानिक भाषिकांचा द्वेष करतात. नोकऱ्यामध्ये यांच्यातील जे लोक वरील पदावर असतील ते आपल्याच माणसाची खोगीरभरती तेथे करतात व स्थानिक माणसाला रोजगार मिळू शकत नाही. आर. सी. एफ. सी., मध्यरेल्वे, एच. ओ. सी. थळवायशेतप्रकल्प, हिंदुस्थान लिव्हर अशा कित्येक कपन्या व संस्था आहेत की, तेथे मराठी माणसाला मोठ्या प्रमाणात डावलण्यात आलेले आहे. याविरुद्ध महाराष्ट्र शासनाला निश्चित काही तरी उपाययोजना करता येईल; परंतु त्याना मराठी माणसाबद्दल म्हणावी तेवढी आस्था असेल तर ना ? आज महाराष्ट्र विधानसभेत निरनिराळ्या राजकीय पक्षांमध्ये कित्येक अमराठी लोकप्रतिनिधी आहेत. महाराष्ट्र मत्रिमंडळात अमराठी मंत्र्यांना प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. उत्तरप्रदेशातील एक कांग्रेस (इंदिरा) कार्यकर्ते तर काही महिने मुबईत राहून आमदार म्हणून निवडून आले व संजयकृपेने पुढे मत्रीही झाले ! उत्तरप्रदेशीय भय्ये हे अनधिकृत झोपडपट्ट्या व बाधकामात आघाडीवर आहेत. यांच्या या बेकायदेशीर कृत्यावर वरील उत्तरप्रदेशीय मंत्री पांघरूण घालतात असे बोलले जाते. आणखी काही अमराठी मत्री त्याच्या अमराठी बांधवां करिता अशाच प्रकारचे अप्रत्यक्ष सहाय्य करीत असले तर त्यात त्याना दोष देण्यात अर्थ नाही. यातील काही मंत्र्याना व अमराठी आमदारांना मराठी येत नाही, मराठी शिकण्याची त्यांची इच्छा नाही, याची त्याना खतही वाटण्याचे कारण नाही. कारण या मुबईत त्याचेच काय पण कोणाचेही मराठीशिवाय अडत नाही. मराठी मत्री व आमदार मराठी माणसासाठी काय करत आहेत ? मराठीवरील वाढता अन्याय काय त्याना दिसत नाही ? पण ते लागलेत सत्तेच्या पाठीमागे ! सत्ता मिळविण्याकरिता आपापसातील भाडणात मराठी माणसाकडे लक्ष देण्यास त्याना फुरसतच मिळत नाही

केंद्रात तर मुबईतील अमराठी माणसाचे हितच महत्त्वाचे वाटते. मागे दूरदर्शनवर ८० टक्के मराठी कार्यक्रम दाखविण्यासाठी मोठे आंदोलन करण्यात आले. त्या वेळेस मोठी आश्वासने देण्यात आली; पण आता पुन्हा परिस्थिती पूर्वपदावर येत आहे. मराठी माणसाला कसेही चिरडले तरी तो चिडून उठत नाही याची केंद्राला व राज्यशासनाला पूर्ण जाणीव आहे. त्यामुळे ते नेहमीच मराठीबद्दल बेफिकीर असतात. मागे रेडिओवर बातम्यांच्या वेळेस ' धिस इज ऑल इडिया रेडिओ ' ऐवजी ' धिस इज आकाशवाणी ' असा फरक केल्यावर हिंदीद्वेष्ट्या तामिळींनी आंदोलनाची धमकी देऊन सरकारला ऑल इडिया रेडिओ हा शब्द बदलू दिला नाही; पण महाराष्ट्राच्या बाबतीत हिंदीवाल्यानी मराठीवर बलात्कार करण्याचे ठरविलेले दिसते. रेल्वेचे हिंदीकरण सर्वांत जास्त मुबईमध्ये झालेले दिसते. जिकडे पहावे तिकडे हिंदीचे वर्चस्व ! स्टेशनावर मराठीच्या जोडीने हिंदी पाट्या, लांबपल्ल्याच्या गाड्यांवर हिंदी पाट्या, मराठी पाट्याचे नामोनिशाण नाही. खरे पहाता मद्रास, आंध्र, केरळ या राज्यांतून ज्या गाड्या मुंबईला येतात त्यांवर स्थानिक भाषांतूनही नावाची पाटी असते; पण मुबईत बाहेरगावी जाणाऱ्या रेल्वेगाड्यांवर गावाच्या नावाच्या मराठी पाट्या आढळणार नाहीत. व्हीटी अथवा चर्चगेट, बॉंबेसेंट्रल स्थानकांवर जे रेल्वेचे चौकशीविभाग आहेत तेथे तुम्हाला मराठीतून उत्तर मिळणार नाही. महाराष्ट्राच्या राजधानीत तुम्हाला मराठी येण्याची आवश्यकताच नाही.

इतर राज्यांना त्यांच्या मुख्य शहरांची नावे त्या त्या स्थानिक भाषेत बदलण्याची मुभा मिळते; पण बॉंबेचे मुंबई असे नाव बदलण्यास केंद्राचा विरोध आहे. कारण आपण मराठी माणसाला कसेही

चेपले तरी तो गप्प बसतो हे केंद्राला माहीत आहे आणि आपले राज्यशासन तरी मराठी माणसाच्या न्याय्य मागण्याचा पाठपुरावा कुठे करतंय ? आज निरनिराळ्या राज्यातून परप्रांतीयांचे लोंढे रोजच्या रोज मुंबईत नोकरीकरता येत आहेत. या माणसांना हुडकून, त्यांची राज्यवार वर्गवारी करून त्यांच्याकरिता महाराष्ट्र शासनाला जो खर्च करावा लागतो तो शासनाने त्या त्या राज्यांकडून व केंद्राकडून मागावयास हवा. या लोकांना वर्षानुवर्षे पोसण्याचा मक्ता महाराष्ट्र शासनाने घेतला आहे का ? हे लोक मुंबईत येतात; अनधिकृत झोपडपट्ट्या व बांधकामे उभारतात, त्यामुळे मुंबई बकाल झाली आहे. आज मुंबईत झोपडपट्ट्या व फेरीवाले नसलेले फुटपाथ अभावानेच आढळतील. हे परप्रांतीय लोक सार्वजनिक ठिकाणी घाण करून ठेवतात त्यामुळे मुंबईत आरोग्य नावाची चीजच अस्तित्वात राहिलेली नाही. रोजच्या रोज ज्या झोपडपट्ट्या उभ्या रहातात त्यांना प्राथमिक सोयी उपलब्ध करून दिल्या जात नाहीत. मग हे लोक रस्त्यावर, रेल्वे-रुळांवर आपले प्रातर्विधी उरकतात व घाण करतात. त्यामुळे रोगराई वाढते. महापालिकेला व शासनालाही या अनधिकृत झोपडपट्टीवाल्यांना सोयीसवलती पुरवणे परवडण्यासारखे नाही. स्वच्छ व सुंदर मुंबई ही कल्पना आता स्वप्नातच पाहिलेली बरी ! मागे अंतुलेमहाशयांनी या अनधिकृत झोपडपट्ट्या पाडण्याचा धडक कार्यक्रम हातात घेतला होता; पण त्यांनी वेळ चुकीची निवडली. या झोपडपट्टीतील लोकांना राज्य परिवहनबसेसमधून त्यांच्या राज्यातून सोडून देण्याचा अंतुलेंचा उपक्रमही चांगला होता.

## मराठी माणसाला शाप

आज जिकडे जाल तिकडे तुम्हाला मुंबईत अमराठी लोकांचे वर्चस्व दिसेल. नोकरी, उद्योगधंदा सर्व ठिकाणी हे परप्रांतीय जागा अडवून बसलेत. दुकानदारीचा व्यवसाय गुजराथी लोकांनी कॅप्चर केलाय तर हॉटेलिंगचा उडप्यांनी. गुजराथी लोकांच्या वर्चस्वाखाली असलेल्या कापडगिरण्यात दत्ता सामंत यांनी संप पुकारल्यावर हजारो मराठी गिरणीकामगार बेकार झाले. या गुजराथी गिरणीमालकांचे हात एवढे वर पोचलेत की, दोन वर्षे केंद्राने गिरणीकामगारांच्या बेकारीकडे लक्षच दिले नाही. याचे कारण हे गिरणीकामगार मराठी होते व मराठी माणसांबद्दल केंद्राने नेहमीच आकस दाखवला आहे. हे परप्रांतीय नुसते मुंबईच्या उपनगरातच घुसले नसून कर्जत, कसारा, विरार येथपर्यंतही पोचले आहेत. काही काही व्यवसायांत तर त्यांनी मराठी माणसांना नामशेषच केले आहे. टॅक्सीच्या व्यवसायात उत्तरप्रदेशीय भय्ये, शिख आणि दाक्षिणात्यांचा इतका भरणा झाला आहे की, मराठी टॅक्सीचालक अभावानेच आढळतो. त्यामानाने बेस्टमध्ये हे परप्रांतीय घुसखोरी करू शकले नाहीत.

शिवसेनेसारख्या संघटनेमुळे मराठी माणूस मुंबईत कसा तरी टिकून राह्यलाय. शिवसेना नसती तर एव्हाना मराठी माणसाचे मुंबईत खच्चीकरणच झाले असते ! सुरुवातीला शिवसेनेने मराठी माणसाचे प्रश्न तळमळीने हातात घेतले. महानगरपालिकेतील शिवसेना-नगरसेवकाची कामगिरी नेहमीच भरीव झालेली आहे. सुरुवातीला काही वर्षे शिवसेनेने परप्रांतीयावर चांगला वचक बसवला होता. त्या वेळचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक हे मराठी माणसांच्या समस्या सोडवण्यात नेहमीच तत्परता दाखवत. मात्र शिवसेनेचे दुर्दैव म्हणजे त्यांना समर्थ नेतृत्व लाभले नाही. शिवसेनेने आपल्या धोरणात कधीच एकवाक्यता दाखवली नाही कधी काँग्रेसला जवळ कर तर कधी विरोधी पक्षांना यामुळे सामान्य मराठी माणसाचा शिवसेनेवरील विश्वास कमी झाला अर्थात मराठी माणसाची नेहमीच उपेक्षा करणाऱ्या अखिल भारतीय पक्षांनी शिवसेनेबद्दल नेहमीच आकस बाळगला. त्यांना शिवसैनिकांची मते हवीत; पण ती शिवसेनेशी गुप्त समझोता करून. कारण नाही तर मुंबईतील परप्रांतीयांची मते गमवावी लागतील. सुरुवातीचा शिवसेनेचा जोरही नंतर ओसरला काही नेते शिवसेना सोडून गेले. शिवसेनेने महापालिकेकरिताच फक्त निवडणुका लढविणे योग्य ठरले असते; पण शिवसेना विधानसभा व लोकसभा-निवडणुकांतही उतरली व तेथे त्यांना अपवाद वगळता दारुण पराभव पत्करावा लागला. शिवसेनेच्या धरसोडवृत्तीने तिची लोकप्रियता कमी झाली असली तरी शिवसेनेचे मुंबईतील महत्त्व कमी लेखता येणार नाही. मराठी माणसांनी मुंबईतील स्वतःचे अस्तित्व टिकविण्याकरिता शिवसेना जगवणे व वाढवणे याशिवाय त्यांना पर्यायच नाही ! महानगरपालिका-निवडणुकीत मराठी लोकांनी अखिल भारतीय पक्षांना बाजूला सारून शिवसेनेला निवडून आणणे अगत्याचे आहे. शिवसेनेची काही मते मलाही पटत नाहीत; पण परप्रांतीयांपासून शिवसेनाच मुंबईला वाचवू शकेल याबाबत मला शंका वाटत नाही. आज जरी शिवसेनेची ताकद कमी झाली असली तरी निरनिराळ्या उद्योगधंद्यांतील कामगारसेना (शिवसेनेची कामगारआघाडी) मराठी माणसांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत आहे. स्थानिक लोकाधिकार-समितीसारखी शिवसेनाप्रणीत संघटना निरनिराळ्या संस्थांमध्ये व कंपन्यांत आपला संघटित आवाज उठवून मराठी तरुणांना रोजगार मिळवून देत आहे. शिवसेनेच्या पुढाकाराने दूरदर्शनवरील मराठी कार्यक्रमांची संख्या वाढवण्यात आली. त्याअगोदर गुजराथी व हिंदी कार्यक्रमांचेच मुंबई दूरदर्शनवर वर्चस्व होते. मुंबईत मानाने रहावयाचे असेल तर शिवसेनेशिवाय पर्याय नाही हे मराठी माणसाने नीट लक्षात ठेवावयास हवे !

मुंबईत औद्योगीकरण सर्वांत जास्त भरभराटीत आले व त्यामुळे भारतात सर्वांत जास्त रोजगाराच्या संधी मुंबईत उपलब्ध झाल्या, हा मराठी माणसाच्या दृष्टीने शापच म्हणावा लागेल. कारण भारताच्या कानाकोपऱ्यांतून नोकरीधंदा मिळविण्याकरिता परप्रांतीयांची मुंबईकडे रीघ लागली. या परप्रांतीयांनी मुंबईला आपली कधीच मानले नाही. मुंबईत येऊन भरमसाठ पैसा कमवला व या बदल्यात मुंबईला काय दिले तर घाण, रोगराई, बजबजपुरी ! त्यांनी मुंबईत पैसे कमवून आपल्या प्रांतांची धन केली आणि मुंबई ज्याची आहे तो मराठी माणूस कंगाल आणि दरिद्री बनला ! मुंबईत सर्वांनी गर्दी केल्याने गुंडगिरी, गुन्हेगारी यांचे प्रमाण वाढले. आज एखाद्या धंद्यात दहा रोजगारसंधी उपलब्ध झाल्या तर त्यातील दोन नोकऱ्यासुद्धा मराठी माणसांना मिळत नाहीत. शिवाय या परप्रांतीयांची अरेरावी तर बघायलाच नको. बेळगावसारख्या सीमाभागात मराठी माणसावर कानडीची सक्ती केली जाते; पण मुंबईतील हजारो कानडी मुले मराठी भाषा शिकत नाहीत. त्यांना मराठी भाषा शिकण्याची आवश्यकताच भासत नाही व त्यांचे मराठीशिवाय अडतही नाही. इतर अमराठी भाषिकही आपल्या मुलांना सहसा मराठी शिकवत नाहीत, मग स्थानिक मराठी लोकांच्यात ते मिसळणार कसे ? मुंबईत इतकी चित्रपटगृहे असताना मराठी चित्रपटांकरिता त्यांना चित्रपटगृहे मिळत नाहीत व महाराष्ट्र शासनही याबाबतीत लक्ष घालत नाही. डेली, मिडडे यांसारखी कित्येक दैनिके व नियतकालिके मराठी माणसांविरुद्ध नेहमीच आग ओकत असतात; पण ती बिनधास्तपणे

मुबईत राहू शकतात व गबर होतात ! या परप्रातीयांच्या वाढत्या घुसखोरीने बेस्ट व लोकलची व्यवस्था जवळजवळ कोलमडून पडली आहे. आज बेस्ट–बसेसमधून तीस ते पस्तीस लाख तर लोकलट्रेनमधून त्याच्या दीडपट लोक रोज (अंदाजे) प्रवास करतात बेस्टबसची व्यवस्था कशीबशी तग धरून आहे; पण वाढती घुसखोरी लक्षात घेता बेस्ट जी भारतात सर्वांत उत्कृष्ट शहर परिवहनसेवा आहे ती कोलमडून पडण्यास वेळ लागणार नाही. आर्थिकदृष्ट्या तर ती काही काळाने डबघाईस आली तर नवल वाटावयास नको. लोकल्स सर्व्हिसबद्दल काय बोलायच ? प्रत्येक लोकल–ट्रेनची जी क्षमता आहे त्याच्या किमान पाचपट लोक मेंढरापेक्षा वाईट अवस्थेत रोज प्रवास करतात. आजची लोकलट्रेनची व्यवस्था ही १९६० च्या मुबईच्या लोकसख्येला पुरणारी असावी. त्यानतर मुबईच्या लोकसख्येत तीस ते पस्तीस लाखाची भर पडली. गेल्या तीन ते चार वर्षांत मुबईची लोकसख्या भरपसाठ वाढली; पण लोकलट्रेनची सख्या न वाढता कमीच झाली. मध्यरेल्वेवरील लोकलट्रेनची व्यवस्था तर सर्वांत जीवघेणी आहे. या लोकलट्रेनमधून मराठी माणसाचा काही अपराध नसताना इतर प्रांतीयांच्या भरमसाठ घुसखोरीने जिवावर उदार होऊन प्रवास करावा लागतो. मुबईच्या बेफाट लोकसंख्यावाढीमुळे लोकल्सचे हे प्रमाण असेच व्यस्त रहाणार व मुबईकराना आयुष्यभर असाच यातनामय प्रवास रोज करावा लागणार !

## काळजी कोणालाच नाही !

मुबईची सध्याची लोकसख्या अंदाजे ९० लाख आहे. त्यातील साधारणत: ४५ ते ५० लाख लोक झोपडपट्टीत रहातात. यातील जवळजवळ साठ टक्के लोक परप्रातीय आहेत. या झोपडपट्ट्या उभ्या करण्यासाठी सामान फारसे लागत नाही व या झोपड्या मोकळी जागा, फुटपाथ, रेल्वेस्टेशनच्या बाजूची जागा, विमानतळाच्या बाजूची जागा, नरीमनपॉइंटसारखा ऑफिसेसनी गजबजलेला भाग–कोठेही उभ्या रहातात. इतर कोणत्याही सोयींच्या अभावी ते स्वतःचे आरोग्य तर बिघडवतातच पण इतर सर्वांनाच त्याचा त्रास होतो. झोपड्याच्या व एकदर लोकसंख्येच्या भरमसाठ वाढीमुळे फक्त वाहतुकीवरच त्याचा ताण पडत नाही तर अस्तित्वात असलेल्या आरोग्यसेवा, दवाखाने यावरही त्यांचा भयकर ताण पडतो.

मुबईला या रोगांपासून वाचवायचे असेल तर परप्रातीयाच्या मुबईप्रवेशावर निर्बंध घालावयास हवेत. त्याना परमिटपद्धत लागू करावयास हवी. ज्या परप्रातीयाना मुबईत येण्यापूर्वी इथे नोकरी मिळालेली आहे किंवा ज्यांना चागली नोकरी लागण्याची शक्यता आहे त्यांनाच मुबईत प्रवेश देण्यात यावा. अनधिकृत व सार्वजनिक ठिकाणच्या झोपडपट्ट्या पाडून त्यातील परप्रातीयांना महाराष्ट्र सरकारने स्वखर्चाने त्याच्या त्याच्या राज्यात सोडून द्यावे. मुबईतील शक्य असतील तेवढी सरकारी ऑफिसे व मोठे बाजार नव्या मुबईत हलवण्यात यावेत. मुबई व उपनगर परिसरात कोणत्याही लहान–मोठ्या नवीन कारखान्यास परवानगी देण्यात येऊ नये. मराठी माणसाचे हित साभाळण्यासाठी सरकारी (महाराष्ट्र सरकार) नोकऱ्यात ८० टक्के जागा मराठी लोकाकरिता राखून ठेवाव्यात. खाजगी उद्योगधद्यातही मराठी माणसांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळते की नाही याकडे महाराष्ट्र शासनाने लक्ष पुरवावे. कारण या कारखान्याचा या ना त्या कारणाने सरकारशी संबंध येतोच. परप्रातीयांकरिता मराठी भाषा सक्तीची करण्यात यावी. मराठी भाषा शिकली नाही तर नोकरी मिळण्यास अडचण येईल हे अमराठी लोकाना समजले पाहिजे. महाराष्ट्र शासनाने मुंबईच्या मराठी माणसाकरिता आता काही तरी तळमळीने या प्रश्नात लक्ष घालावयास हवे इतर राज्यातही तेथील आमदार–खासदार खुर्च्यांचे राजकारण करतात; पण स्थानिक लोकांचे हित कधीच दुर्लक्षीत नाहीत. मात्र महाराष्ट्रात तशी जाणीव राज्यकर्त्यांत दिसत नाही. राज्यकर्त्यांच्या अशा दुर्लक्षतेनेच तेलगुदेशम, द्रमुक, अकाली दल यांच्यासारखे प्रादेशिक पक्ष निरनिराळ्या राज्यांत उदयास येतात. कानडी, मद्रासी, शिख, तेलगु, गुजराथी हे सर्व लोक आपापल्या राज्यात आपले हित जपतात मग तसा प्रयत्न मराठी माणसाने केला तर त्याला संकुचित का म्हणायचे ? मुबई एक कॉस्मॉपॉलिटन असेल पण टी. व्ही. (मुबई टी. व्ही.) जो महाराष्ट्रातील निरनिराळ्या मराठी शहरात पोचलाय त्यावरील कार्यक्रम जास्तीत जास्त मराठीतच असावयास पाहिजेत; पण सध्या तशी परिस्थिती आहे का ? टी. व्ही. वर अमराठी लोकाचे व कार्यक्रमाचे वर्चस्व आहे राष्ट्रीय कार्यक्रमात तर मराठीवर अघोषित बहिष्कार घातलेला आहे. साधी साप्ताहिकी मराठीतून सागण्यात येत नाही. बडोद्याला एवढे मराठी भाषिक असताना रेडिओवर फक्त अर्धा तास (आठवड्यात) मराठीला देण्यात येतो; पण मुबई टी. व्ही वर जवळजवळ प्रत्येक मराठी कार्यक्रमाला समातर गुजराथी कार्यक्रम आहेच. हिंदी कार्यक्रमाची तर रेलचेल आहे. मद्रास किंवा कलकत्ता येथे हा अन्याय सहन केला जाईल का ? मराठी बातम्याच्या अगोदर जे चित्र दाखवले जाते त्यात महाराष्ट्राच्या मराठी संस्कृतीशी जवळीक साधणारा भाग किती आहे ? त्यातील क्रिकेटच्या चित्रात गावस्कर, वेंगसरकरसारख्याचा समावेश का नाही ? या साध्या साध्या गोष्टीत मराठी माणसाच्या भावनाची कदर केली जात नाही

नागपूर, पुणे याच्यासारखी केंद्रे क्रिकेटसारख्या लोकप्रिय खेळाची मराठीतून कॉमेंट्री करण्यास उत्साह दाखवत नाहीत नागपूरला मध्यतरी मराठी कॉमेंट्रीबाबत जो अन्याय काही हिंदी घेंडानी केला ते बिनधास्तपणे नागपुरात रहातात व मूठभर हिंदीवादी मराठीद्वेष्ट्या लोकाचे ऐकून नागपूर केंद्रावरून मराठी समालोचन नागपूरकरांना न ऐकवण्याचे धाडस करू शकतात. महाराष्ट्र शासन तिकडे बघ्याची भूमिका घेते. मराठीवरील अन्यायाचा हा प्रश्न मुंबईपुरताच मर्यादित नाही. महाराष्ट्राच्या बहुतेक मोठ्या शहरांत अमराठी लोकाची संख्या दिवसेंदिवस वाढत असून ते तेथील स्थानिक लोकावर वर्चस्व गाजवत आहेत मध्यंतरी महाराष्ट्र-आंध्र सीमेवरील दोन गावे आंध्रने आपल्या प्रदेशात दाखवली (ती दोन गावे महाराष्ट्राची आहेत) त्या बाबतीत महाराष्ट्र शासनाने काय केले ? आज निरनिराळ्या क्षेत्रांत महाराष्ट्राचे लोक चमकत आहेत. महाराष्ट्र सरकारने त्यांचा काय गौरव केला ? सुनील गावस्करने बॉयकॉटचा कसोटीतील सर्वोच्च धावांचा विक्रम मोडला, ब्रॅडमनच्या २९ शतकाशी बरोबरी केली, त्याचा कोणता बहुमान महाराष्ट्र सरकारने केला ? सुनील इतर कोणत्याही राज्याचा नागरिक असता तर एव्हाना त्या राज्यसरकारांनी त्याच्यावर बक्षिसांची खैरात केली असती. महाराष्ट्र सरकारला मराठी माणसाबद्दल आत्मीयता नाही तर ती इतराना का असावी? मग सौराष्ट्र, कोकण, मराठवाडा येथे पूरग्रस्तांना मदत करण्यात जर येथील काही लोकानी फक्त सौराष्ट्राबाबत जास्त उत्साह दाखवला तर त्याना दोषी धरता येईल का ? सिलोनमधील सिंहलीचा निषेध तामिळनाडूखालोखाल मुंबईत जोरदार झाला होता यातच सर्व काही आले. मराठी माणसाशिवाय कोणालाच मुंबईच्या भवितव्याविषयी खरीखुरी काळजी नाही ! □

## मिरज–इचलकरंजी वार्तापत्र : २

# फक्त पोलीसयंत्रणाच नाही, काही डॉक्टर्ससुद्धा अरबी पैशापुढे भ्रष्ट !

सुभाष काळे

काही लोकाचे म्हणणे अरबाचे वर्तन सभ्यपणाचे असते. ते छेडछाड करीत नाहीत किंवा कोणाला त्रास देत नाहीत वगैरे वगैरे ! मला मिळालेल्या माहितीत संधी मिळाल्यानंतर कोणत्याही अरबाचे वर्तन सभ्यपणाचे नसते हेच ठिकठिकाणी समजले. दोन–तीन वर्षांपूर्वी हे अरबलोक घोळक्या–घोळक्यांनी सबंध मिरजभर भटकत. त्या वेळी मुलीना बरोबर घेऊन फिरणे, भर रस्त्यात अगाखाद्यावर हात टाकून चाळे करणे, डोळा मारणे, हात धरून खेचणे, मुलींना मक्याची कणसे फेकून मारणे असले किती तरी प्रकार घडलेले आहेत. एक तर ते प्रतिष्ठेपायी पोलिसांपर्यंत पोचले नाहीत आणि जे पोचले ते पोलिसांनी मिटवून टाकले, त्यामुळे त्याची नोंद नाही. पोलिसांनी दुर्लक्ष केल्यानतरही एका अरबाला ' जनताशासन 'ने दिलेली एक घटना अरबाचे वर्तन स्पष्ट करणारी आहे. हॉटेल 'आरफा' जवळून मेडिकल कॉलेजची एक मुलगी जात असअसताना एका अरबाने तिला जवळ ओढून तिचे चुंबन घेतले. त्या मुलीने तात्काळ आपल्या खास भारतीय बनावटीच्या पादत्राणांचा शिक्का त्या अरबाच्या तोंडावर उमटवला व ती पोलिसांकडे गेली. पोलिसांनी दखल घेतली नाही. मग तिने मेडिकल कॉलेजमधील वर्गमित्राना ही हकीकत सांगितली. मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मात्र सरळ त्या अरबाला बाहेर खेचून त्याची चागली धुलाई केली व त्याला माफी मागायला भाग पाडले.

अरबांच्या आडदांड वर्तनाची दुसरी घटना तर सर्वश्रुतच आहे. त्याच्यावर मिरज–सांगलीच्या वृत्तपत्रानी अग्रलेखदेखील लिहिले आहेत. दिनाक २८–७–८३ रोजी दुपारी साडेबारा वाजता चंद्राबाई तपन्ना कलगुटगी ही वडार समाजातली चाळिशी उलटलेली महिला आरफा हॉटेलसमोरील रस्त्यावरून म्हशी चारायला घेऊन निघाली होती. रस्त्यावर अरबांची दोन–तीन लहान मुले खेळत होती. साहजिकच तिने त्या मुलांना म्हशीचा धक्का लागून इजा होऊ नये म्हणून उचलले व बाजूला ठेवले. हॉटेलच्या वरच्या मजल्यावरील गॅलरीत त्या मुलाचे अरबी आई–बाप बसलेले होते. त्यानी आपल्या पोराला वेळीच उचलले म्हणून चद्राबाईचे आभार मानायला हवे होते. उलट म्हशी इकडे कशाला आणल्यास, तिकडून नेता येत नव्हत्या का असे म्हणून त्यांनी चंद्राबाईला भर रस्त्यात बेदम बडविले. हा संतापजनक प्रकार पाहून साहजिकच पाच–सहाशे लोक जमले. दुर्लक्ष केले तर लोक स्वतःच अरबांना मारतील म्हणून पोलीसही आले. काही तरी करणे भाग होते म्हणून पोलिसांनी इं. पि. को. ११०, ११९ या कलमांखाली (१) मुबारक महमद अलालुमिया– ४८ (२) अब्दुल रहिमान मुबारक अलालुमिया–५० (३) श्रीमती आयोबाच मुबारक अलालुमिया व मरीयम महंमद हुसेन मोमीन या तब्बकला अटक करून दुपारी दीडला ज्यू मॅ. भोसले यांच्यापुढे उभे केले. या चौघांनीही गुन्हा कबूल केला. त्याना प्रत्येकी ५० रु दंड झाला हा भाग वेगळा.

दोन– तीन प्रकरणात अरब असे सापडल्यामुळे त्याचे भटकणे मात्र पुष्कळ बंद पडले. आता गाधीपुतळा–परिसर वगळता अरब इतरत्र भटकताना कमी दिसतात. ते बाहेर पडताना मात्र लहानशी काठी किंवा छोटीशी छडी घेऊनच बाहेर पडतात.

सर्वसाधारण भारतात येणारा अरबी माणूस बरोबर येताना परदेशी रेडिओ, टेपरेकॉर्डर्स, घड्याळे, भारी किंमतीचे कॅमेरे, उंची वस्त्रे, अत्तरे, टु इन वन व्हिडिओ कॅसेट्स बरोबर घेऊन येतो आणि परतताना कमी किंमतीत विकून टाकतो. त्यामुळे त्याचे उधळलेले निम्मे पैसे तरी वसूल होतात. मिरजेत अशा किंमतीवान वस्तू अरबाकडून घेऊन इतरत्र विक्रीस पाठविणाऱ्याचा धंदा सध्या तेजीत आहे. या वस्तू खरेदी–विक्रीचे व्यवहार काही डॉक्टरमंडळीही करतात. मिरजेच्या पुष्कळशा घरात किंवा झोपड्यांत डोकवा, इतर काही नसले तरी या वस्तू तरी असतातच. घरात कॉट–गादी एक वेळ नसेल; पण हे सर्व असते. इतके या वस्तूचे पद्धतशीरपणे वितरण झालेले आहे.

भारतात येणारे अरब ' सेक्स सॅटिसफॅक्शन ' हा भाग फार महत्त्वाचा मानतात. साठी उलटलेली असल्याकारणाने नैसर्गिकरीत्या अक्षमता आलेली असते. त्यासाठी ते पाश्चात्य पद्धतीची निरनिराळी ड्रग्स, तसेच पौर्वात्य औषधांचा फार मोठ्या प्रमाणात वापर करतात. येताना तोही सर्व ' हेवी सेक्स ड्रग्स ' बरोबर घेऊन येतो. तसेच चरस, अफीम, कोकेन, हिरॉइन, अँजेल डस्ट, गाजा, अफू यांसारखी मादक द्रव्येही आणतो. येणाऱ्या अरबांपैकी नव्वद टक्के अरब या व्यसनांच्या आहारी गेलेले आहेत. शिवाय ते मिरजेतील वास्तव्यात त्यांच्या संपर्कात आलेल्या मुली, एजट, रिक्शावाले, लॉजमध्ये काम करणारी मुले, भिकारी यांनाही त्या वाटतात. प्रथम ते स्वतःच्या खर्चाने खाऊ घालतात. हळूहळू त्यांच्या आहारी गेलेली ही मंडळी नंतर स्वत.चा खर्च करून व्यसनाची पूर्तता करतात. हे

प्रकार पोलिसापर्यंत पोचलेले नाहीत असे नाही. उलट काही पोलीसच याला बळी पडलेले असल्याकारणाने पोलीसअधिकाऱ्याना डोकेदुखी बनली आहे. प्रथम मादक पदार्थांविषयीची ही माहिती मला सा. मुनादीचे संपादक श्री. हारुन इनामदार यानी दिली. त्या वेळी अतिशयोक्तीची वाटली; पण त्यांनी सांगितलेल्या ठिकाणी गेलो असताना ते सत्य निघाले. इतकेच नव्हे तर कल्पनेपेक्षा खरे निघाले. 'मँड्रेक्स' हे गुंगी आणणारे औषध डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय मिळत नाही; पण मिरजेत ते कोणत्याही दुकानात मिळते. ४० पैशाची गोळी २० रुपयापर्यंत विकली जाते. 'पट्टी' नावाच्या एका मादक पदार्थाबद्दलही बरेच ऐकायला मिळाले. ही पट्टी जिभेवर ठेवून पाच-दहा मिनिटे चोखायची की अगदी थोड्याच वेळात नशा चढते. सुमारे सहा-सात तास माणूस धुंदीत राहतो. ती 'पट्टी' एका ठिकाणी पहायला पण मिळाली.

## स्फोटक परिस्थितीला कारण

विजयलॉजमध्ये एका अरबाबरोबर गप्पा मारीत असताना त्याने मिरजेतला मागचा दंगा टी. व्ही. वर पाहिल्याचे सांगितले. प्रथम मला ही थाप वाटली; पण दुबईहून परतलेल्या एका मित्राने ते खरे असल्याचे सांगितले. भारतात अशी कोणती तरी प्रचंड क्षमतेची परकीय न्यूज एजन्सी काम करते हे मात्र निश्चित. दंगलीचा वृत्तांत ताबडतोब व्हिडिओ फिल्मद्वारे पुरविला जातो. सोलापूर, पुणे, भिवंडी, मालेगाव या सर्व ठिकाणच्या दंगली आखाती देशातल्या लोकानी टी. व्ही. वर पाहिल्याचे मला त्या मित्राने सांगितले.

या सर्व अरब प्रकरणात हेरगिरीचाही एक भाग आहे. येणाऱ्या अरबात पाकिस्तान, चीन तसेच अन्य देशांसाठी हेरगिरी करणारे अनेक अरब येतात असे खुद्द मुस्लिम लोकांचे म्हणणे आहे. याबाबत मी काही पोलिसअधिकाऱ्याकडे विचारणा केली असता त्यांनी संदिग्ध उत्तर दिले.

एल. आय. बी. च्या लोकांनी हा थोडा भाग असावा असे अनिश्चित उत्तर दिले. मिरजेच्या परिसरात एक अतिसक्षम फिरता ट्रान्समीटर आहे, असे एका नागरिकाने सांगितले. ही त्याची कवी कल्पना आहे की काय हे तपासून पाहण्यासाठी पोलीसअधिकाऱ्यांनाही विचारले असता त्यांनी 'आमच्या वायरलेस व दळणवळणात वारंवार अडथळे येतात हे खरे; पण ते प्रक्षेपण करीत असताना 'फ्रीक्वेन्सी' एक आल्याने होतात की वादळामुळे होतात, का इतर अन्य कारणाने होतात हे निश्चितपणे सांगता येणे कठीण आहे असे उत्तर दिले. हाच विषय मी परत जिल्हाधिकारी श्री. रत्नाकर वाघ यांच्याशीही बोललो. तर ते म्हणाले की, असे काही नाही; पण देशपांडे नावाच्या व्यक्तीला घराचे बांधकाम करीत असताना काही तरी सापडले होते आणि त्याने मला फोनवरून, अरब लोकांत काही जण विघातक कृत्य करणारे आहेत असे सांगितले होते. त्याने विघातक कृत्य म्हणजे नेमके काय ते स्पष्ट केलेले नव्हते. तरी पण मिरजेत याविषयी बरेच काही ऐकायला मिळते हे मात्र खरे आहे. ही बाब अशी आहे की, माझ्यासारख्या पत्रकाराला त्याचा अखेरपर्यंत छडा लावता येण्यासारखा नाही. त्यामुळे खरे किती, खोटे किती किंवा या सगळ्या अफवा जाणूनबुजून पिकवल्या जातात हे सांगणे अवघड आहे. सुरक्षिततेचा प्रश्न असल्याने अफवा असतील तरी त्यांचा बारकाईने तपास होणे देशाच्या हिताचे आहे.

अरबलोक भारतीयाना अतिशय तुच्छ लेखतात. त्यानी केलेल्या दानधर्मात सरळपणा, धर्मभावना, दया, प्रेम, सहानुभूती यापेक्षा छचोरपणा अधिक असतो. भारतातील गोरगरिबांच्या हालअपेष्टा बघण्यात त्याना मौज वाटते. दानधर्म ही त्याच्या दृष्टीने करमणूकच असते. एक प्रसंग इथे देण्याजोगा आहे. एकदा सायकाळी साडेसहाच्या सुमारास हिरा हॉटेल चौकापासून गांधीपुतळ्याकडे असाच भटकत चाललो होतो. डॉ. जैन आहेत का पहावे म्हणून त्याच्या 'पद्मा क्लिनिक'च्या गेटपाशी आलो तर ही गर्दी ! सुमारे पाच-पंचवीस स्त्री-पुरुष भिकारी एकमेकाना ढकलताना दिसले. काय प्रकार आहे पहावे म्हणून सहज आत डोकावलो तर एक अरब खिशातली एकेक रुपयाची नाणी गॅलरीतून खाली टाकीत होता. ते नाणे घेण्यासाठी भिकाऱ्याची चाललेली धडपड पाहून तो व बाकीचे अरब आनंदाने ओरडत होते टाळ्या पिटीत होते !

अरबानी या प्रकाराखेरीज आठ-नऊ वर्षांच्या मुलीना नाचायला लावणे, बासरी, खंजिरी, ढोलके वाजविणाऱ्याना दिवस दिवस वाजवायला लावून त्याच्यावर पैसे उधळून स्वतःची भरपूर करमणूक करून घेतली आहे. अरबाच्या वास्तव्याच्या ठिकाणी या लोकाचे घोळकेच्या घोळके पहायला मिळतात.

मिरज-सांगली ही वस्तुतः जुळी शहरे आहेत. तसे पाहता दोन्ही शहरात आता अजिबात अंतर उरलेले नाही. पुण्या-मुंबईतला माणूस जसा दररोज आपल्या कामानिमित्त उपनगरात जातो-येतो तसे हे मिरजेचे लोक सांगलीत आणि सांगलीचे लोक मिरजेत येत-जात असतात. मिरजेत येणारा कोणताही माणूस सहसा सांगलीला जातोच आणि सांगलीत आलेला माणूस सहज फेरफटका मारायला म्हणून का होईना मिरजेत चक्कर मारतो; पण असे असले तरी सांगलीत अरबांना अजिबात फिरकू दिले जात नाही. मध्यंतरी एक-दोन अरब सांगलीत आले असताना लोकांनी त्याना सरळ बडवून काढले. शिवाय रिक्शावाल्यालाही झोडपून परत पाठविले. एवढी जबरदस्त चीड त्यांच्याबद्दल सांगलीच्या लोकांत आहे. सांगलीप्रमाणेच इचलकरंजी, कोल्हापुरात तर एक भला मोठा बोर्ड लावून 'अरब हटाव मिरज बचाव' असे त्यावर लिहिले होते. मिरजेत अरबानी पैसा ओतून फक्त सामाजिक प्रश्नच निर्माण केले आहेत असे नाही तर हिंदु-मुस्लिम संघर्षही वाढविला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात किंवा स्वातंत्र्यानंतरची पधरा-वीस वर्षे मिरजेतील हिंदु-मुस्लिम गुण्यागोविंदाने नांदत होते. त्यात अरबानी पेट्रो-डॉलरच्या जोरावर बिब्बा घालून संघर्ष निर्माण केला आहे. हीच परिस्थिती कायम राहिली तर मालेगाव, भिवंडीमागोमाग मिरजेतली परिस्थितीही स्फोटक बनल्याशिवाय राहणार नाही. आज मिरज शहराची लोकसंख्या १ लाख ५ हजार आहे. त्यात तीस ते चाळीस हजार मुस्लिम आहेत. मिरजेत दरवर्षी सुप्रसिद्ध 'मिरासीबाबाच्या' दर्ग्याचा उरूस भरतो. त्यात हिंदु-मुस्लिम दोन्ही समाजांचे लोक सहभागी होतात. किंबहुना हिंदूच अधिक असतात. दर गुरुवारी दर्ग्याला भेट देणाऱ्यातही हिंदू अधिक असतात हे मी स्वतः दर्ग्याला भेट देऊन पाहिले आहे. मिरजेतले हे एकोप्याचे वातावरण टिकवायचे असेल तर अरबाच्या गैरवर्तनावर नियंत्रण हे घातले गेलेच पाहिजे !

## मिरज . . . दुबई

आखाती देशातील परिस्थिती मिरजेतल्या अरबांच्या प्रश्नाच्या संदर्भात विचारात घ्यायला हवी. दुबईत सहा मोठाली हॉस्पिटलस् आहेत. शिवाय प्रत्येक आखाती देशाचे प्रतिनिधित्व करणारे कुवेत हॉस्पिटल' इराणी हॉस्पिटल, 'अलरशिद हॉस्पिटल' सारखी अनेक हॉस्पिटलस तिथे आहेत. तसेच निरनिराळ्या आखाती देशांतली हॉस्पिटलस वेगळी. या सर्व ठिकाणी मोफत औषधोपचार मिळत असला तरी अरबी माणूस भारतात का येतो ? या प्रश्नाचे उत्तर एकच-मौज-मजा करण्यासाठी मुख्यत: बाई-बाटलीची मजा चाखण्यासाठीच ! आखाती देशात स्त्रीविषयक कायदे अतिशय कडक आहेत. स्त्रियांना बाहेर फिरण्यास, बोलण्यास बंदी आहे. साहजिकच ते इतरत्र जाऊन आपली इच्छा पूर्ण करून घेतात. 'सौदीअरेबिया' हा आखाती देश तर मुस्लिम सनातन्यांचा अड्डाच आहे. तेथे स्त्री-स्वातंत्र्य तर नाहीच नाही पण भारतातून गेलेल्या कोणत्याही भारतीय हिंदूला देवाची घरातल्या घरात पूजा करायलादेखील बंदी आहे. तेव्हा भारतातील स्त्रियांना तेथे कसे वागविले जात असेल याची कल्पना केलेलीच बरी !

दुबई हे आखाती देशाचे सर्वांत मोठे व्यापारी केंद्र. हे एक चांगले बंदर आहे. आखाती देशांकडे येणारा सर्व माल या बंदरात उतरविला जातो व तेथून तो इतर देशांना पुरविला जातो. दुबई फ्री पोर्ट असल्याने तेथे मालावर कोणताच कर नसतो. त्यामुळ जगातल्या अत्याधुनिक वस्तूंची तिथे अक्षरश: रेलचेल असते. त्यामुळे रंगीत टी. व्ही. सेट, भारी कॅमेरे, घड्याळे, टेपरेकॉर्डस्. व्ही. डी. ओ. कॅसेट-सारख्या वस्तू अतिशय स्वस्तात मिळतात व त्याच वस्तू काही काळ वापरून अरबलोक मिरजेत आणून विकतात.






यु. ए ई.-संयुक्त अरब अमीरात हे छोट्या आखाती देशाचे एक मंडळ आहे. यातला सर्वांत मोठा व सर्वांत श्रीमंत देश म्हणजे 'अबुधाबी' 'अबुधाबी'त दोन प्रचंड रिफायनरीज आहेत. या संयुक्त अरब अमीरातीतला 'अजमान' हा देश सर्वांत लहान देश आहे. 'अलएन', 'फुजेरा' हेही चिमुकले देश. अशी सुमारे सतरा छोटी छोटी राष्ट्रे या आखाती देशांत समाविष्ट आहेत. 'रसअल', 'खैमा', 'शारजाह', 'दुबई' हे तेलासाठी विशेष प्रसिद्ध. अर्थात तेलाशिवाय या देशांजवळ इतर काही नाही. 'पाण्या'पासून 'पिण्या'पर्यंतची प्रत्येक गोष्ट त्यांना इतर देशांकडून विकत घ्यावी लागते. साहजिक या वस्तूंना अरबांसारखे गिऱ्हाईक लाभले म्हणून या वस्तूंची निर्यात वाढली.

आखाती देशात 'दराम' हे चलन वापरात आहे. त्याला अरबी डॉलर, पेट्रो डॉलर असेही म्हणतात. 'दराम'चा दर बँकेत २.७ ते २.८ रुपये असा असला तरी सर्वसाधारणपणे अरबी माणूस साडेतीन रुपयाला एक 'दराम' देतो. आखाती देशांतील सरकार अरबी नागरिकांना स्वत:च्या खर्चाने सर्व सुखसोयी पुरवीत असतात. तेथल्या कामगारांना किमान सातशे दराम म्हणजे- २४५० रुपये पगार मिळतो. अर्थात हे वेतन परकीय कामगारांसाठी आहे. तेथल्या स्थानिक अरबाला किमान दोन हजार 'दराम' म्हणजे ७००० रु. पगार मिळतो. हा झाला चतुर्थ श्रेणी कामगाराचा पगार. 'सममा'त तेथल्या अरबाला नोकरी दिली जात नाही आणि 'सममा'तला अरब ती करीतही नाही. गरजच काय ? कारण तेथले सरकार त्याला बेकारी-भत्ता म्हणून सोळाशे 'दराम' म्हणजे पाच हजार सहाशे रुपये देते. शिवाय प्रत्येक बायकोला सहाशे दराम (२१०० रु.), प्रत्येक मुलामागे अडीचशे दराम (११०० रु.), एवढे मिळत असल्यावर चैन सोडून काबाडकष्ट कशासाठी करायचे ?

आखाती देशांतल्या अरबांची तेलउद्योगातली स्ट्रॅटेजी लक्षात घेण्याजोगी आहे. आखाती देशांतल्या कायद्याप्रमाणे प्रत्येक धंदा अरबाच्या नावावर असतो. धंद्यातले ऐंशी टक्के भांडवल अरबाचे व वीस टक्के भांडवल परदेशी माणसांचे. आखाती देशांत भांडवल गुंतविणाऱ्यात सर्वाधिक भारतीय असल्याकारणाने हे भारतीयांचे भांडवल असे म्हणायला हरकत नाही. यातली मेख अशी की, अरबी माणूस प्रत्यक्षात भांडवल गुंतवत नाही, तर तो भारतीय माणसाच्या वीस टक्के भांडवलावरच धंदा उभा करतो. भांडवल, मॅनेजमेंट सर्व काही भारतीय असले तरी कागदोपत्री नाव मात्र अरबांचे असते. 'अरब स्लीपिंग पार्टनर' असतो. त्यामुळे थोडीफार जरी गडबड भारतीय माणसांनी केली तरी त्यांच्या हातात लगेच नारळ दिला जातो. भारत सरकारचे अरबांच्या बाबतीत नेहमी बोटचेपेपणाचे धोरण असते. त्यामागे हे तर कारण नसावे ना ? अशी शंका वाटते. ते काहीही असो अरबी माणसाला कोणतेही परिश्रम न घेता भरपूर पैसा मिळतो !

हे झाले उद्योगधंद्याच्या बाबतीतले. तेथल्या 'नागरिकत्वा'चे कायदेही पाहण्याजोगे आहेत. आखाती देशांतल्या कायद्याप्रमाणे 'अरब' हा तेथला प्रथम दर्जाचा नागरिक. त्यामुळे सर्व हक्क, सवलती प्रथम त्यांना, नंतर इतरांना. भारतीय मुस्लिम आणि पाकिस्तानी मुस्लिम हे दोन्ही धर्माने मुस्लिम असले तरी त्यांना

परकीय नागरिक म्हणून– हिंदू-ख्रिश्चनाप्रमाणेच वागविले जाते. 'सुदान', 'दक्षिण येमेन', 'इजिप्त' मधले काळे अरब त्याना 'आफ्रो अरब' म्हणतात त्याना इतर अरबापेक्षा दुय्यम स्थान असले तरी परकीय मुस्लिमापेक्षा उच्चस्थान दिले जाते. इजिप्त-सुदानमधील लोकाना पोलीसखात्यात नोकरी मिळते. भरपूर पगार, सर्व सुखसोयी त्यामुळे 'लाच' हा प्रकार कमी. साहजिकच परकीय माणसाच्या हातून कधी चूक घडते याचीच ते वाट पहात असतात. किरकोळ गुन्हा का असेना तेथले पोलीस परकीयाना लगेच हाकलतात हे लक्षात घेण्याजोगे आहे.

सर्वसाधारण 'अरबी' माणसाची प्रवृत्ती 'विचार' काय असतात, स्वत.ची भोगलालसा पूर्ण करून घेताना त्यांच्या मनात इतरांबद्दल काय विचार येतात हे जाणून घेण्यासाठी काही अरबाबरोबर मी बोललो. एकाबरोबर इंग्रजीत, एकाबरोबर हिंदीत तर बाकीच्यांबरोबर अरबी भाषा येणाऱ्या दुभाषाच्या मदतीने. इंग्रजी किंवा हिंदी येणारे अरब अगदी फारच क्वचित. बोटावर मोजण्याइतकेच. बाकी त्याना अरबीशिवाय दुसरी कोणतीही भाषा येत नाही. त्यांच्याशी बोलताना प्रकर्षाने जाणवतो तो शिक्षणाचा अभाव. असंस्कृतपणा. तेथील सरकार त्याना त्यांच्या गरजेपेक्षा व पात्रतेपेक्षा जास्त पैसा देते. त्यामुळे शिक्षणाची त्यांना गरज वाटत नाही. कमी प्रयत्नात जर भरपूर मिळत असेल तर त्यासाठी जास्त धडपडायचे नाही. 'इटस ए ह्यूमन सायकॉलॉजी' त्याला अरब कसे अपवाद असतील ?

दुसरा भाग 'निकाह' बाबतचा. श्रमाशिवाय लाखो रुपये खिशात पडत असल्याकारणाने चैन किती करावी व कोणती करावी हे या हिरवट लोकाच्या टाळक्यात शिरत नाही. त्यामुळे त्यांनी अनेक लग्ने करणे यावरच आपले लक्ष केंद्रित केले आहे. अक्षरशः त्यांच्यात लग्नाच्या स्पर्धा लागलेल्या असतात ! अंगावरचे कपडे बदलावे इतक्या सहजतेने पंधरा–वीस 'निकाह' ते लावतात. विजय लॉजमध्ये उतरलेला सईद दुबईहून आला होता. गेल्या पंधरा–वीस वर्षात तो अनेक वेळा मिरजेत येऊन गेला आहे.

'तुमच्याकडे किती लग्नाची परवानगी आहे ?' असे मी त्याला विचारले.

बावळटासारखे मी काही तरी विचारतो आहे असा चेहरा करून त्याने उत्तर दिले,

'हा काय प्रश्न झाला ? किती म्हणजे ? चार करू शकतो, आठ करू शकतो; इतकेच काय पंचवीसदेखील करू शकतो ! कोणी किती लग्ने करावीत हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे.'

'समजा, मी तुमच्या देशामध्ये आलो तर मला किती लग्ने करता येतील ?' ... मी.

'एकही नाही !' ... सईद.

'का ?' ... मी.

## आमचे कायदे कडक आहेत !

'का म्हणजे ? आमच्या देशांतला कायदा तसा आहे. आमच्या देशातले कायदे कोणते असावेत आणि कोणते नसावेत हे तुम्ही कोण ठरविणार ? आमच्या येथे येऊन कोणाही परकीय माणसाला, मग तो हिंदू असो की मुस्लिम, त्याला 'निकाह' लावता येत नाही. कोणत्याही स्त्रीशी, इतर देशातल्या पुरुषाचा संबंध येता कामा नये हे जसे कटाक्षाने पाळले जाते तसे येथून आम्ही नेलेल्या स्त्रीवरदेखील बंधने आहेत. ती फक्त आमच्या देशातल्या अरबाशीच संबंध ठेवू शकते. समजा तिला 'तलाक' दिला गेला किंवा तिला दुसऱ्याला विकले किंवा तिला वेश्याव्यवसाय करायचा असेल तर तिने हे सर्व व्यवसाय फक्त अरबांशीच केले पाहिजेत ! इतर देशातल्या पुरुषाशी संबंध ठेवणाऱ्या स्त्रीला आम्ही चारित्र्यशून्य समजतो. अशा स्त्रीला व तिच्याशी संबंध ठेवणाऱ्या परकीय पुरुषाला जाहीरपणे फटके मारले जातात किंवा दोघानाही कमरेइतक्या खड्डयात पुरून त्याना दगड मारले जातात किंवा अन्य मार्गाने ठार मारले जाते ! निरनिराळ्या आखाती देशांत निरनिराळे कायदे, प्रथा, जीवनपद्धती वेगवेगळी असली तरी हा कायदा सर्वत्र सारख्याच कडकपणे पाळला जातो. तुम्ही पत्रकार आहात त्यामुळे तुम्हाला चांगले माहीत असेल की, गेल्या 'वर्षी 'गुलाम परकार' नावाच्या भारतीय मुसलमानास अशाच गुन्ह्याबद्दल ठार मारण्यात आले होते !'

'तुमच्या देशांत स्त्रीवर बलात्कार करणाऱ्या व्यक्तीला काय शिक्षा दिली जाते ?' ... मी

'आमच्याकडील व्यक्ती सहसा कायद्याच्या कचाट्यातून निसटू शकत नाही. तिला ठार मारले जाते.'

'तुम्ही इंग्लंड, अमेरिका किंवा मुंबई–हैद्राबादला न जाता बहुसंख्येने मिरजेत का येता ?' असे विचारले असता तो म्हणाला–

'आम्ही तुमच्यापेक्षा श्रीमंत आहोत हे खरे; पण इंग्लंड–अमेरि-

*With Best Compliments From :*

**A. T. MAGDUM & COMPANY**
Main Road, Sangli 416 416

*Distributors :*
Mudis & Assam Tea
Parle Products

*Phones* : Off. : 3460
Res : 2844
*Gram* : 'MAGDUM'
SANGLI

N. P. Chewing Gum Products

केला जाण्याएवढे श्रीमंत नाहीत. मुंबई–हैद्राबादला पैसा फार खर्च होतो. त्यामानाने मिरज स्वस्त आहे. येथील हवामान चांगले आहे. दवाखाने चागले आहेत. त्या दृष्टीने मिरज परवडते.'

'तुमच्याकडील कडक कायद्याच्या गोष्टी करता. मग तुम्ही इथे असे का वागता? तुम्ही मिरजेत औषधपाण्याच्या निमित्ताने येता हेच मुळी खोटे आहे!' असे म्हणताच प्रथम तो दोन–तीन मिनिटे गप्पच बसला. मग त्याने माझ्याबरोबर असलेल्या हिंदू एकताच्या प्रभाकर चौगुले, काशीद, जीवन जामदार वगैरे कार्यकर्त्यांकडे पाहिले आणि मग म्हणाला–

'पत्रकारसाहेब, जी गोष्ट स्वस्त असते ती खरेदी करण्याकडे सर्वांचाच कल असतो. स्त्री हा विषयच असा आहे की, अन्न, पाणी, वस्त्राइतकीच कुदरतने त्याचीही आवश्यकता निर्माण केली आहे. आम्हाला आमच्या देशात कपड्याचा एक सेट शिवायला जेवढे पैसे लागतात तेवढ्या पैशात किंबहुना त्याहीपेक्षा कमी पैशात आम्हाला येथ बाई मिळते. मग आम्ही ती का स्वीकारू नये?'

कानात तापलेले तेल ओतावे तसे ते शब्द माझ्या कानाला झोंबले. सईदच्या त्या निर्लज्ज शब्दानी हिंदू एकताचे कार्यकर्तेही प्रक्षुब्ध झाले; पण त्यांना मी चटकन आवरले.

'मस्कत'च्या इब्राहिम नजमन हाजी, मुत्तराह, सुलतान ऑफ ओमान याची डॉ. अरबरगीच्या दवाखान्यात भेट घेतली. त्याला हिंदी चांगले बोलता येत होते. त्याच्याबरोबर त्याचा मित्र खमीस बिन इद हाही होता. खमीसच्या पोटाला कसली तरी गाठ झाली होती. त्यावर औषधोपचार चालू होते. प्रथम तो डॉ. गायकवाड यांच्या दवाखान्यात होता. तीन दिवसात त्याचे बिल ४६०० रुपये झाले होते. त्यानंतर डॉ. गायकवाडानी त्याला हाकलल्याने त्याने डॉ. अरबरगीच्या दवाखान्यात आश्रय घेतला होता.

'मिरजेतील लोकाबद्दल तुम्हाला काय वाटते?' असा प्रश्न मी विचारला त्यावर त्याने 'भाईसाब, वैसे तो यहाँ के लोग ठीक हैं. मगर डॉक्टरलोगोंपर हमारा गुस्सा है!' असे उत्तर दिले.

'यहाँ आपके इधर के जो लोग आते हैं वो ठीक तरहसे बर्ताव नही करते. क्या आपको यह ठीक लगता?'... माझा प्रश्न.

'देखो साब, ठीक तो नहीं लगता. मगर हम विदेशी लोग क्या कर सकते हैं? यहाँ के कानून ही ऐसे हैं जिससे यहाँ आते ही सब बिघड जाते हैं.'

इब्राहिम नजमन हाजीला हिंदी चांगले येत असल्याने त्याच्याशी अजून गप्पा मारायची माझी इच्छा होती; पण त्याला दुसरीकडे कुठे तरी जायचे असल्याने तो उठला. मीही आवरते घेतले.

त्यानंतर फैज हाजी, अहमद सलाल, नदाफ मज्जिद वगैरे अरबांबरोबर अनेक विषयांवर दुभाषाच्या मदतीने चर्चा केली. सर्वांच्या बोलण्यातून एकच जाणवले, पैशाची घमेंड! भारतीय माणूस मग तो हिंदू असो किंवा मुस्लिम, ते सर्वांनाच तुच्छ समजतात. अरबाच्या खाण्यापिण्याच्या, राहण्याच्या सवयी मात्र कमालीच्या गलिच्छ वाटल्या. ते राहतात त्या ठिकाणी फार घाण करतात हे मला विजय, आरफा, गुलमोहर लॉजमध्ये प्रत्यक्ष पहायला मिळाले.

अरबी माणूस शरीराने धिप्पाड असला तरी अतिशय भित्रा असतो. कदाचित अरबाची हीच गोम लक्षात आल्याने दहा कोटी अरबांच्या विरोधात ५६ लाख इस्रायली लोकांनी उभे ठाकण्याचे धाडस केले असावे. सुरुवातीला मी एक–दोन अरबाना फोटो घेऊ देण्याची विनंती केली. 'शूरा, शूरा'–म्हणजे फोटो फोटो असे दुभाषाने सांगताच, कशाला, काय म्हणत त्यानी चक्क पळ काढला! फोटो म्हटले की, सगळेच अरब तसे करायचे. मग मी गप्पात त्यांना गुंगवून ठेवून, त्यांच्या नकळत तीन-चार फोटो काढले.

## मिरजेत दुबई–रोड

हा झाला अरबाचा सर्वसाधारण अनुभव; पण त्यांच्या उतावळेपणाचे एका फोटोच्या निमित्ताने घडलेले दर्शनही इथे सागण्याजोगे आहे फोटोला अरबांचा विरोध असतो तसाच त्यांची 'तब्बक'; एजंट, लॉजवाले यांचाही विरोध असतो. धंद्यावर परिणाम होईल म्हणून, तसेच भीतीने घाबरून फोटोसाठी कोणीही मदत करीत नाही. वयात तफावत असलेल्या जोडप्याचा फोटो मला हवा होता; पण प्रयत्न करूनही तो कोणी घेऊ देत नव्हते. माझी ही अडचण मी एका पोलीसमित्राला सांगितली. त्याने सहकार्य करण्याचे मान्य केले. एक दिवस रात्री असे एक जोडपे एका लॉजवर असल्याचे समजले. त्यावरून मी, फोटोग्राफर व तो पोलीसमित्र असे तिघेजण रात्रीच्या दहाच्या सुमारास सदर लॉजवर पोचलो. त्या विशिष्ट रूमच्या दरवाजावर टकटक करताच दरवाजा उघडला गेला. अक्षरशः सत्तरी ओलांडलेला अरब आणि १५–१६ वर्षांची भारतीय मुलगी! जेवण संपवून ते नुकतेच झोपले होते. नको त्या वेळी आम्ही टपकलो. त्यामुळे त्या अरबाचा चागलाच हिरमोड झाला. आमच्या अचानक झालेल्या आगमनाने ते दोघेही कमालीचे घाबरले होते. अधिक गोंधळ नको म्हणून त्या जोडप्याची माहिती आम्हाला पुरविलेल्या दुभाषाने त्याना आमचा फोटोचा हेतू सांगितला. समोर ड्रेसवरला पोलीस उभा असल्याने त्यांनीही फारसे आढेवेढे घेतले नाहीत. उलट 'तुम्हाला फोटोच पाहिजेत ना! काही हरकत नाही. हवे तेवढे घ्या!' असे तो अरब अरबीत बोलला. त्या दोघाना जवळजवळ बसण्याची फोटोग्राफरने सूचना केली तेव्हा तर त्या अरबाने

---

### डॉक्टरला काय कळतंय?

मिरजेत अनेकांच्या तोंडून ऐकलेला एक किस्सा–

साधारणतः तीन–चार वर्षांपूर्वी एक अरब आपल्या एजंटाच्या मदतीने एका डॉक्टरांकडे गेला. डॉक्टरानी त्याला काळजीपूर्वक तपासले आणि तंदुरुस्त असल्याने कोणतेही औषध न घेण्याचा सल्ला दिला. डॉक्टरला काही कळत नाही म्हणून आपण दुसरीकडे जाऊ, असा सल्ला एजटने अरबाला दिला व त्यालाही तो पटला. नंतर ते दोघेही दुसऱ्या डॉक्टराकडे गेले. डॉक्टरमहाशयानी त्या अरबाची निरनिराळ्या पद्धतीने तपासणी करून ऑपरेशन करावे लागेल असे सांगितले. तोही तयार झाला. डॉक्टरनी त्याला ऑपरेशन–थेएटरमध्ये नेऊन भूल दिली व पोटाचा थोडा भाग कापून पुन्हा पूर्ववत टाके घातले. सहा–सात दिवसानतर डिस्चार्ज मिळाला. ऑपरेशनफी म्हणून डॉक्टरांनी १० हजार रुपये मागितले. आपल्यावर चागला उपचार केला म्हणून त्या अरबाने डॉक्टरांना पाच रुपये जादा देऊन धन्यवाद दिले! ◻

चक्क तिच्या गळ्यात हात टाकून पोज दिली व आम्ही समोर असतानाही तो तिचे चुंबन घेऊ लागला. ती बिचारी लाजेने मान खाली घालून प्रतिकार करीत होती, तर हा धटिंगण तिला बळजबरीने तयार करीत होता. त्यांचे चाळे मर्यादेबाहेर जायला लागले. आमचे फोटोचे काम संपलेले होते. आम्ही चटकन् तेथून पाय काढता घेतला. तो अरब इतका उतावीळ झाला होता की, आम्ही खोलीबाहेर पडण्याची देखील वाट पहायला तो तयार नव्हता!

अरबी माणूस दुसऱ्याला फोटो काढू देत नसला तरी स्वतः मात्र हवे तसे फोटो काढतो, हे मिरजेतल्या कोणत्याही फोटोग्राफरकडे गेल्यानंतर आपोआप समजते. एका पो. सब-इन्स्पेक्टरांनी 'अरब लोक खोलीत स्वयंचलित कॅमेरे बसवून रात्रीच्या कार्यक्रमाची चित्रे घेतात' अशी माहिती दिली. त्यांचा उपयोग ते काय करतात हे त्यांनाच ठाऊक; पण बहुतेक अरब तसे करतात. एका जोडप्याची अशी एक फिल्म हस्तगत केल्याचे पोलिसांनी सांगितले. माझ्या भेटीच्या वेळी त्यांच्याबरोबर ती फिल्म नसल्याने पाहायला मिळाली नाही.

हिरा हॉटेल ते गांधीपुतळा या रोडचे नाव शिवाजीरोड आहे असे ऐकले; पण प्रत्यक्षात तो 'दुबईरोड' म्हणून ओळखला जातो. या रोडवरून भटकताना, अरबांनी भरलेली हॉटेले, रस्त्यावरून येणारे–जाणारे अरब, अरबी भाषेतले बोर्डस् आणि इतर झपाट्याने होत चाललेले अरबीकरण पाहिले की, आपण चुकून अरबस्तानात तर आलो नाही ना, अशी मनाला शंका चाटून जाते. या वातावरणनिर्मितीत फार मोठी भर डॉ. नाग, डॉ. जैन यांच्या दवाखान्यांवरील अरबी भाषेतील बोर्डांनी घातलेली आहे. ज्यांच्या निमित्ताने अरबांचे आगमन झाले, ज्यांनी अरबांचा जास्तीत जास्त फायदा लाटला आणि काही गैरप्रकारांना जो अधिक कारणीभूत ठरला तो वर्ग म्हणजे डॉक्टरांचा! मध्यंतरी सा. मुनादीने अरबांशी संबंधित असलेल्या डॉक्टरांची एक भली मोठी यादीच प्रसिद्ध केली होती. त्यात बिगरमुस्लिम डॉक्टरांनी अरबांकडून भरमसाठ पैसा लुटल्याचे जाहीर केले होते. अरबांच्या पैशावर ज्यांनी आपल्या दवाखान्याच्या प्रचंड इमारती उभ्या केल्या त्यात ऐंशी टक्के डॉक्टर्स हिंदू आहेत हे पूर्णपणे खरे आहे. तसेच गैरमार्गांनी पैसा मिळवला हेही खरे आहे. अवघी एक लाख पाच हजार वस्ती असलेल्या मिरजेत पानपट्टीच्या दुकानांपेक्षा दवाखानेच जास्त आहेत, असे लोक थट्टेने बोलतात. प्रत्येक रोगासाठी अस्तित्वात असलेल्या दवाखान्यांची संख्या पाहता मिरज शहर हे भारतातील सर्वांत मोठे रोगग्रस्त शहर म्हणून जाहीर करावे लागेल, हे एका पत्रकाराचे म्हणणेही रास्तच आहे. एवढी प्रचंड इस्पितळे मिरजेतील लोकांच्या पैशांवर उभी आहेत हे स्पष्टच आहे.

## डॉक्टरसुद्धा भ्रष्ट !

सर्वसाधारणपणे मिरजेतले डॉक्टर भारतीय पेशंटकडे पूर्णपणे दुर्लक्ष करतात; पण तेच अरबी पेशंट पाहिला की, या डॉक्टरांच्या तोंडाला पाणी सुटते! आपली सारी यंत्रणा, कौशल्य आणि त्याचबरोबर लाचारी पणाला लावून ते आपले खिसे भरतात. मिरजेतील स्थानिक लोकसंख्येच्या प्रमाणात बाहेर देशाहून येणाऱ्या अरबांची



**डॉ. जैन यांच्या 'पद्मा क्लिनिक'समोरील अरबी बोर्ड**

¤

संख्या दोन ते तीन टक्के इतकीच आहे. त्यातले सर्वच पेशंट समजले तरी या नगण्य तीन टक्क्यांसाठी डॉक्टरमंडळी जीव टाकतात. त्यांच्या राहण्यासाठी खोल्या, स्वयंपाकासाठी तब्बक, त्यांना वाचता यावेत म्हणून अरबी भाषेतले बोर्डस्! काही काही उणीव ठेवीत नाहीत.

टॉन्सील, अपेंडिक्ससारख्या अनेक ग्लॅंडन्स मानवी शरीरात असतात. त्या त्रासदायक ठरतात तेव्हाच त्या काढणे आवश्यक असते. शरीरात त्या आहेत म्हणून काढून टाकणे हे शरीरशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे, असे मिरजेतल्या एका प्रथितयश डॉक्टरांचे मत; पण मिरजेत घडते ते नेमके उलटे! अरब पेशंट तपासणी करून घ्यायला येतो न येतो तोच डॉक्टर त्याला अल्सर आहे, अपेंडिक्स आहे असे सांगतात आणि त्याला टेबलावर झोपवून लगेच पोट फाडून मोकळे होतात. अपेंडिक्स, अल्सर, टॉन्सील यावर मिरजेत आजपर्यंत जेवढी ऑपरेशन्स झाली तेवढी जगाच्या पाठीवर कुठेही झाली नाहीत ही डॉक्टरांनीच दिलेली माहिती विचार करण्याजोगी आहे!

मिरजेत फी किती घेतली जाते? एका अपेंडिक्स स्पेशॅलिस्टने एका अरबाकडून साठ हजार रुपये घेतल्याचे मला त्याच दवाखान्यात काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याने सांगितले, तर टॉन्सीलसाठी अरब पेशंटकडून टॉन्सील–ऑपरेशन–फी म्हणून डॉक्टरांनी २३ हजार रुपये घेतले असे खुद्द त्या पेशंटनेच सांगितले!

इंग्लंडमध्ये 'न्यूरो सर्जरीसाठी' चार वर्षे काढलेल्या डॉक्टरांनी पाठीच्या कण्यावर जेवढी ऑपरेशन्स मिरजेत झाली तेवढी इंग्लंडमध्येही झाली नाहीत असे सांगितले. असाच एक अरब रस्त्यावरून घसरून पडला. हाताला लहानशी जखम झाली. साहजिकच डॉक्टरकडे गेला. डॉक्टरने त्यावर हैड्रोजन पॅराक्साइड सोडले आणि हे औषध फार भारी आहे, केवळ तुझ्यासाठी मी आणले आहे असे सांगून पट्टी बांधून टाकली आणि तीन हजार रुपये घेतले, बरे! या डॉक्टरांनी पेशंट ॲडमिट करून घेतल्याची नोंद, तारीख, केस-पेपर,

ट्रीटमेंट रेकॉर्ड, बिल, बिलाचे रेकॉर्ड ठेवायला काय हरकत आहे ? पन्नास टक्के डॉक्टरांकडे यापैकी काहीएक नाही !

बरेच दवाखाने (त्याना दवाखानेदेखील का म्हणावे हा प्रश्न आहे.) मी असे पाहिले की, खाली दवाखान्याचा बोर्ड आणि उपयोग मात्र लॉजसारखा. अरबाच्या राहण्याची, जेवणाची, लग्नाची, मधुचंद्राची सोयदेखील या दवाखाना कम लॉजमध्ये असते. पोलिसानी खैरनिसावर घातलेल्या धाडीत हैद्राबादच्या मरीयमचे वास्तव्य फैसा नावाच्या अरबाबरोबर अशाच एका दवाखान्यात होते. पोलिसानी सर्वांवर कारवाई केली; पण त्या डॉक्टरावर मात्र केली नाही. काही काही डॉक्टर तर यापेक्षा हुषार निघाले. त्यांनी नर्सेस म्हणून चार-पाच 'तब्बकाच' ठेवून टाकलेल्या आहेत. त्या अरबांची देखभाल करतात, त्यांना खाऊ-पिऊ घालतात आणि अरबाची इच्छा असेल तेव्हा त्याच्याबरोबर झोपतातही ! डॉक्टराच्या हातात याबद्दल एकवट रक्कम मिळते !

काही डॉक्टरांच्या दवाखान्यावर भले मोठे बोर्ड आहेत; पण डॉक्टराचा मात्र तिथे पत्ता नसतो ! रेडिओ, टेपरेकॉर्डरसारख्या स्मगलिंगच्या वस्तूंच्या विक्रीपासून 'तब्बक' पुरवठापर्यंतचे सर्व व्यवहार तिथे चालतेले असतात. डॉक्टराच्या नावाचा बोर्ड असतो खरा; पण डॉक्टराच्या डिग्रीचा मात्र उल्लेख नसतो ! काही काही डॉक्टर तर एवढे माजले आहेत की, ते भारतीय पेशंटना चक्क 'तुम्ही येथे येऊ नका तुमची गरज नाही !' असे स्पष्टपणे बजावतात. त्याच्या दृष्टीने भारतीय पेशंट म्हणजे कुत्री ! डॉक्टर जैन–डॉ

# विधायक दृष्टिकोन

अरब हटाव मोहिमेमुळे मिरजेतील वातावरण तंग आणि तणावाचे दिसून येते. अरबांमुळे हिंदू आणि मुस्लिम यांच्यात तेढ निर्माण झाल्याचे पहावयास मिळते. औषधोपचाराच्या किंवा अन्य काही निमित्ताने अरब लोक व्हिसा मिळवून भारतात येतात. त्यांच्या येण्याबद्दल दुमत असावयाचे कारण नाही. मात्र आलेल्या अरबानी एकूणच मिरज शहरात जो धुमाकूळ घातलेला आहे, ती चिंतेची व लक्षणीय बाब आहे. अरबांच्या मिरजेतील वास्तव्यामुळे लॉजवाले, रिक्शावाले, धदेवाले, एजट व डॉक्टरलोकांची मिरजेमध्ये आज चलती पहावयास मिळते. मात्र अरबाची एकूणच वागण्याची पद्धत पाहिल्यास त्यामुळे जनतेचा नैतिक दर्जा खालावत चाललेला दिसून येतो. परिस्थितीने श्रीमंत असलेल्या अरबाचे पैशाचे जोरावर अल्पवयीन व गरीब मुलीच्याशी लग्न लावण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर दिसून येतात व अशा स्त्रियांना त्याज्य करून दुसऱ्या स्त्रियाशी अनैतिक सबंधठेवणे यासारख्या गोष्टीकडे अरबांची प्रवृत्ती दिसून येते. त्यामुळे आज शेकडो स्त्रियाना त्यानी जीवनातून उठविले आहे. गेले कित्येक दिवस अरबांचे हे लाजिरवाणे, किळसवाणे प्रकार चालू असल्याचे वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेच आहे दिवसाढवळ्या अरबांची ही अनैतिक प्रकरणे सुरू असतात. मात्र सरकारी यंत्रणेकडून त्यावर योग्य प्रकारचे नियत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला जात नाही असे दिसते. अर्थातच अरबाच्या या लज्जास्पद वागण्याचा परिणाम चांगल्या माणसाच्या जीवनावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि सुरुवातीपासूनच अरबाच्या वागण्यावर योग्य ते नियंत्रण न ठेवल्यामुळे त्यानी श्रीमतीच्या जोरावर स्वत.चे वागण्यावर निर्बंध ठेवलेले नाहीत. अशा प्रकारे मिरजेतील अरबांच्या वास्तव्यामुळे तेथील समाजाकडे लोकांचा पाहाण्याचा दृष्टिकोनसुद्धा बदलत चाललेला पहावयास मिळतो. त्यामुळे वेळीच सरकारने या प्रकरणात विशेष लक्ष घालून मिरजेतील एकणच सामाजिक, सास्कृतिक, धार्मिक वातावरण बदलण्याची गरज तीव्रतेने जाणवते. मिरजेतील अरबाच्या वास्तव्याबद्दल केवळ मुस्लिम बांधवाना दोषी धरून चालणार नाही. कारण अरब–वास्तव्याला सर्वधर्मीय लोक जबाबदार आहेत असे म्हणता येईल. मात्र आपल्यातील काही मुस्लिमांना आणि इतर धर्मीयांना अरबाबद्दल निष्कारण प्रेम व आदर वाटत असेल तर ते अत्यंत घातक व देशद्रोहीपणाचे ठरेल ! आपण त्याच्याकडे मानवतावादाच्या दृष्टिकोनातून पहावयास मुळीच हरकत नाही; पण पैशाचे सहाय्याने किंवा अन्य मार्गाने आपणास ते लाचार बनवीत असतील तर त्याची आपण वेळीच दखल घेतली पाहिजे. जातीयवादी मंडळीनी राष्ट्रवादाची जोपासना करण्याची आज गरज निर्माण झाली आहे. हिंदू एकता-संघटना व मुस्लिम यांच्यात जरूर काही मतभेद असतील. त्याची चर्चा वेगळया व्यासपीठावर योग्य वेळी करून चर्चेतून प्रश्न सोडविता येतील. मात्र त्यासाठी हिंदु एकता-संघटनेने अरब हटाव मोहीम सुरू केल्यास त्यास इतरांनी विरोध करण्याची आवश्यकता नाही. आपण प्रश्न समजून घेऊन तो सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. विधायक प्रश्नाला विरोध करून निष्कारण शक्ती व वेळ खर्च करण्यात फारसा अर्थ नसतो. वास्तविक मोठ्या सख्येने असणाऱ्या अरबांच्या वास्तव्यामुळे मिरजेचे स्वरूपच बदलून गेले आहे गेल्या चार–पाच वर्षांत हिंदु–मुस्लिम यांच्यात तणावाचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येते. असे वातावरण राहणंसुद्धा राष्ट्रीय ऐक्याच्या व प्रगतीच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे. ही परिस्थिती कायम राहिल्यास त्याचे दूरगामी परिणाम सर्वत्र वाईटच दिसून येतील. वास्तविक लोकप्रतिनिधीनी या अरबाच्या प्रश्नावर विधानसभेत आवाज उठविण्यास हरकत नव्हती. किंबहुना तेथील जनतेची भावना विचारात घेऊन आपली ठोस भूमिका माडणे आवश्यक होते. मात्र लोकमताच्या दबावाचा विचार करून दुर्लक्ष केले असण्याची शक्यता आहे. अरबाच्या प्रश्नाचा विचार राजकारणाच्या दृष्टिकोनातून न करता राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिकोनातून होण्याची गरज आहे. त्यासाठी सरकारने हरप्रयत्ने हा प्रश्न सोडवून हिंदू आणि मुस्लिम याच्यात ऐक्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

–प्रा. शिकंदर जमादार
शांतिनिकेतन महाविद्यालय,
सागली

जागृत जनमत

गायकवाड हे दोघेही अशा उद्धटपणाबद्दल प्रसिद्ध आहेत. या दोघाच्याही उद्धटपणाचा अनुभव मला आला. पत्रकारांशी बोलण्याची गरज वाटत नाही असे सांगून डॉ. गायकवाड यांनी मला व.टेला लावले तर जैनमहाशयांनी माझे नाव 'सा. माणूस'मध्ये आल्यास याद राखा! अशी तबी दिली.

### चोराच्या उलटचा....

डॉ. जैन यांना भेटलो त्या वेळचा प्रसंग. हिंदु एकताच्या चौगुल्याना उद्देशून ते म्हणाले, 'तुम्ही असा गोंधळ घालून अरबाचे मिरजेतील येणे बंद करू नका. तुम्हाला देणगी किंवा वर्गणी म्हणून पैसे हवे असल्यास मी पाच हजार रुपये देईन! मी पण हिंदु आहे. मला हिंदुत्वाचा अभिमान आहे; पण मोर्चा, घोषणा हा काय मूर्खपणा?'

यावर प्रभाकर चौगुल्याने डॉक्टर जैनांना चांगले मासलेवाईक उत्तर दिले, 'डॅाक्टर, तुम्ही 'मी हिंदू आहे असे सागून हिंदूची बदनामी करू नकात!' तुमच्यासारख्या डॅाक्टरांनी मग ते हिंदू असोत, ख्रिश्चन असोत किंवा मुस्लिम असोत. धर्माचे नाव घेऊन धर्म बदनाम करू नये. ज्याप्रमाणे गुन्हेगार किंवा समाजकटकांना धर्म नसतो तसा तो तुमच्यासारख्या डॅाक्टरांनाही नसतो!'

प्रभाकर चौगुलेंच्या उत्तराने भडकलेले डॅाक्टर जैन तावातावाने म्हणतात, 'मी येथल्या लोकावर मुळीच अवलंबून नाही. मी कुठेही जाऊन प्रॅक्टिस करू शकतो. परदेशातले लोक तर मला फार चाहतात. तेथे गेलो तर लाखोच काय करोडो रुपये मी मिळवीन!'

त्यावर मी म्हटले, 'जैनसाहेब, आपण अवश्य जा. मुबईहून तासातासाला परदेशात जाणारी विमाने सुटतात. तिथे करोडो रुपये मिळतात तर मग आपण इथे कशासाठी वेळ घालविता आहात?'

अशा या जैनमहाशयांनी पत्रकार नालायक आहेत, ब्लॅकमेलिंग करतात, हप्ते गोळा करतात अशा अनेक तक्रारी माझ्याकडे केल्या. 'चोराच्या उलटचा बोबा' दुसरे काय? जैन डॉक्टर सागलीतील दै. नवसंदेशच्या श्री. गोपाळ भोसल्यांवर कोर्टात केस भरणार आहेत म्हणे. अरबांकडून डॉक्टरमंडळी भरपूर पैसा उपटतात ही पत्रकाराची मुख्य तक्रार नाही. तक्रार आहे ती पेशंटवर ज्या अनावश्यक शस्त्रक्रिया केल्या जातात, अयोग्य औषधोपचार केले जातात, त्याबद्दल. याबद्दल 'इंडियन मेडिकल असोसिएशन' काही पावले उचलेल म्हटले तर 'प्रॅक्टिकली शी इज डेड!' या शब्दात एका डॉक्टरानी ती आशा धुळीला मिळविली.

अरब प्रश्नाशी सबधित असलेल्या सर्व डॉक्टराची भेट घेण्याचे मी ठरविले होते. त्यात डॉ. गोसावी याचाही समावेश होता. डॉ. गोसावी हे मिरजेतले एक लीडिंग प्रॅक्टिशनर. त्याना भेटायला गेलो असता प्रथम त्यांनी या विषयी मला काही बोलायचे नाही. बदनामी करणारे, अफवा पसरविणारे, ब्लॅकमेलिंग करणारे बरेच आहेत व ते आपल्या मरणाने स्वत: होऊनच नष्ट होतील, त्याना विनाकारण महत्त्व देण्याचे कारण नाही, असे म्हटले.

त्यावर मी,या सर्व प्रकरणात डॉक्टराचीही एक बाजू असू शकते; योग्य की अयोग्य हा भाग निराळा ती बाजू मला समजून घ्यायची आहे. या चिघळलेल्या प्रकरणात आपल्या देशाच्या हिताच्या दृष्टीने काही सूचना असतील, ज्यामुळे परिस्थितीत काही सुधारणा होऊ शकेल अशा सूचना मला ऐकायच्या आहेत. असे म्हटल्यावर डॉक्टर दहा-पधरा मिनिटे माझ्याशी बोलले.

'काळे, मी तुमचा वॉन्लेसवाडीतील रिहॅबिलिटेशनसेंटरवरील सा. माणूस' मधला लेख वाचला आहे. तसेच सा. माणूसही नेहमी वाचतो. तुमच लिखाण एकागी नसते, याची मला कल्पना आहे मी वतुमचे स्वागत करतो; पण तुम्ही जर सर्व डॉक्टराना एकत्रित करून बोलणार असाल तर बरे होईल.'

'पण सर्व डॉक्टराना एकत्रित आणणे मला अवघड वाटते. —मी!'

'का? त्यात काय अडचण आहे? आम्ही लॉयन्स रोटरीत एकत्र येतो. त्या वेळी तुम्ही यायचे.' –डॉक्टर

'डॉक्टर, आपली कल्पना चागली यात शंका नाही; पण माझी आणि तुमची वेळ एकत्र येणे, सर्व डॉक्टर्स म्हणजे, मी ज्याना भेटू इच्छितो ते येणे हे जरा अशक्य वाटते. शिवाय दोघे-तिघे चर्चा करण्यात जो मोकळेपणा आहे, तो तिथे असणार नाही. सर्व डॉक्टरमंडळी ठरवून बोलणार. त्यामुळे मला हवे ते त्यातून निष्पन्न होणार नाही. आज जर तुम्हाला वेळ नसेल तर मी नतर येईन.'

'चालेल! मी थोडा गडबडीत आहे काही लेक्चर्स चालू आहेत मेडिकल स्टुडंटसमोर. परवा या. येण्यापूर्वी फोन करा. पूर्वतयारी या दृष्टीने आता काही मुद्दे सांगतो. या विषयावर माझीदेखील


MARATHE TEXTILE MILLS

*Prop. : Balwant Textile Mills Pvt. Ltd., Miraj.*

*Manufacturers and Exporters of*

Carded, Combed, Medium, Fine & Superfine
Cotton and Blended Yarn.

*

*Regd Office & Factory*

2823, Shri Govindraoji Marathe Road,
MIRAJ – 416 410

Phone : 2291 (5 Lines) Gram : Maratex–Miraj.
Telex : 0193–206 MTMM

*Bombay Office :*

79, Nariman Bhavan, 7th Floor,
Nariman Point,
BOMBAY – 400 021

Phone : 23 31 47 and 23 21 47
Telex : 011 – 4809 MTMB

लिखाण करण्याची इच्छा आहे. नोट्स काढल्या आहेत; पण व्यवसायामुळे वेळ मिळत नाही. असो हे पहा काळे, तुम्ही आचार्य रजनीशाना पुण्यातून घालविले नुकसान कोणाचे झाले ? किती तरी परकीय चलन बुडाले. शिवाय त्या निमित्ताने अनेक व्यावसायिक उभे राहिले होते. ते कोसळले. तसे माझे म्हणणे, अरबांना हटविण्याचे धोरण चुकीचे आहे. मिरजेत त्यांना येणे बद केले तर ते अन्य कुठे तरी जातील. त्यांना काय, पैसा आहे त्यांच्याजवळ. उलट त्यांच्या निमित्ताने काही लोक जगताहेत ते उपाशी मरतील. याचा अर्थ अरबाच्या अनैतिक चाळ्याकडे दुर्लक्ष करावे असे माझे म्हणणे नाही, तर गैरप्रकाराना आळा घालावा.

'टुरिस्ट गाईड्स 'नेमावेत, त्यांची लुबाडणूक होणार नाही हे पाहावे. कोणताही अरब आपल्या घरात घुसून बाई नेत नाही, तर आपल्यापैकीच काही जण त्याना बायका नेऊन देतात. बंदोबस्त करायचा तर त्याचा करा. सर्वच अरब तसे नाहीत. त्यांच्यातही काही चांगले आहेत. त्यांच्याकडून मला पत्रे आली आहेत. ती तुम्हाला नंतर दाखवितो. मी मेडिकल कॉन्फरन्सच्या निमित्ताने जगभर हिंडलो आहे. तेथील माणसे स्वत:ला झळ सोसून प्रवाशाना सांभाळत नाहीत, तर गोडगोड बोलून पैसा काढतात. स्वित्झर्लंडमध्ये तर खिसे रिकामेच करावे लागतात; पण त्याचे वाईट वाटत नाही. कारण ते सभ्यपणाने वागून, बोलून पैसा काढतात. 'टूरिझम' हा आपल्या देशाच्या अर्थकारणाचा महत्त्वाचा भाग आहे. असे असताना आपण अरबांना हटाव म्हणणे योग्य आहे का ?'

'ठीक आहे डॉक्टर ! तुमचे विचार मला अधिक सविस्तरपणे ऐकायचे आहेत. तेव्हा नतर येतो.'

## डॉक्टरी धंदा–एजंट

दहा मिनिटाच्या चर्चेत डॉक्टर मोकळेपणाने बोलले. नंतर दोन–तीनदा फोन केला. तर स्नानाला गेले आहेत, बाहेर गेले आहेत, ऑपरेशनथिएटरमध्ये आहेत अशी उत्तरे मिळाली. डॉक्टरांच्या व्यवसायाचा व्याप पाहता ती खोटी असतील असे वाटत नाही; पण त्यामुळे आमची नतर भेट होऊ शकली नाही.

ज्यांनी वैद्यकीय व्यवसायावर चिक्कार पैसा मिळविला; पण अरबांच्याकडून एक पैसाही प्राप्ती न झालेले किंवा नसलेले डॉक्टर म्हणजे एन. एस. पाठक, माजी आमदार. यापूर्वीची त्यांची ओळख असल्याने प्रास्ताविकाची गरज भासली नाही. मी सरळ विषयालाच हात घातला.

'अरे बाबा, त्या अरबांचा–माझा काय संबंध ? माझ्याकडे कोणी अरब पेशट म्हणून कधी आला नाही किंवा त्यांच्याकडून मला कधी चार पैसेही मिळाले नाहीत तेव्हा मी त्यात काय सांगणार ?' –डॉक्टर पाठक.

'तसे नव्हे डॉक्टर. आपण मिरजेतले एक जागरूक नागरिक आहात, सामाजिक कार्यकर्ते आहात, महाराष्ट्राच्या विधिमंडळात काही काळ तुम्ही लोकांचे प्रतिनिधित्व केले आहे. तेव्हा तुमचे या विषयीचे विचार–सूचना ऐकण्याची माझी इच्छा आहे–' मी.

'हे पहा काळे, आपल्या परराष्ट्रीय धोरणामुळे, पर्यटनकायद्यामुळे व इतर राजनैतिक संबधामुळे 'टूरिस्ट' म्हणून अरबांना टाळता येणार नाही किंवा घालविता येणार नाही. 'अरब हटाव असे म्हणताच येणार नाही !'–डॉक्टर

'पण काहींचे तसे म्हणणे आहे ना, त्याचे काय ?'

'होय आहे ! पण ते चुकीचे आहे. गैरप्रकार होतात, तर पोलीस जादा ठेवा, कडक नजर ठेवा. अन्य सुधारणा करा. या सर्व प्रकाराला पोलिसाचा भ्रष्टाचार आणि शासनाचा गलथानपणा कारणीभूत आहे. मी मेडिकल कॉन्फरन्सच्या निमित्ताने पूर्व आणि पश्चिमेकडील अनेक देशांना भेटी दिल्या आहेत. रशियातही गेलो. ठिकठिकाणी परदेशी प्रवाशांच्या बारीक–सारीक हालचालीवर लक्ष ठेवणारी, त्यांची नोद घेणारी व त्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करणारी स्वतत्र यंत्रणा असते. तसे येथे का नाही ? शासनाने मनात आणले तर ते होऊ शकेल काळे, त्यातला दुसरा भाग असा की, येथे येणाऱ्या अरबांना दाखविण्यासारखे मिरजेत काही नाही; पण त्यांना 'विजापूरचा गोलघुमट', 'बिदर' 'पन्हाळा' ही स्थळे दाखविता येतील. गेल्या महिन्यात झालेल्या एस. टी. बोर्डाच्या बैठकीत मी गेव्ह आवारी याना दोन लक्झरी बसेस ठेवण्याची सूचना केली आहे. शिवाय पर्यटनमहामडळाने येथे एक मार्गदर्शनकेंद्र सुरू करावे. सुशिक्षित गाईड ठेवावेत. वर्षाला १० कोटी रुपयाइतके प्रचंड परकीय चलन मिळत असताना शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे आणि त्यातून हे सर्व प्रश्न निर्माण झाले आहेत.'

डॉक्टर पाठकांनतर डॉ. कुलकर्णी व डॉक्टर थॉमस याची भेट घेतली. डॉ. थॉमसनी सुमारे एक तास माझ्याशी अगदी मनमोकळेपणाने गप्पा मारल्या. त्यांना मराठी वाचता येत नाही, बोलता येते; पण मराठी बोलताना अडखळतात. तरीदेखील त्यांनी इग्रजीचा आधार घेत माझ्या प्रश्नाना समाधानकारक उत्तरे दिली.

डॉक्टर जैन याना मी, एजंटाचा वापर डॉक्टर्स का करतात असे विचारले असता, ते म्हणाले होते, 'डॉक्टर हा काही ब्रह्मदेव नाही. पेशट्ला काय होते ते त्याला विचारून घ्यावे लागते. आम्हाला भाषा येत नसल्याने दुभाषा म्हणून एजंटाचा आधार घ्यावा लागतो आणि दुसरा भाग म्हणजे डॉक्टरानी एजटाचा आधार का घेऊ नये ? शेवटी तोही एक धदाच आहे.' (आय पे मोअर कमिशन अँड कलेक्ट मोअर मनी दॅट्स् ऑल राइट. )

हाच प्रश्न मी डॉक्टर थॉमस याना विचारला. तेव्हा ते चटकन म्हणाले, 'नो. नो, एजंट इज नॉट नेसेसरी अॅट लिस्ट इन अवर ऑक्युपेशन. सर्वसाधारणपणे पेशटला काय होते हे डॉक्टराना सहज समजू शकते. त्यासाठी एजटची काय गरज आहे ? भारतात इंग्रज डॉक्टर आले तेव्हा येथे कुठे दुभाषा होता ? किंवा आपले भारतीय लोक परदेशात गेल्यानंतर असेच एजंट गाठतात का ? काळे, त्याची मुळीच गरज नाही. ज्याचा दवाखाना चालत नाही, त्यांनी हे उद्योग करावेत. माझ्याकडेही एजंटस् किती कमिशन देता म्हणून विचारायला येतात, नाही असे नाही; पण मी त्यांना दवाखान्याची पायरी देखील चढू देत नाही ! मला माझ्याबद्दल खात्री आहे. माझे व्यावसायिक कौशल्य पाहून स्वत: पेशंट माझ्याकडे येतात. एजटाने त्याला इतरत्र कोठेही नेले तरी तो शेवटी माझ्याकडे येतोच हा माझा गेल्या अनेक वर्षांचा अनुभव आहे !'

डॉक्टर थॉमसना अरबांच्या चाळ्याबद्दल विचारले असता ते म्हणाले,

अरबाना मुली पुरविणाऱ्या आपल्याच देशांतल्या लोकांच्या वर्तनामुळे, त्याचा असा एक समज झाला आहे की, भारतात पैसा दिला की कोणतीही स्त्री आपण मिळवू शकतो. येथील सर्वच स्त्रिया जणू तशा आहेत; पण अशा प्रकारे पैशासाठी शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रिया संख्येनं अगदी फार थोड्या आहेत हे त्यांना पटत नाही. आय अॅम अ ख्रिश्चन अँड यु आर ए हिंदु; परंतु आपल्या देशात सामाजिक संकेतानुसार रस्त्यावरून चालताना किंवा सार्वजनिक ठिकाणी पत्नीच्या गळ्यात हात टाकून फिरत नाहीत. कारण ती आपली संस्कृती आहे. परंपरा आहे. आपल्या समाजाला मग तो कोणत्याही धर्माचा असो, असा मुक्तपणा मान्य नाही. हे अरब समजून घेत नाहीत. ते समजून घेत नाहीत म्हणण्यापेक्षा आपल्यापैकी जे लोक त्यांच्या संपर्कात येतात ते त्यांना तसे सांगत नाहीत. शेवटी ते परकीय नागरिक आहेत. त्यांनी औषधोपचारासाठी जरूर यावे, मौज करावी. पण त्यांनी आमच्या देशातील कायद्याप्रमाणे, सामाजिक संकेताप्रमाणे वागावे. आपण परदेशात गेलो असता तेथे आपल्याला हवे तसे वागता येत नाही हे लक्षात घ्या. त्याबाबत नुकतीच घडलेली एक घटना सांगतो. माझ्या दवाखान्यात एक अरब पेशंट येथे काम करणाऱ्या एका बाईच्या मागे लागला. तिने त्याला झिडकारले. आरडाओरडीमुळे मी तिथे पोचलो. तरीही त्याची तिच्याशी लगट करण्याची धडपड चालूच. शेवटी मी त्याला चांगले खडसावले. तेव्हा त्याने खिशातल्या नोटांचे पुडके काढून तिच्यासमोर धरले. नंतर मी त्याला हाकलून दिले हा भाग वेगळा. त्याने ती बाई पैशासाठी नकार देते आहे हा जसा गैरसमज करून घेतला तसा माझ्याही बोलण्याचा करून घेतला. त्याला वाटले, पैसे देण्याआधी तिला हात लावू नकोस असे हा म्हणत असावा. म्हणून त्याने नोटा काढल्या. ही आमच्या येथे घडलेली पहिलीच घटना. हे लोक आपापल्या देशात परतल्यानंतर आपल्या देशाविषयी काय बोलत असतील याचा तुम्हीच विचार करा !!

## शहाणे असाल तर परत जा !

'बदनामी' शब्दावरून गोवावीर मोहन रानडे यांच्या एका पत्राची आठवण झाली. मोहन रानडे यांनी त्यांचे सहकारी-सांगलीचे श्री. बापूराव साठे यांना पोर्तुगालच्या तुरुंगातून पाठविलेले हे पत्र आहे. लिस्बनच्या तुरुंगात असताना पोर्तुगीज वृत्तपत्रातून भारतात किती गरिबी आहे, रस्तोरस्ती लोक झोळ्या घेऊन कसे भटकतात याची काही छायाचित्रे प्रसिद्ध झाली होती. ती छायाचित्रे श्री. साठे यांना पाठवून रानडे लिहीत होते...

... *बापू, आपल्या भारतात हे काय चालले आहे ? आपले मान्यवर मंत्री परदेशात अन्नधान्यासाठी झोळी घेऊन फिरत असल्याचे वाचतो. माझ्या अंतःकरणाला अक्षरशः घरे पडतात आपण कोठे जाणार आहोत ? आपण खरोखरच का इतके दरिद्री आहोत ? जसे दुसरे देश जगतात तसे जगण्याइतपतही आपल्या देशात साधनसामुग्री, सपत्ती नाही काय ?* असे श्री रानडे पत्रांतून विचारतात.

मिरजेत सर्वत्र जाणवते ती दहशत, दडपण. कोणाकडेही जा तो या विषयावर मोकळेपणाने बोलूच शकत नाही.

यात सर्वांत जास्त दडपण कोणाचे असेल तर 'चाकूवाली' ऊर्फ खैरुन्निसाचे. जुन्या एस. टी. स्टँडचौकातील ट्रॅफिक पोलिसांच्या चौकीत गप्पा मारीत बसलो असताना एका पोलिसाला मी सहज तिचा पत्ता विचारला. हा पोलीस चाळीस-पंचेचाळीसचा. आतापर्यंतची बहुतेक चाकरी 'ट्रॅफिकवर' झालेली. त्याने प्रश्न केला, 'काळेसाहेब, आपले लग्न-बिग्न झालेले आहे का ?

'हो ! झाले आहे की, सव्वा वर्षाची एक मुलगी आहे मला—' माझे उत्तर—

तो पोरीच्या किंवा अन्य जवळच्या कोणा तरी कन्येच्या विवाहाच्या चिंतेने ग्रासलेला असावा, असे मला प्रथम वाटले. माझ्या उत्तराने त्याच्या चेहऱ्यावर काही प्रतिक्रिया उमटते का म्हणून त्याच्याकडे पाहिले तर तो म्हणतो—

'शहाणे असाल तर परत जा. आपल्या बायका-पोरात जाऊन खुशाल बसा. संपादकाना सरळ सांगा जमत नाही म्हणून, ती बाई कसली आहे तुम्हाला कल्पना नाही. तुम्हाला माहिती तर मिळणारच नाही; पण तिने अगर इतर तिच्या कोणा माणसाने तुम्हाला कुठे फेकून दिले तर पत्ता लागणार नाही! अरविंद कऱ्हाडकराचे (तरुणभारतचे वार्ताहर) काय झाले तुम्हाला माहीतच आहे. त्याच्या नावाने हजारो रुपये गोळा करून त्याच्या पत्नीला दिले हे खरे; पण माणूस गेला त्याचे काय ? माणसाची किंमत पैशाच्या भरपाईने कुठे होते का ?

ट्रॅफिक-हवालदाराचे म्हणणे मी थट्टेवारी नेले असले तरी त्याच्या बोलण्यात बराच तथ्यांश होता. या कॉन्स्टेबलसारखाच सल्ला मला अनेकांनी दिला. खैरुन्निसाची दहशत ठिकठिकाणी जाणवली. 'जेम्स-


॥ श्रीराम ॥

# मे. कुलकर्णी बन्धू

**हरभट रोड, सांगली.**

डिस्ट्रिब्यूटर्स–सिरॅमिक प्रॉडक्टस, खानापूर,
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर प्रा. लि.

**खास प्रेझेन्टेशन आर्टिकल्ससाठी**
**एकमेव ठिकाण !**

बाद' पत्रकारितेत राजमान्यता पावलेले, मुबईच्या अनेक अंडर ग्राउड वर्ल्ड शापळघात शिरून लीलया बाहेर पडलेले श्रमंतीकार, शिवसेनेचे आमदार प्रमोद नवलकर हे खैरुन्निसाविषयी दिनाक ११।८।८३ नवशक्तीच्या अंकात लिहितात– 'वाचकहो, मिरजेत गेली पंधरा वर्षे स्वत.ची प्रचड दहशत निर्माण करून आपले साम्राज्य प्रस्थापित करणाऱ्या खैरुन्निसाच्या मिरजेतील लीला गेल्या आठवडयातच नवशक्तीतून प्रसिद्ध झाल्या. मिरजेच्या त्या वार्तापत्रात खैरुन्निसाच्या मिरजेतील मर्यादित लीला वर्णिल्या आहेत; पण वार्तापत्रात म्हटल्याप्रमाणे ही बाई सामान्य गुन्हेगार नसून एक महाभयंकर सैतान आहे ! सर्वांत संतापाची गोष्ट म्हणजे या बाईने राजरोसपणे एवढे थैमान घातलेले असताना मिरजेतील–म्हणजेच महाराष्ट्रातील–पोलीस तिच्या केसालाही धक्का लावू शकले नाहीत! या खैरुन्निसाचे धंदे केवळ मिरजेपुरतेच मर्यादित नसून संपूर्ण भारत-भर, इतकेच नव्हे तर अरब राष्ट्रांपर्यंत अव्याहत चालू राहिले आहेत !

तिच्या त्या महाभयंकर साम्राज्यावर एक वर्षापूर्वीच या भटक्याने तपशीलवार प्रकाश टाकला होता. त्याची प्रतिक्रिया एवढीच झाली की, मिरजेहून आणि मुबईहूनही चार–सहा धमक्यांची पत्रे आली. त्यातील एका पत्रावर रक्त म्हणून कोणता तरी लाल पदार्थ शिपडला होता. सगळी पत्रे केराच्या टोपलीत गेली; पण आजही खैरुन्निसाची दहशत मिरजेत इतकी जबरदस्त आहे की, गब्बरच्या भाषेत बोला-यचे झाल्यास मिरजेतील लहान मूल दूध पीत नसेल तर आई त्याला खैरुन्निसाचा धाक दाखवते ! वाचकहो, सर्व गुड पदराशी आणि उदड पैसा हाताशी खेळविणाऱ्या या गुन्हेगार बाईला महाराष्ट्रातील पोलीस हातही लावू शकले नाहीत यासारखी लांछनास्पद गोष्ट नाही आणि आज शेवटी पोलिसाची लाज गेली ! आध्रातून पळवून आणलेल्या मुलीच्या शोधार्थ हैद्राबादच्या पोलिसांची फौज मिरजेत डेरेदाखल झाली आणि त्यांनी खैरुन्निसाच्या साम्राज्यावर धाड घालून तिला आणि तिच्या एका साथीदार बाईला, त्याचप्रमाणे आणखी एका मुसलमान गुडाला अटक केली. आज ते चौघेही हैद्रा-बाद पोलिसाच्या ताब्यात असल्याने खैरुन्निसाचे महाराष्ट्रातील सारे लागेबाधे तुटून पडले आहेत; पण तेवढयाने खैरुन्निसा संपली असे या भटक्याला वाटत नाही. कारण खैरुन्निसाच्या कार-वायाच्या आंतरराष्ट्रीय कक्षा पाहिल्यावर तिचे दिल्लीचे भरपूर लागेबाधे आहेत असे मानण्यास भरपूर जागा आहे आज खैरुन्निसाला संपवून हजारो मुलीच्या अब्रूचे आणि जीविताचे रक्षण करायचे असेल तर जागृत समाजाने तिच्यावर चहूबाजूनी हल्ले चढविले पाहिजेत ! यावरून खैरुन्निसा किती भयंकर प्रकरण आहे हे लक्षात येऊ शकेल !

## तब कहाँ जाती है ईमानदारी ?

अशा या महाभयकर खैरुन्निसाची आणि माझी भेट मात्र अक-ल्पित झाली. दिनांक १३ नोव्हेंबर रोजी सकाळी नऊ–साडेनऊच्या सुमारास मी हिराहॉटेल चौकातील एका ओळखीच्या माणसाचा पत्ता शोधीत नेमका खैरुन्निसाच्या दारातच जाऊन उभा ठाकलो. बाहेर एक–दोन रिक्षा उभ्या होत्या. तिचे वर्णन आधी ऐकले होते. त्यावरून ती खैरुन्निसाच असली पाहिजे असा मी तर्क केला.

'आप किस को मिलना चाहते हो ?' या तिच्या प्रश्नाला मा लगेच प्रतिप्रश्न केला, 'आपका नाम खैरुन्निसा ही है ना ?'

'जी हाँ, बोलो क्या काम है ?' तिने एका दमात म्हटले. त्यावर मी तिला माझी स्वत:ची ओळख करून दिली. येण्याचा हेतू स्पष्ट केला. हातात 'सा. माणूस' चा दिवाळी व इतर अंक होते ते मी तिला दाखविले. अक चाळत तिने दारासमोर असलेल्या सोफ्यावर बसा म्हटले. ती स्वत.ही बाजूला बसली. सा. 'दिनाक' कडूनही इचलकरजी भागातला कोणी तरी पत्रकार आला होता असे सागून तिने पुढे बोलायला सुरुवात केली–

'क्या बताऊँ साब, मेरे पास कौन कौन नही आता ? यहाँ के पुलीसवाले आते है, बडे बडे ऑफिसर आते है, आमदार, खासदारही नही बल्की मिनिस्टरभी आते हैं. जब उनको पैसा लगता है तो सिर झुकाकर आते है, जब लडकी लगती है तो रातभी सोचते नही और दिनभी सोचते नहीं यहाँ आके बैठते है. मगर बादमें यह सब लोक हरामखोरी करते है. हप्ता होना, पैसा होना. 'बगैर टचकी' छोकरी होना तब खैरुन्निसा याद आती है. तब कहाँ जाती है इनकी ईमानदारी ?'

या वेळी खैरुन्निसाने अनेकांची नावे घेतली. अर्थात तिच्या बोल-ण्यावर किती विश्वास ठेवायचा हाही प्रश्नच आहे. मागे एकदा तिने तिला अटक करून पोलीसकस्टडीत ठेवले असता एका सब-इन्स-पेक्टरावर लॉकअपमध्ये असताना सिगारेटचे चटके दिल्याचा आरोप केला होता. कोर्टात तिच्या आरोपाचे खंडन झाले. खैरुन्निसा खोटे बोलते हे सिद्धही झाले असले तरी खैरुन्निसावर कारवाई न होण्या-मागे कोणाचे तरी समर्थ हात असले पाहिजेत या सशयाला मात्र फारच बळकटी येते.

पंधरा–वीस मिनिटाच्या भेटीत खैरुन्निसा माझ्याशी व्यवस्थित बोलली तरी तिचा पहाडी आवाज, तिची एकदम तुटून पडण्याची वृत्ती यावरून ती पळवून आणलेल्या मुलीना किती जरबेत ठेवीत असेल याचा अदाज करता येतो. आमचे हे बोलणे चालले असतानाच रिक्षावाल्याला खुणावले. लगेच तो भरकन् निघून गेला आणि एका धिप्पाड माणसाला घेऊन आला. खैरुन्निसाने त्याची ओळख करून दिली. 'हा माझा भाऊ मोहिद्दीन सय्यद पत्रकार आहे. 'सत्यसमा-चार' नावाचे साप्ताहिक चालवितो. मला आश्चर्याचा धक्का बसला. हा माणूस साप्ताहिक चालवितो म्हणजे नेमके काय करतो ते समजेना.

काळेसाहेब; तुमच्या भेटीने मला आनंद झाला; पण आज निवडणुकीच्या गडबडीत आहे तेव्हा आपण उद्या जर भेटलात तर बरे होईल. असे मराठीत म्हणून त्याने स्वत: राहत असलेल्या–मंगल टॉकीजजवळील घराचा पत्ता दिला व आवर्जून भेटण्यास सांगितले.

दोन–तीन दिवसानी मी मोहिद्दिनच्या भेटीस गेलो. त्याने सोयीचे ठिकाण म्हणून एका सलूनमध्ये बसू यात असे म्हटले. चहा मागविला. तिथे तिघे–चौघेजण होते. तासाभराच्या चर्चेत त्याने पोलिसांच्या भ्रष्टाचाराच्या व अत्याचाराच्या अनेक हकीगती सागितल्या ! निघताना त्याने 'साप्ताहिक सत्य समाचार'चे जे दोन अंक भेट

दिले त्यातील मजकूर त्याच्या बोलण्याशी सुसंगतच होता या एक पानी लंगोटी-पत्रात–३१ मार्च ८३ च्या अंकात–पहिल्या पानावर एकूण चार बातम्या आहेत. त्यातील 'पोलीसखात्याच्या लाचखाऊ कारभारामुळे गुन्ह्यानी व गुन्हेगारानी बरबटलेले संपूर्ण मिरज शहर'; 'आर. पी. एफच्या भ्रष्टाचारी कारभारामुळे रेल्वेमालमत्तेचे अतोनात नुकसान' आणि 'रेल्वे-पार्सल-खात्यातील पार्सल-पोर्टर लाच घेतल्याशिवाय कामे करीत नाहीत' या तीन बातम्या आणि मागच्या पाठमोऱ्या पानात जाहिरातीतून डोके वर काढणाऱ्या तीन बातम्यापैकी 'तव्वकाचे (स्वैपाकिणी) काम करणाऱ्या बायकांकडून लाच मागणारा पोलीस कोण आहे' ही ठळक बातमी. दुसऱ्या १० नोव्हेंबर ८३ च्या अंकातील मजकूर यापेक्षा वेगळा नाही.

या 'सत्य समाचार'चे सहसंपादक आहेत–बरकतअल्ली पठाण. विशेष समजलेली गोष्ट म्हणजे या मोहिद्दिनची–ऑनररी मॅजिस्ट्रेट म्हणून शिफारस करण्यात आली होती व मोहिद्दिन सय्यद आणि बरकतअल्ली पठाण या दोघाचेही वृत्तपत्र चालवण्याइतपत शिक्षण नाही. साहजिकच प्रश्न निर्माण होतो तो हा की, हे वृत्तपत्र चालवितो कोण? प्रारंभी काही काळ अकछपाई आपल्या छापखान्यात होत होती असे स्वत च–सा. मुनादीचे संपादक श्री. हरुन इनामदार यांनी सांगितले.–इनामदाराच्या अपरोक्ष सय्यद यांनीही त्याचा उल्लेख केला. मोहिद्दिन सय्यदवर पूर्वी एक केस झाली होती व सध्याही डझन–दीड डझन केसेस त्याच्यावर आहेत, असे कळते.

प्रथम मिरजेत गेल्यानंतर मी माझ्या बेग नावाच्या मुस्लिम मित्राकडे थांबलो होतो. जेवण अर्थात जमेल तिथे घेत होतो. कधी त्याच्या घरी, कधी बाहेर. तोही भटकतीत माझ्या सोबतीला असायचा; पण खेरुन्निसाची रिक्षा पाठलाग करते आहे हे लक्षात आल्याबरोबर मी बेगच्या घरातील सर्वांचा, तिथेच राहण्याच्या आग्रहाला नकार देऊन लॉजमध्ये राहायला गेलो. नंतर फोटो काढण्याच्या प्रयत्नावरून जो संघर्ष उद्‌भवला तो पाहिल्यानंतर आपण केले ते ठीकच झाले असे वाटते. ते बेग आणि त्याच्या आई-वडिलांनाही पटले.

विशेष म्हणजे खेरुन्निसाची एवढी दहशत असतानादेखील शासनाचे गुप्तपोलीस कोणाच्या मागे लागतात तर हिंदु एकता कार्यकर्त्यांच्या, माझ्यासारख्या निरुपद्रवी पत्रकाराच्या! मिरजेतील हिंदु एकताच्या कार्यकर्त्यांना भेटायला जातो न जातो तो गुप्त-पोलिसाची चक्रे फिरू लागली. मी असेन तिथे घिरट्या सुरू झाल्या. शेवटी मी पोलीसअधिकाऱ्यांची भेट घेतली तेव्हा त्याचा ससेमिरा बंद झाला. परिचयानंतर त्यानी मला सहकार्य दिले, माहिती पुरवली हा भाग वेगळा. (क्रमशः)

# अर्धसत्य–कुवतीचा अंदाज नसलेल्या सरळसोट शिपाईगड्याचं वास्तव चित्र

विनया खडपेकर

श्री. मनमोहन शेट्टी, श्री प्रदीप उप्पूर-निर्मित आणि गोविंद निहलानी दिग्दर्शित 'अर्धसत्य' हा चित्रपट पाहिला आणि एक उत्तम चित्रपट पाहिल्याचे समाधान मिळाले. सुरुवातीपासून शेवटपर्यंत अतिशय गतिमान आणि विलक्षण चित्तवेधक असलेल्या या चित्रपटाच्या मूळ कथेचे लेखक आहेत श्री. श्री. दा. पानवलकर. श्री. पानवलकरांच्या 'सूर्य' या कथेवरून श्री. विजय तेंडुलकर यानी 'अर्धसत्य' या चित्रपटाची कथा लिहिली असून संवादलेखन श्री. विजय तेंडुलकर आणि श्री. वसत देव यानी केले आहे.

श्री. अनंत वेलणकर (ओम पुरी) हा सांगलीकडचा पदवीधर तरुण. स्वत.ची इच्छा नसताना घराण्याच्या परपरेप्रमाणे, वडलाच्या (अमरीश पुरी) इच्छेनुसार पोलीसखात्यात शिरतो. सब्‌इन्स्पेक्टर म्हणून मुंबईला बदलून येतो. एका मेजवानीच्या वेळी वेलणकरची ज्योत्स्ना गोखले या प्राध्यापिकेशी (स्मिता पाटील) ओळख होते. ओळखीचे रूपान्तर मैत्रीत–प्रेमात होऊ लागते. त्या दोघाचे जग साफ वेगळे आहे. ज्योत्स्नाचे जग आहे वर्तमानपत्राचे, विचाराचे, चर्चेचे. वेलणकरचे जग गुन्हेगाराचे, मारामारीचे. नोकरीत धडाडीने वागणारा वेलणकर हातात असलेल्या सत्तेनुसार बेदरकारपणे गुडाना शासन करू लागतो. यात त्याची गाठ पडते रामा शेट्टी (सदाशिव अमरापूरकर) या धूर्त निगरगट्ट राजकारणी माणसाशी. वेलणकरच्या भोवतालचे पोलीस-सहकारी त्याला वेळोवेळी सांभाळून घेतात, सल्ला देतात, दिशा दाखवतात. रामा शेट्टी–अनत वेलणकर वैर वाढत जाते. शेट्टीचा–त्याच्या मुलाचा गुन्हा सापडूनही वेलणकर त्याच्यावर मात करू शकत नाही रामा शेट्टी निवडणुकीत निवडून येतो. वेलणकर बेफाम होऊन दारू पिऊ लागतो ज्योत्स्ना शंकित होऊ लागते. पोलीसची नोकरी सोडून दे म्हणू लागते. ते वेलणकरला पटत नाही एक बहादुरी गाजवल्याबद्दल वेलणकरच्या अगदी हातातोंडाशी आलेले मेडल कावेबाजपणे सी. आय. डी. मधला माणूसच पटकावून जातो. अस्वस्थ झालेला वेलणकर समोरच्या कैद्यावरच सूड काढतो. केवळ चौकशीसाठी समोर आलेल्या कैद्याला इतके मारतो की तो मरतो. या प्रकरणातून सुटण्यासाठी वेलणकरला शेट्टीच्या पायाशी जाणे भाग पडते. एक प्रकारे शरणागती स्वीकारून वेलणकर शेट्टीकडे जातो; पण शेट्टीच्या बोलण्याने संतापून त्याचा खून करतो. स्वत.च्या पोलीसचौकीवर येतो.

त्याचा ज्येष्ठ अधिकारी येऊन विचारतो, 'क्या बात है वेली ?' 'मैंने रामा शेट्टीको खतम कर दिया !' वेलणकर निर्विकारपणे सांगतो. दोघे एकमेकाकडे पहातात. येथेच चित्रपट संपतो.

हा चित्रपट म्हणजे एका व्यक्तीची कथा किंवा व्यथा नाही. ही आमच्या समाजचित्राची कथा आणि व्यथा आहे चित्रपटाचा नायक अनंत वेलणकर हे एक वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व आहे. तो असामान्य नाही आणि अतिसामान्यही नाही. रूढार्थाने तो ध्येयवादी नाही. तो एखाद्या विचारसरणीचा पुरस्कार करण्यासाठी, समाजजागृतीसाठी उभा राहिलेला नाही. किंबहुना या अशा विचारांपासून तो खूप दूर आहे. तो सरळसोट वागणारा, सत्प्रवृत्त शिपाईगडी आहे. पोलिसी गणवेषाची खाकी रंग त्याच्या अंगात पुरेपूर आहे. बसमध्ये मैत्रिणीला धक्का मारणाऱ्या माणसाला तो दणादण बडवतो. मागचापुढचा कोणताही विचार करण्याची त्याला आवश्यकताच वाटत नाही. मात्र तो जबरदस्त धडाडीचा आहे. म्हणूनच बंदूकधारी दरोडेखोरावर चाल करून त्याला पकडून देऊ शकतो. रामा शेट्टीला कैद करण्यासाठी थेट त्याच्या अड्ड्यात जातो. रामा शेट्टीच्या मुलाला पकडून सरळ त्याच्या तोंडात भडकावतो. वेलवणकरला पैशाचा मोह नाही म्हणून रामा शेट्टी त्याला सहजासहजी विकत घेऊ शकत नाही. तरीही वेलणकर ठरीव ठशाचा 'हिरो' वाटत नाही. तुमच्या आमच्यातलाच माणूस वाटतो. कारण रामा शेट्टीला प्रतिकार करता येत नाही तेव्हा तो संतापतो. उसळून दारू पिऊन दंगा करतो. 'करने दो सस्पेंड, हो जाने दो एन्क्वायरी' असे जोसात बोलतो; पण सस्पेंड होण्याचे भयंकर परिणाम वरिष्ठानी सांगितल्यावर माघार घेऊन तडजोड करतो. वरिष्ठांची ओळख वापरून एखाद्या प्रकरणातून सुटण्यासाठी दिल्लीची वारी करून येतो. मदत करणाऱ्याला आभारादाखल मेजवानीही देतो; पण स्वत:च्या स्वभावानुसार आणि पोलिसी अधिकाराच्या ताकदीने पुन्हा पुन्हा रामा शेट्टीला धडक द्यायला जातो. त्याला स्वत:ची कुवत आणि रामा शेट्टीची ताकद याचा नेमका अंदाजच येत नाही. धूर्तपणे भोवतालची परिस्थिती ओळखून माणसाचे मूल्यमापन करून डावपेच खेळण्याची त्याला आवश्यकताच वाटत नाही. केवळ स्वतः-च्याच प्रबळ नैसर्गिक प्रेरणेनेच तो प्रवास करतो. त्याचा हा प्रवास सुरू असतानाच त्याच्या भोवतालचे जग त्याला अनेक प्रकारे सामोरे येत असते. या प्रक्रियेतून चित्रपट घडत, उलगडत जातो. या भोवतालच्या जगातल्या एका वर्तुळात त्याच्या नोकरीतील माणसे आहेत. त्यांनी भोवतालची परिस्थिती जशीच्या तशी स्वीकारली आहे. स्वत:ची अल्प कुवत ते समजून आहेत. 'अपना फट पोरशन छोकरी, बँक पोरशन नोकरी' ही विचारसरणी ते सहजपणे बोलून दाखवतात. या नोकरीतून बाहेर पडलेला दारुडा लोबो आहे. अतिशय तारतम्याने वागणारा हैदर आहे. दुसऱ्या वर्तुळात सत्ताधारी धूर्त रामा शेट्टी, त्याचे पाळलेले निर्दय गुंड आहेत. तिसऱ्या वर्तुळात सुसंस्कृत, सुशिक्षित, संवेदनाक्षम ज्योत्स्ना आणि तिच्या भोवतालची तशीच माणसे, सभागृहे नाट्यगृहे, चर्चा आहेत. चौथ्या वर्तुळात त्याचे गावाकडचे घर आहे. तेथले हडेलहप्पी, दणकट वडील आहेत. अगतिक दुबळी आई आहे या सर्व वर्तुळाच्या पार्श्वभूमीवर अनंत वेलणकर नामक एका तरुण पोलीसअधिकाऱ्याच्या जीवनातील काही घटना आपण पहातो. त्या पहात असताना आपले समाजचित्र आपल्याला दिसू लागते. चित्रपटाचा अंतिम परिणाम आपल्या समाजचित्राचे स्पष्ट भान येणे हाच मुख्यतः होतो. या समाजचित्रात प्रेक्षक प्रथमपासून शेवटपर्यंत रंगून जातात. फॅक्टरी-मालक आणि पोलीसअधिकाऱ्याची भेट, रामा शेट्टीच्या निवडणूकविजयाची मिरवणूक, रामा शेट्टीचे कित्येक संवाद या प्रसंगांना प्रेक्षक उत्स्फूर्त दाद देतात.

समाजचित्राची कथा सांगणाऱ्या या चित्रपटात काही गोष्टी खटकतात. वेलणकरच्या भोवतालचे इतर सहकारी एकमेकांशी अतिशय गुण्यागोविंदाने, सहकार्याने वागतात. त्यांच्यात आंतरिक संघर्ष नाहीतच. एखाद्या पोलीसचौकीवर असे अपवादात्मक वातावरण असू शकेल; पण हे नोकरीच्या ठिकाणचे प्रातिनिधिक चित्र नाही. ज्योत्स्ना एका हॉटेलमध्ये बसल्यावर वेलणकरला विचारते, 'इतने महंगे हॉटेलमे क्यो आये ? ते हॉटेल ज्योत्स्नाच्या रहाणीमानाच्या दृष्टीने महागडे आहे असे मुळीच वाटत नाही. ज्योत्स्ना दोनतीनदा त्याला विचारते, 'हे परवडतं कसं ? केवळ दोन-तीन भेटीत कोणी कोणाला असे विचारणे शिष्टसंमत नाही. ज्योत्स्नाच्या संस्कृतीला ते मुळीच शोभत नाही. पोलिसाची वरकमाई येथे ढोबळपणे सुचविली आहे. समाजचित्राची कथा सांगणाऱ्या या चित्रपटाचा शेवट अनंतच्या व्यक्तिगत कथेशी होतो म्हणून हा शेवट एकदम तुटका वाटतो.

चित्रपटाचे 'अर्धसत्य' हे नाव अतिशय योग्य वाटते. यातल्या कोणत्याच व्यक्तीला किंवा समाजाच्या एखाद्या थराला, एखाद्या वर्तुळाला पूर्ण सत्य दिसत नाही. फक्त अर्धसत्य दिसते.

चित्रपटातील प्रत्येक व्यक्तीचा चेहरा, व्यक्तीमत्त्व स्वत:च्या भूमिकेला अतिशय योग्य वाटते. गोविंद निहलानी यांचे दिग्दर्शन आणि छायाचित्रण यामुळे प्रसंगानुसार दृश्यानुसार झालेली योग्य वातावरणनिर्मिती ओम पुरी, स्मिता पाटील, अमरीश पुरी, शफी इनामदार, सदाशिव अमरापूरकर, प्रभाकर पाटणकर, माधुरी पुरंदरे, अरुण काकडे, अच्युत पोतदार, सुरेश भागवत या प्रमुख आणि दुय्यम कलाकाराचा प्रभावी अभिनय, श्री. विजय तेंडुलकर आणि श्री. वसंत देव यांचे पात्रानुसार चपखल संवाद यामुळे हा चित्रपट अतिशय जिवंत झाला आहे. प्रेक्षकांच्या जवळ आला आहे.

## कथा–पटकथा–चित्रपट

श्री. दा पानवलकरांची मूळ 'सूर्य' ही कथा आणि श्री. विजय तेंडुलकरांची 'अर्धसत्य' ही त्यावरील पटकथा यामधील वातावरण सारखेच आहे. पोलिसांचे जीवन, त्यातली बेदरकारी, नित्य गुन्हेगारांशी संबंध हे श्री. पानवलकरांच्या शब्दातून ज्याप्रमाणे व्यक्त झाले आहे, अगदी तसेच्या तसेच श्री. तेंडुलकरांच्या पटकथेतून ते वातावरण अर्धसत्यच्या पडद्यावर आले आहे असे वाटते. श्री. पानवलकर अनंत वेलणकरचं वर्णन करतात — 'रोजच्या कामाला लय येऊ लागली. खाकी कपडे चढवून रिव्हॉल्वरचा पट्टा अडकवताना जग जिंकायला निघालेल्या शिकंदरासारखं वाटू

लागलं. साध्या चालण्यात टेच होता. आड येणारी फडतूस गोष्ट बेगुमान झटकली जात होती आवाजात हुकूम भरत राहिला. मोटर-सायकल वाऱ्यावर उडवत जाताना ट्रॅफिक-पोलिस मढयासारखा ताठ होताना दिसू लागला. धावत्या वेगात पोलिसस्टेशनच्या पायऱ्या चढताना आठ–दहा सॅल्यूट मागे टाकले जात. नजर हुकमी झाली. सत्ता हातात होती. बुटातली पावलं टेचात पडत होती. जगाला आडवं मारायचं... नजरेनं भोसकायचं. जखमा खरवडायच्या, मग्रूर जिभेनं सत्ता गाजवायची, देणगी लाभल्यासारखी...' अगदी अशाच व्यक्तिमत्त्वाचे दर्शन पडद्यावर ओम पुरी यांच्या अभिनयातून होत होते.

श्री. पानवलकराच्या कथेमधला अनंता संवेदनाक्षम आहे शिव्या ऐकतानासुद्धा त्याला नकोसे वाटते. तो बॅडमिंटन खेळणारा आहे. स्वतःच्या मनाविरुद्धच पोलीसच्या नोकरीत आला आहे; पण आल्यावर इतरांप्रमाणेच रुळून गेला आहे. कोणत्याच प्रकारची बंडखोरी त्याने केलेली दिसत नाही. दारूच्या नशेत तो वडिलांशी उद्धटपणे वागतो; पण त्या नशेतून जागे झाल्यावर स्वतःच्या उद्धट वागणुकीने हादरून, संकोचून जातो. तो आपल्यासारखा झाल्याचे वडिलांना समाधान वाटते, असे पानवलकराच्या कथेत शेवटी सूचकतेने मांडले आहे. तेंडुलकराच्या पटकथेतला वेलणकर मात्र नोकरीच्या चाकोरीत रुळत नाही. वेळोवेळी बंडखोरी करतो, उसळतो. लहानमोठी स्फोटक परिस्थिती भोवताली निर्माण करतो. मधेच हतबल होतो. तडजोड करतो. पुन्हा उसळतो. एका ऊर्मीत भोवतालच्या परिस्थितीशी स्वतःच्या कुवतीनुसार झगडणाऱ्या तरुण माणसाचे तेंडुलकरांच्या प्रतिभेला आकर्षण आहे असे दिसते. त्यांच्या साहित्यात ठिकठिकाणी अशी बंडखोर, हतबल तरुण माणसे दिसतात. 'कोवळी उन्हे' मधील 'प्रश्न एक उत्तरे अनेक' या ललित निबंधात अनत वेलणकरसारखाच तरुण दिसतो.

श्री. दा. पानवलकरांच्या कथेचा आवाका अतिशय मर्यादित आहे. या कथेत एका घरकुलातील पिता–पुत्राचा एक मूक संघर्ष आणि पित्याच्या इच्छेनुसारच हळूहळू आपला जीवनक्रम जगू लागणारा पुत्र आहे. परंतु तेंडुलकराच्या पटकथेचा आवाका यापेक्षा बराच व्यापक आहे. या पटकथेला एक सामाजिक संदर्भ आला आहे. घरकुलातून बाहेर पडून पटकथा एका समाजचित्राची कथा झाली आहे. पानवलकरांच्या कथेत वेलणकरचे घर आणि पोलीसचौकी एवढीच दिसते. तेंडुलकरांच्या पटकथेत मुंबईची झोपडपट्टी, फॅक्टरी, रामा शेट्टी असे केवढे तरी जग सामावले आहे. मूळ कथेत ज्योत्स्ना अगदीच नगण्य आहे. अनंत तिच्यात फारसा गुंतलेलाही दिसत नाही. तेंडुलकराच्या पटकथेतली ज्योत्स्ना एका वर्गाची प्रतिनिधी म्हणून येते. अनंता तिच्यात खूपच गुंततो. या मैत्रीलाही सामाजिक सदर्भ येतो. पोलिसी जीवनाबद्दल श्री. पानवलकर कथेत ओझरते लिहून जातात. फक्त शरीराचे ऋण मानायचं–मनाला तिथं थारा नाही, यावर अधिक भाष्य पानवलकर करत नाहीत. योग्य-अयोग्य असेही म्हणत नाहीत. पण त्यांच्या अनंताच्या मनात या विचाराबद्दल नाराजीची छाया आहे असे जाणवते. हीच नाराजी काहीशा अधिक स्पष्टपणे आणि फार सहजतेने तेंडुलकराच्या पटकथेतील स्त्री-पात्राच्या तोंडून व्यक्त होते. ज्योत्स्नाला धक्का देणाऱ्या माणसाला झोडपून काढणाऱ्या अनंताला ती विचारते, 'दिल की बुखारको दूसरी दवा नही जानते ? अनंताच्या वडिलांना त्याची आई विचारते की हे मारणं, पिटणं याखेरीज दुसरे इलाजच नसतात का ?

श्री. दा. पानवलकराच्या कथेच्या आधाराने उभी राहिलेली श्री. विजय तेंडुलकरांची पटकथा मूळ कथेपेक्षा खूपच विस्तारली आहे अनंत वेलणकरचा व्यक्तिरेखेचा सूरच तेंडुलकराच्या कथेत बदलला आहे. ◻

## सूर्य ते अर्धसत्य
## –श्री. दा. पानवलकर

प्रश्न : तुमच्या 'सूर्य' या कथेवर 'अर्धसत्य' हा चित्रपट होण्याचं केव्हा ठरलं त्याची हकीकत थोडी सांगाल का ?

श्री. दा. पा. : गेल्याच वर्षी बहुतेक दिवाळीच्या आसपास या कथेवर चित्रपट होणार अशी कुणकुण सुरू झाली. गोविंद निहलानी आणि विजय तेंडुलकर दोघंही माझे मित्रच. गोविंद माझ्या कथा नेहमी वाचायचा, पुष्कळदा स्टोरी सांग म्हणून मागे लागायचा. त्याला मी माझ्या कथा पुष्कळदा सांगत असे. तो नेहमी म्हणायचा– 'तुला मी काम देणार आहे.' त्याच्या 'आक्रोश' चित्रपटात त्यानं मला एक लहानशी भूमिका दिली होती. त्या चित्रपटातल्या दोन–तीन शॉटमध्ये मी आहे. नंतरही


**मराठे** ठेवी स्वीकारणे आहेत.

| कालमर्यादा | योजना क्र. १ वार्षिक व्याज | योजना क्र. २ रु. १००० ची मुदतीनंतर मिळणारी रक्कम | योजना क्र. ३ रु. ५००० चे मासिक व्याज |
|---|---|---|---|
| एक वर्ष | १२ टक्के | — | — |
| दोन वर्षे | १३॥ टक्के | रु. १२९० | — |
| तीन वर्षे | १५ टक्के | रु. १५२० | रु. ५७ |
| पाच वर्षे | १५॥ टक्के | रु. २०५५ | रु. ५८ |

अधिक माहितीसाठी संपर्क साधा

**मराठे इंजिनियरिंग इंडस्ट्रीज**

* फोन : २७१८/२७१७/२५९८
औद्योगिक वसाहत,
मिरज. ४१६ ४१०

मी तुला काम देणार' हे त्याचं बोलणं सुरूच होतं. मी म्हटलं हे काम म्हणजे 'आक्रोश'मध्ये झालं तेवढंच एकंदर. नंतर पोलिसी अत्याचारावरच्या भागलपूरच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या. या विषयावर नाटक लिहावं असं विजय तेंडुलकरांच्या मनात आलं. त्यांचा विषय गोविंदलाही रुचला. पण पटकथेसाठी तेंडुलकरांना पोलिसी जीवनावरची एखादी आधारभूत कथा आवश्यक वाटत होती. माझ्या 'सूर्य' या कथेची गोविंदला माहिती होती. त्या कथेचा कुठे तरी प्रसिद्ध झालेला हिंदी अनुवाद जो मला स्वतःलाही वाचायला मिळाला नाही तो गोविंदनं वाचला होता. त्याने त्याची माहिती तेंडुलकरांना दिली. नंतर चित्रपट काढायचा ठरल्यावर ते दोघेही अनुमतीसाठी माझ्याकडे आले. अनुमती न देण्याचा प्रश्नच नव्हता. त्या दोघांच्या प्रतिभेबद्दल, ताकदीबद्दल मला शंकाच नव्हती. माझी कथा ते योग्य प्रकारे हाताळणार याची खात्री होतीच. मी लगेच अनुमती दिली. चित्रपटाच्या शूटिंगला मी पहिल्यापासून शेवटपर्यंत हजर होतो. दिवसेंदिवस अतिशय मेहनतीनं शूटिंग चाललं होतं. तो एक वेगळाच अनुभव होता. आपल्यासमोर जो चित्रपट येतो त्यामागे शेकडो माणसांचे किती प्रचंड श्रम असतात याची तीव्रतेनं जाणीव झाली. 'अर्धसत्य'चं यश हे एका टीमवर्कचं यश आहे.

**प्रश्न** :– तुम्ही आतापर्यंत अनेक कथा लिहिल्या आहेत. तुमचे सहा–सात कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. या सगळ्या कथांमध्ये 'सूर्य' या कथेचं काही वेगळं स्थान तुमच्या मनात होतं का ?

**श्री. दा. पा.** – अनेक कथा मी लिहिल्या त्यातलीच 'सूर्य' ही एक कथा. खास वेगळं स्थान किंवा तिची निर्मितीची वेगळी प्रक्रिया मी सांगू शकणार नाही. वडिलांच्या धाकात वावरणारा एक मुलगा, नंतर स्वतः कमावता झाल्यावरची त्याची बंडखोरी असं एक बीज माझ्या मनात होतं, त्यातून ही कथा निर्माण झाली. मुळात पोलीसची नोकरी नको असलेला हा माणूस एकदा त्या नोकरीत शिरल्यावर स्वतःच्या संवेदनक्षमतेमुळे सर्व शक्तीनीशी कर्तृत्व दाखवू लागतो असं व्यक्तिमत्त्व माझ्या मनात होतं. माझ्या कथेचा



**श्री. दा. पानवलकर**

◘

शेवट मला नेहमी आधी दिसतो. नंतर मी लिहितो. 'सूर्य'च्या बाबतीतही तसंच आहे.

**प्रश्न** – कथेमध्ये तुम्हाला जे काही म्हणायचं आहे ते चित्रपटातून अभिव्यक्त झाले आहे का ?

**श्री. दा. पा.** – हो निश्चितच. माझ्या कथेचं स्पिरिट तेंडुलकरांनी त्यांच्या पटकथेत बरोबर पडकलं आहे. बरेच वेगळे प्रसंग, संवाद यांची माझ्या कथेत त्यांनी भर टाकली आहे. पण माझ्या कथेचा आशय या चित्रपटाच्या धमन्यातून वाहतो.

**प्रश्न** – तुमच्या मूळ कथेत पिता–पुत्र संघर्ष आहे. एका तरुण संवेदनाक्षम मनाचे पोलिसी खाकी जीवनात हळूहळू रुळून जाणे, रापून जाणे दाखवले आहे. तेंडुलकरांच्या पटकथेचा नायक पोलिसी जीवनात तसा रुळून जात नाही. पटकथेत एका सत्प्रवृत्त तरुण मनाचा कोंडमारा आहे. त्या कोंडमाऱ्याच्या दणदणीत प्रतिक्रिया आहेत. त्यामुळे कथेचा मर्यादित आवाका पटकथेत व्यापक होतो, असं वाटतं का ?

**श्री. दा. पा.** – पटकथेचा आवाका अर्थातच अधिक आहे. कथा आणि चित्रपट या माध्यमांमध्येच खूप फरक आहे त्यामुळे ते होणारच; पण माझ्या कथेचा नायक चाकोरीत रुळून जातो हे तुम्ही म्हणता ते मात्र पटत नाही. तो पुरेसा बंडखोर, झगडणारा आहे.

**प्रश्न** – 'रामा शेट्टी', वेलणकरचा सिनिअर अधिकारी 'हैदर' ही महत्त्वाची पात्रे, इतरही काही दुय्यम पात्रे ही तेंडुलकरांची निर्मिती आहे. याबद्दल काय म्हणाल ?

**श्री. दा. पा.** – कथेची पटकथा होताना ही पात्रे निर्माण होणे अगदीं अपरिहार्य होते. सगळ्या लहानसहान पात्रांमुळे वातावरणनिर्मिती होते. राजकारणी मंडळी आणि पोलीस यांचे संबंध स्पष्ट करण्यासाठी 'रामा शेट्टी' फारच महत्त्वाचा आहे. एक जो प्रसंग आहे की रामा शेट्टी वेलणकरच्या हातात फोन देतो आणि पिस्तुल खिशात ठेवून वेलणकर फोन घेतो हा प्रसंग मला फार आवडला. त्या फोनची ताकद पिस्तुलापेक्षा किती जबरदस्त आहे हे झटकन जाणवतं. तेंडुलकरांनी निर्माण केलेली आणखी एक व्यक्ती म्हणजे पोलीस-नोकरीतून बाहेर फेकला गेलेला दारुडा लोबो, हीसुद्धा फार महत्त्वाची आहे. दारुडा लोबो वेलणकरला एकसारखा भेटतो. विचार करायला लावतो माझ्या कथेत ज्योत्स्ना गोखलेला फार लहान अस्तित्व आहे; पण चित्रपटात तिला बरंच महत्त्व आलं आहे आणि ते योग्यही वाटतं. मी स्वतः पटकथा लिहिली असती तरी असे अनेक बदल मला करावेच लागले असते.

◘

## प्रेक्षक–चर्चा

**प्रश्न** : चित्रपट आवडला किंवा नाही ? कारणं कोणती ?

**प्रतिक्रिया** : चित्रपट खूप आवडला. नेहमीचं ते ठराविक हिरो-हिरॉइन, धावणंपळणं त्यात नव्हतं, त्यापेक्षा वेगळं होतं म्हणून आवडला। नेहमीच्या सिनेमामध्येसुद्धा पोलीसइन्स्पेक्टर खूप असतात; पण ते आणि बँकेतले क्लार्क यांच्यात काही फरकच नसतो. ते त्यांची ड्यूटी करतात की लगेच प्रेम करतात. या सिनेमातला नायक मात्र इन्स्पेक्टर म्हणून जगतो आहेसं वाटतं. म्हणून चित्रपट आवडला। चित्रपट आवडला नाही असं नाही. बघताना अतिशय गुंतून गेलो; पण काही दिवसांनी आता वाटतं तसं या चित्रपटात काही विशेष नव्हतं। रामा शेट्टी खूप वास्तव वाटतो म्हणून चित्रपट आवडला। चित्रपटात बारकावे खूप आहेत. वातावरण वास्तव आहे म्हणून चित्रपट आवडला। डायलॉग फारच मस्त आहेत !


**प्रश्न** : पोलिसांच्या जीवनावर तुम्ही इतर काही वाचलं किंवा नाटक, चित्रपट

पाहिला आहे का ? त्या तुलनेत 'अर्धसत्य' चित्रपट कसा वाटला ?

**प्रतिक्रिया :** पोलिसाची प्रमुख भूमिका असलेलं नाटक किंवा चित्रपट पहाण्यात नाहीच। पोलिसांचं खरंखुरं जग दाखवणारा आपला हा पहिलाच हिंदी चित्रपट आहे। इंग्लिशमध्येसुद्धा या विषयावरचा चित्रपट मी पाहिला नाही। 'दक्षता' मासिकात गुन्ह्याच्या सत्यकथा किती तरी वाचल्या आहेत; पण त्यात सबंध घटना—गुन्हा कसा घडला, कसा सापडला त्याचे डीटेल्स असतात. एखाद्या पोलीसइन्स्पेक्टरचं व्यक्तिमत्त्व त्यातून कळत नाही. पोलिसांच्या मनाचा कोंडमाराही त्यात कळत नाही. अर्धसत्य चित्रपटात पोलीसइन्स्पेक्टर एक व्यक्ती म्हणून कळतो। 'मेरी आवाज सुनो' हा चित्रपटसुद्धा पोलिसावर आहे आणि तो 'अर्धसत्य'पेक्षा जास्त लोकांपर्यंत पोहोचू शकेल. 'अर्धसत्य' फक्त वरच्या सुशिक्षितवर्गाला कळेल. खालच्या वर्गापर्यंत पोहोचू शकणार नाही. 'मेरी आवाज सुनो' सगळ्यांना आवडेल ! पण 'मेरी आवाज सुनो'मध्ये नेहमीचा मसाला आहे. तो अगदी भडक आहे. त्यात व्हायोलन्सही खूप आहे. तुलनाच करायला नको।

**प्रश्न :** चित्रपटात अनेक व्यक्ती आहेत. या प्रत्येक व्यक्तीचं व्यक्तिमत्त्व स्पष्टपणे उभे रहाते असे वाटते का ?

**प्रतिक्रिया :** प्रत्येक व्यक्ती अगदी वास्तव वाटते. प्रत्येक व्यक्तीचा चेहरा आणि अभिनय इतका बरोबर आहे की, प्रत्येकाचं व्यक्तिमत्त्व मनात ठसतं। मूळ नायक ओमपुरी इतका पॉवरफुल आहे, बाकीच्या इन्स्पेक्टरलोकांकडे लक्षच रहात नाही। वेलणकरचा जो सिनिअर हैदर तो वेलणकरशी फारच कॉंप्रोमाइज करून वागतो. ते पटत नाही। सहसा कोणीच आपल्या असिस्टंटला इतकं सांभाळून घेणार नाही; पण त्या पोलीसचौकीवर त्यांचा एक इंटिमेट-ग्रुप आहे. ते सगळेच एकमेकांशी छान वागतात. म्हणून हैदरचा वेलणकरशी कॉंप्रोमाइज सहज पटतो। सगळ्यात व्यक्तिमत्त्व उठावदार आहे ते रामा शेट्टीचं. एकदम बरोबर ! हल्लीचे राजकारणी असेच। निवडणुका जिंकणाऱ्यांचं रामा शेट्टी हे प्रातिनिधिक चित्र. त्याचे गुंड, त्याची



**वेलणकर आणि लोबो – समांतर व्यक्तिरेखा**

□

पोलिसातली वट सगळं फार बारकाव्यांनी दाखवलं आहे। स्मिता पाटीलच्या भूमिकेची चित्रपटात आवश्यकता वाटतच नाही. निव्वळ एक बाई हवीच म्हणून ती आली आहे। स्मिता पाटीलमुळे पांढरपेशांचं जग दिसतं पोलिसांचं जग आणि पांढरपेशांचं जग या दोन अगदी जवळून चाललेल्या समांतर रेषा वाटतात। स्मिता पाटीलच्या जागी वेलणकरचा एखादा प्राध्यापक किंवा क्लार्क असलेला मित्र दाखवला असता तरीही हे पांढरपेशांचं जग दाखवता आलंच असतं। मुळीच नाही. मित्र आणि प्रेयसी यात फरक आहे. प्रेयसीत जसं गुंतणं असतं तसं मित्रात गुंतणं नसतंच। वेलणकर एक माणूस म्हणून कसा आहे हे प्रेयसीच्याच सहवासात कळणार. ते मित्राच्या सहवासात कळणार नाही। तो दारू पिऊन फोन करतो तेव्हा स्त्री असल्यामुळे ती घाबरते. मित्र असा घाबरणार नाही। शिवाय 'मेरा पती पुलीस नही होगा' या तिच्या बोलण्याचा त्याच्यावर जो आघात होतो तसा आघात मित्राकडून कसा होईल ?

**प्रश्न :** अनंत वेलणकर ध्येयवादी आहे का? त्याचे कविताप्रेम त्याच्या व्यक्तिमत्त्वाशी जुळते का ?

**प्रतिक्रिया :** तो ध्येयवादी नाही; पण प्रामाणिक आहे. तो भडक डोक्याचा आहे। 'पुरुष' या जयवंत दळवींच्या नाटकातली अंबिका जशी ध्येयवादी आहे तसा हा नाही. पण हा बंडखोर आहेच. म्हणून तर तो म्हणतो, 'हो जाने दो सस्पेंड. करने दो इन्क्वायरी'। त्याच्या वागण्याला जोर आहे। त्याला अन्यायाची चीड आहे। मात्र त्याचं सगळं व्यक्तिमत्त्व पहाता त्यात कुठे कविता बसत नाही; पण कोणत्याही माणसाचा एक हळवा कोपरा असतो तसा अनंत वेलणकरलाही आहे. म्हणून पोलीसची नोकरी त्याला करायची नसते. वडिलांसाठी तो ती करतो. खरा तो कविताप्रेमीच आहे। एरवी तो गरम माथ्याचाच आहे; पण मजा म्हणून कविता वाचत असेल। शेवटी तो स्मिता पाटील समोर जे बोलतो मी नपुसक आहे वगैरे, ते बोलणं तसं कवीचं मनच दाखवतं।

**प्रश्न :** चित्रपटातले कोणते प्रसंग विशेष आवडतात ? कोणते खटकतात ?

**प्रतिक्रिया :** खूपच प्रसंग आवडतात। विशेषत: रामा शेट्टीच्या विजयाची मिरवणूक गाडीतून चाललेली आणि वेलणकर व्यवस्था राखायला हा कॉन्ट्रास्टचा प्रसंग फार आवडला। रामा शेट्टी फोनवर बोलतो ते पण छान आहे। माणूस पेटवला जातो ते फार भयंकर वाटतं. अगदी छातीत धडधडतं। शेवटी वेलणकर त्या ट्रान्झिस्टर चोरणाऱ्याला मारतो ते फार क्रूर वाटतं. एक हवालदार ते उघड्या डोळ्यांनी पहात असतो ते फार खटकतं. तो हवालदार येऊन ओम पुरीला अडवतो; पण ओम पुरी त्याला बाजूला ढकलतो असं दाखवायला पाहिजे होतं। निदान तो हवालदार जाऊन दुसऱ्या इन्स्पेक्टरला याचं ते चिडून मारणं सांगतो

असं दाखवलं असतं तर वास्तव वाटलं असतं।


प्रश्न : चित्रपटाचा शेवट कसा वाटतो ? अपरिहार्यपणे हाच शेवट असे वाटते ?

**प्रतिक्रिया :** असाच शेवट होणार. शेवटपर्यंत तो धीट आहे । शेवट तुटका वाटतो. शेवट पूर्ण वाटत नाही. पण तेंडुलकर नेहमी शेवटी प्रेक्षकांना विचार करायला सोडून देतात आणि ते पटतं । शेवटचा रामा शेट्टी आणि वेलणकरचा संवाद फार छान आहे । पण रामा शेट्टीचा खून पटत नाही. म्हणजे खुनाच्या पॉइंटपर्यंत बरोबर चढत नाही. खून एकदम अचानक होतो । पण वेलणकरचा खून करण्याचा हेतूच नसतो. तो भडकून शेट्टीचा गळा पकडतो. त्यात त्याचा खून होतो. मग खून झाल्याची तो पर्वा करत नाही, घाबरत नाही. । आणखी एक खटकतं वेलणकर जेव्हा शेट्टीच्या घरात यतो तेव्हा शेट्टीचे बॉडीगार्ड गुंड तेथे असतात. त्यांना या खुनाची चाहूल कशी लागत नाही ?। त्यात काहीच आश्चर्य नाही. वेलणकरच्या शरणागतीची आणि शेट्टीच्या ताकदीची त्यांना इतकी खात्री असते की, शेट्टीसकट सगळेजण बेफिकीर असतात: । लिफ्ट आउट ऑफ ऑर्डर म्हणून वेलणकर जिना चढायला लागतो तेव्हा तेव्हा हिंदी सिनेमातले डेंजर सांगणारे नेहमीचं बॅकग्राउंड म्युझिक वाजतं त्यामुळे कळतंच, वेलणकर आता खून करणार ! रामा शेट्टीचा खून हा आपला सिनेमातच ठीक आहे. प्रत्यक्षात असं घडत नाही. आमदार-खासदारांचा खून ऐकला नाही ! हे बरोबर. हरिजनांवर अत्याचार होतात. बायकांवर बलात्कार हातात. मजूरपुढारी, पोलीसअधिकारी मारले जातात; । पण आमदार, खासदारांचं काही वाकडं होत नाही. । या पोलिसांचसुद्धा काय आहे त्यांना पगार फार कमी. बँकेतल्या प्यूनइतका पगार इन्स्पेक्टरला मिळत नाही. मग ते पैसे खातात. मिंधे होतात. । पैसे चारणार कोण ? ज्यांना गुन्हे लपवायच असतात ते लोक. अर्थात पोलिसांना त्यांच्यावर पांघरूण घालायलाच लागतं. असं हे दुष्ट चक्र आहे.

प्रश्न : चित्रपट 'प्रौढांसाठी' आहे ते आवश्यक वाटते का ?

**प्रतिक्रिया :** चित्रपट प्रौढांसाठी असण्याची मुळीच आवश्यकता नाही. याच्यापेक्षा काय वाटेल तस सान दाखवणारे सिनेमे खुशाल 'U' म्हटले जातात. तसा हा चित्रपट अगदी साधा आहे. । एकच कॅबरेडान्स आहे; पण तो हल्ली म्हणजे काहीच नाही. टी. व्ही. वर सुद्धा वाटेल तशी छायागीतं दाखवतात ।'A' मुद्दामच आहे. म्हणजे तेवढी गर्दी जास्त होते. । 'प्रौढांसाठी'च हा चित्रपट पाहिजे. लहान मुलं येऊन रडली तर मोठ्यांनाही नीट बघता येत नाही । रामा शेट्टीचा गळा पकडून खून होतो हे पाहून एखादा तेरा-चौदा वर्षांचा मुलगा बिथरू शकेल. चित्रपट 'A' आहे तेच बरोबर. □

# कुंपण आणि आकाश



**मंगला गोडबोले**

बाब तशी किरकोळ आहे.

पण काही स्त्रियांना ती खटकू लागली आहे. म्हणून तिची नोंद घ्यावीशी वाटते. काही स्त्रियांना ती खटकते आहे हे तरी मला कसं कळलं ? तर एका सभेतून ! सभाही तशी साधीच होती. सुशिक्षित मध्यमवर्गीय गृहिणींचे आईपणाचे अनभव बोलके करण्याच्या हेतूने भरवलेली. त्यात बोलणाऱ्याही आयाच आणि ऐकणाऱ्याही आयाच! या मुक्त संवादावर कुठलंही दडपण येऊ नये म्हणून अध्यक्ष, प्रमुख वक्ते, पुष्पगुच्छ असल्या सगळ्या उपचारांनाही फाटाच दिलेला होता. तरीही पहिला काही वेळ तसा संथच गेला. अपत्यजन्मातला आनंद, बाळलीलांचं कोडकौतुक, जगण्याच्या प्रत्येक क्षणी कोणी तरी आपल्यावर अवलंबून असण्याचा अहंकार, एका उमलत्या व्यक्तिमत्त्वाची जोपासना करण्याचं आव्हान येथपर्यंत बहुतेकींचे अनुभव एकपदरी होते, समांतर होते, सुखावह होते. पुढे पुढे मुलं मोठी होऊ लागली तसतशी ती आईच्या व वडिलांच्या स्थानामध्ये नकळत पण निश्चित फरक करू लागली. आई हा नेहमी घरात असणारा, नोकरदार वगैरे असला तरी घरातला वेळ आपल्यासाठी देणारा, दुय्यम महत्त्वाची कामं करणारा व ती केली नाही तर गुन्हेगार ठरणारा प्राणी. वडील त्यामानाने दुर्मिळ, जबाबदारीची कामं करणारे, कर्ते, करविते, संरक्षण करणारे म्हणजेच थोडक्यात आईपेक्षा उच्च स्थानावरचे गृहस्थ. मुलं हे इतक्या स्पष्टपणे बोलून दाखवत नाहीत; पण एखाद्या छोटयाशा कृतीने, शेऱ्याने किंवा आविर्भावाने लख्खपणे जाणवून मात्र देतात. कसं ? तर एक आई म्हणाली, 'माझा मुलगा इतिहास-नागरिकशास्त्र वगैरेपर्यंतच्या शंका घेऊन माझ्याकडे येतो; पण गणित अडलं की, मात्र बाबांसाठी थांबून राहातो. मी सांगायचा प्रयत्न केला तरी त्याचा माझ्या सांगण्यावर विश्वास बसत नाही. माझा मुद्दा तो बाबांकडून तपासून घेतो आणि तेही मोठ्या शहाजोगपणे मतप्रदर्शन करतात. अशा वेळी......' अशा वेळी तिला काय वाटत असावे ते आताही जाणवत होतं. तिचे डोळे भरून आले होते. जास्त चौकशी केल्यावर समजलं की, ती एके काळची मॅथेमॅटिक्सची ग्रॅज्युएट होती !

या विवक्षित आईबद्दल आणि तिच्या एकूणच घरादाराबाबत अन्य तपशील मला माहीत नव्हता. त्यामुळे चूक-बरोबर ठरवण्याचा मला हक्कच नव्हता; पण तिच्या या अनुभव-कथनाला बहुसंख्य आयांनी ज्या उत्स्फूर्तपणे, मनापासून दाद दिली त्यावरून त्यांनाही कमीअधिक फरकाने हेच जाणवलं असावं हे स्पष्ट होतं. अर्थात नुसतं जाणवून प्रश्न सुटत नाही. त्यावरची प्रतिक्रिया कितपत तीव्र, मंद किंवा तिऱ्हाईत आहे यावरही पुढली वागणूक अवलंबून असते. याबाबतीत आजवर बहुतेक आयांनी 'हे असंच चालायचं' अशा दृष्टिकोनातून पाहिलं असावं असं वाटतं. नाही तर, मुलानं सहलीला जायचं की, नाही हा निर्णय बापानंच

घ्यायचा आणि आईनं तेवढं तासन् तास रावून बरोबर द्यायचे शंकरपाळे, चिवडा वगैरे करायचे ही वाटणी बहुसंख्य घरामध्ये बिनबोभाट कशी स्वीकारली गेली असती ?

वास्तविक पाहता आईला एकेरी आणि बापाला तेवढी आदरार्थी बहुवचनी हाक मारायला शिकवतानाच नकळत या भेदाची सुरुवात आपल्या घराघरामध्ये होत असते. एरवीही पदोपदी कुटुंबप्रमुखाशी आदराने, मानाने, भिऊन वागण्याचा प्रघात असल्याने मुलाच्या मनात ही श्रेणीकल्पना नकळत ठसत असतेच. तेव्हा यातला परंपरेचा, संस्काराचा, चौकटीचा भाग अटळ असला तरी त्याउप्पर ही श्रेणी मोडायला आया किती प्रयत्न करतात हा खरा सवाल आहे. आजची सुशिक्षित आई तर कित्येकदा मिळवती असते, घराबाहेरचे सर्व कुटुंबव्यवहार सहज सांभाळणारी असते, व्यवसायपरत्वे नवरा दीर्घकाळ घराबाहेर राहात असला तरी ती अडू देत नसते. पुष्कळ वेळा ती नवऱ्यापेक्षा समर्थ नसली तरी नवऱ्याइतकी समर्थ जरूर असते. अस असूनही मुलांच्या मनातलं तिच स्थान आजही उंचावत नाही असं का ?

याबाबतीत परिस्थिती फार हाताबाहेर जाऊ देण्यापूर्वी म्हणजेच मुलांच्या कल्पना ठाम होण्यापूर्वी पुष्कळ गोष्टी प्रयत्नपूर्वक करण गृहिणींना शक्य आहे असं वाटतं. त्यासाठी थोडे कष्ट मात्र घ्यावे लागतील आणि ते पुष्कळ वेळा बौद्धिक कष्ट असतील. निर्णय घेण्याची क्षमता वाढवावी लागेल आणि त्यातले ताणतणाव सोसावेही लागतील. कधी थोडं चाकोरीबाहेर पडावं लागेल, डोळे उघडून बघावं लागेल, रंजनापलीकडचं वाचावं लागेल, अद्ययावत पोशाखाबरोबरच अद्ययावत ज्ञानाच वारं खेळवावं लागेल आणि यातल्या ज्या अंगानं आपण उण्या पडू ती बाब मुलांसमोर मोकळेपणानं कबूलही करावी लागेल.

या गोष्टी वाटतात तेवढ्या अवघड नाहीत, अशक्य तर नाहीतच; पण किती गृहिणी–आया त्या करू बघतात ? मुलानं ग्रहणासंबंधी काही विचारलं की दुर्लक्ष करायचं, विजेसंबंधी क्षुल्लकही शंका काढली तर बाबाकडे बोट दाखवायचं, निवडणुकीच्या काळात राजकीय व्यवस्थेसंबंधी एखादाही प्रश्न टाकला की सरळ उडवून लावायच किंवा 'तो तुझा विषय नाही, अभ्यास करा धड' असं म्हणून हिणवायचं, जन्ममरणासारख्या शंकांना उगाचच देव, दैव नशीब, पूर्वजन्म, प्राक्तन वगैरे धूसर कल्पनामध्ये घोळवत बसायचं. असं करून पुष्कळदा बायका ती वेळ साजरी करतात आणि पर्यायाने पुढेमागे स्वत वर नको ती वेळ येण्याची तयारीही करतात. असे काही प्रसंग लागोपाठ घडले की, मूल नकळत मनात आईची कक्षा ठरवून टाकतं आणि घरसंसार, खाणंपिण, कपडालत्ता एवढीच खाती आईवर सोपवून इतरत्र कुठेही तिची दखल घेईनासं होतं.

गेल्या पिढीपेक्षा आजच्या पिढीतल्या स्त्रीला शाळाकॉलेजच्या वाटा खुल्या आहेतच, पण रेडिओ, टी. व्ही. प्रसारमाध्यमं इत्यादींमधून ज्ञानाच्याही असंख्य वाटा खुल्या आहेत. दोन-तीन मुलांवर संसार आटोपल्यास हाताशी वेळ जास्त उरण्याची शक्यता आहे, घरकामाची गुंतागुंत यंत्रामुळे कमी झाली आहे, बाह्य जगाशी ओळख वाढत आहे. या सगळ्यामुळे आई म्हणून, गृहिणी म्हणून तिचा दर्जा वाढवणं तिला शक्य आहे पण तशी तिचीच मनापासून इच्छा हवी, सोपं–आयतं–दुय्यम–परावलंबी जगण्याचा मोह तिनं सोडायला हवा, आव्हानं पेलायला हवीत आणि हारजीत खुलेपणानं घ्यायलाही शिकायला हवं.

दुर्दैवाने याबाबतीत कुठल्याच प्रकारची सक्ती करता येत नाही. नाही तरी शारीरिक कामासारखी मानसिक कामाची धडपडीची सहज नोंदही घेता यत नाही त्यामुळे बौद्धिक कामगिरीचं मोजमाप करणं, तत्काळ परिणाम बघणं, केल्यास कौतुक व न केल्यास दंड करण, सक्तीनं करायला भाग पाडणं या गोष्टी अशक्यच आहेत, त्यामुळंच आजच्या बौद्धिक आळसाच्या परिस्थितीत बहुसंख्य सुखवस्तु गृहिणींना सुखानं जगता येतं. सुस्त दिखाऊ, वरवरचं राहाता येतं आणि मग वरच्या प्रसंगासारखं वेळ पडल्यास कुरकुरताही येतं.

अर्थात बौद्धिक पराक्रमानंही स्त्रियांचा घरातला दर्जा सुधारेलच असा माझा दावा नाही. काही विपरीत उदाहरणं पाहिली आहेत; पण त्या वाटेवरचं हे पहिलं आणि महत्वाचं पाऊल ठरेल यात शंकाच नाही. लग्नाला दहा-पंधरा वर्षं झाली, जगण्यासाठी फारसा संघर्ष करावा लागलाच नाही, आयुष्याला स्थैर्य आलं की नकळत बौद्धिक आळसाकडे बहुसंख्य गृहिणींचा कल होतो हे कटु असलं तरी सत्य आहे आणि त्यातूनच पुढले अनेक कटु अनुभव त्यांना पचवायला लागत आहेत.

उदाहरणातली बाब किरकोळ आहे हे तर मी सुरुवातीलाच म्हटलं मुलानं एखादा प्रश्न आईला विचारला काय आणि बापाला विचारला काय, त्याला उत्तर मिळालं म्हणजे झालं ! बायकांच्या प्रश्नाची बाब मात्र इतकी किरकोळ नाही. म्हणून तर वरची किरकोळ बाब आज काहींना खटकत्येय याचं स्वागत करायला हवं आणि पुष्कळांना खटकण्याची वाट बघायला हवी.

◘

---

'कुंपण आणि आकाश' आणि 'आपली मुलं' ही दोन सदरं दिवाळीपूर्वी सुरू झाली आहेत. आतापर्यंत यातील आठ लेख प्रसिद्ध झाले. दिवाळी अंकानंतर ही दोन्ही सदरं या अंकापासून सुरू होत आहेत. नेहमीप्रमाणे एकाआड एक अंकात.

---


वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ. वीणा गवाणकर
दुसरी आवृत्ती
मूल्य : तीस रुपये
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पुणे ३०



# आपली मुलं

खरं तर आपल्या समाजाला मूल कळलेलंच नाही. पालकत्वाची गरज फक्त घरापुरतीच नाही. घराबाहेर पडलेल्या आपल्या मुलांना ते समाजातही भेटायला हवं.

## समाज पालकत्व मागत असतो

● शोभा भागवत ●

लक्ष्मण उकिडवा बसून कपाळाला हात लावून रडत होता. ते दृश्य अजून मला तसंच्या तसं आठवतं. आठवड्यापूर्वीच त्याची पाच वर्षांची मुलगी अपघातात वारली होती. लक्ष्मण तिला बाजारात घेऊन गेला होता. परत येताना रस्त्याच्या डावीकडून दोघं चालत होते. कडेला लक्ष्मण आणि वाहनांच्या बाजूला मुलगी असे चालले होते. मागून ट्रक आला भरधाव आणि लक्ष्मणच्या हाताला हिसका बसला. ट्रकच्या मागच्या चाकात अडकून मुलगी फरफटत पुढे गेली. ट्रक थांबला तेव्हा त्याखाली ती रक्ताच्या थारोळ्यात पडली होती! ती बेशुद्ध झाली नव्हती. पाणी मागत होती. पोटातली आतडी बाहेर आली होती. ते तिला दिसत नव्हतं. पोट दुखतंय दुखतंय म्हणत होती. थोड्या वेळानं बिचारी गेली!

या घटनेला दोन वर्षं झाली तरी लक्ष्मण आणि त्याची बायको लक्ष्मीबाई खंतावलेलीच आहेत. अशा अपघातात कोणाला दोष द्यायचा? बेजबाबदार ड्रायव्हरला? अरुंद रस्त्यांना? रस्त्याला फूटपाथ नसण्याला? आपल्या लहानग्या मुलाला रस्त्यातून कसं चालवावं ते ठाऊक नसलेल्या पालकाला? वाढत्या रहदारीला?

इतर गोष्टींना आपण आवर घालणं कठीण आहे; पण आपल्या मुलांना जपता तर येईल? रस्त्यानं कुणी आई–बाप लहान मुलाला हाताला धरून नेत असतात. मूल वाहनांच्या बाजूला असलं तर मनात धस्स होतं! आगाऊपणाबद्दल त्या आई–वडलांचा राग पत्करूनही मी मुलाला रस्त्याकडेनं चालवण्याबद्दल सांगते. मनात भीती असते की, आता हा उड्या मारत-बागडत चालणारा जीव पुढच्या क्षणी रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसेल!

रहदारीच्या ठिकाणी किती तरी वेळा हे दृश्य दिसतं. मुलाकडे पालकांचं लक्षच नसतं आणि ते कुठे तरी स्कूटरपुढं, गाडीपुढं येतं. मग पालक दचकतात आणि दणकन् धपाटा बसतो पोराच्या पाठीत. हा धपाटा खरं तर पालकांच्या पाठीत बसायला हवा. कोण घालणार?

मृत्यू असा आ वासून समोर आला तरच आपल्याला जाग येते इतकी आपली संवेदना जागृत! एरवी मुलं बिचारी अनेक शारीरिक–मानसिक ताप सोसत असतातच घरी–दारी.

लहान–सहान कारणावरून मुलांना बडवणारे आई–बाप आपल्याला शेजारी–पाजारी दिसतात. एवढ्याशा मुलाला उचलून आदळणारे पालक असतात. मूल त्यांचं असतं, त्याला जन्माला घालण्याचं शौर्य त्यांचं असतं, ते त्याला पोसत असतात, तुम्ही–आम्ही कोण असतो त्याचे? कुणीच का नसतो? जगातले अन्याय निवारण करण्याची ताकद आपल्याला नसेल; पण निदान आपल्या डोळ्यांसमोर घडणारे हे अन्याय तरी थांबवता येतील? मोठं माणूस मुलाला मारतं तेव्हा त्याचा सामाजिक अर्थ हाच असतो की, 'बळी तो कान पिळी' हा न्याय मला मान्य आहे. मूल लहान म्हणून मी त्याला मारीन; तसंच बाहेर कुणी मोठा मला मारू लागला तर मी मार खाईन. अलीकडे लांबून शाळेत येणारी मुलं रिक्षातून येतात. रिक्षात कोंबून कोंबून येतात. अशाच एका खच्चून भरलेल्या रिक्षात मुलं काही गडबड करत होती तर रिक्षावाला त्यांना एकेकाला पट्टीनं फटके देऊन 'करशील का आवाज? करशील?' असं विचारत होता. आपण ज्यांच्या हाती मुलांना सोपवतो ती माणसं कशी वागतात मुलांशी? मुलं सांभाळायला ठेवलेल्या मोलकरणीचे अनेक क्रूरपणं आपण ऐकतो, पाळणाघरांचे किस्से ऐकतो, शिक्षक मुलांना कसं वागवतात ते ऐकतो आणि प्रश्न पडतो खरंच आपल्या समाजाला मूल कळलेलंच नाही का? पालकत्वाची गरज काय घरापुरतीच असते? घराबाहेर पडलेल्या आपल्या मुलांना समाजात पालकत्व भेटतं?

आपली मुलं म्हणताना जाणवलं की आपल्या मुलांना स्वतःची घरं तरी असतात, पण स्वतःचं घरच नसलेली अनाथ मुलं, स्वतःचं घर पारखं झालेली कामगार–मुलं, शिकण्यासाठी वसतिगृहात ठेवलेली मुलं या सगळ्यांना पालक हवे असतात. वाईट वागवणारे पालक, व्यसनी पालक असलेली मुलं आईवडील असूनही पोरकीच असतात!

असं म्हणतात की, शिस्त लावली नाही म्हणून मूल क्वचितच बिघडतं. प्रेम मिळालं नाही म्हणून बिघडणाऱ्या मुलांचं प्रमाण जास्त असतं आणि आपण तर मुलं म्हटली की, गप्प बसा, हाताची घडी तोंडावर बोट, देवासारखे शांत बसा, जागेवर बसा, ओळीत उभे रहा. असं करा, तसं करू नका. शक्य त्या सर्व प्रकारची शिस्त लावायला कंबर कसून असतो.


अलीकडे मुलांना दिवसभर कुठे ना कुठे 'अडकवून' टाकण्याचं पालकांनी मनावर घेतलेलं दिसतं. सकाळी कुठला तरी क्लास, मग शाळा, घरी येऊन संध्याकाळी पुन्हा क्लास, मग अभ्यास असं ते मूल अडकवून टाकायचं. सुट्टी लागली की, पुन्हा कुठल्या तरी खास क्लासला घालायचं. जशा मुलांना अनेक गोष्टी आल्या पाहिजेत तसा थोडा रिकामा वेळही असला पाहिजे. तो असला तर त्यांची कल्पनाशक्ती बहरते,

निर्माणशक्ती फुलते, शून्यातून मुलं वाट्टेल ते निर्माण करू शकतात. ती शक्ती आपण हिरावून तर घेत नाही ना, त्यांना ठरवलेले अभ्यासक्रम नेमून देऊन? कुठे तरी अडकवून टाकून?

एकदा कॉलेजमध्ये भाषणासाठी आम्ही दोघं गेलो होतो, मुलंपण बरोबर होती. भाषण होईपर्यंत दोन तास ती बाहेर वाळूवर खेळत होती आणि सगळा कार्यक्रम झाल्यावर त्यांना विचारलं, 'तुम्ही काय करत होतात?' तर त्यांनी वाळूत केलेलं गाव दाखवलं. त्यात वाळूत बोगदा केला होता, नदी केली होती. नदीवर दोन लाकडाचे तुकडे लावून पूल केले होते. विटांच्या इमारती होत्या. एक मोठा पाइप खोचून विहीर केली होती. छोटे पाइप लावून कारंजी केली होती. बाजूचं गवत लावून बाग केली होती. थोडे मोठे दगड ठेवून टेकडी केली होती. टेकडीवर देऊळ होतं. भोवताली लोखंडाचे तुकडे लावून सीमा केली होती. गवताच्या लांबलचक पात्याची दोन्ही टोकं खोचून कमान केली होती वेशीवरची. आसपास मिळालेल्या तुकडयाताकडयांतून त्यांनी गाव उभारलं होतं कचऱ्यातून कलेचा कोणताही क्लास न करता!

मोकळा वेळ अंगावर न येणं, त्यातूनही काही सृजन करता येणं ही केवढी मोठी शक्ती आहे! स्वतःचा सहवास आवडणं ही मोठेपणी खूप जणांना न जमणारी कला आहे. मुलांमधली ही शक्ती कशी जपायची?

आपण मुलाला सतत कुठे तरी अडकवून टाकायला का बरं उत्सुक असतो? मूल मोकळं राहिलं तर बिघडेल असं वाटतं की, आपल्या कामासाठी, शांतपणासाठी आपल्याला वेळ हवा असतो? मुलाला काही शिकवण्याची, घडवण्याची किंबहुना त्याच्याशी बोलण्याची, संवाद साधण्याची कुवत आपल्यात नाही असं आपल्याला वाटत असतं का? मुलाला अनेक गोष्टी जशा आल्या पाहिजेत तसं आईवडलांचं प्रेम, सहवासही मिळाला पाहिजे. त्यांच्या अंगाखांद्यावर बागडायला मिळालं पाहिजे. मोठेपणी जवळ बसता आलं पाहिजे. बोलता आलं पाहिजे. मोकळेपणानं आपल्या चिंता, सुख-दुःखं, विचार बोलता आले पाहिजेत. यासाठी वेळ ठेवतो आपण? मुलाला कुठे तरी अडकवून टाकण्यापेक्षा स्वतःला रोज तास–दोन तास मुलाबरोबर 'अडकवून'



घ्यायला हवं. ही संवादाची पद्धत मुलाच्या लहानपणी आपण बेजबाबदारपणे नाकारतो आणि मग मुलं मोठी झाली की, ती आमच्याशी बोलत नाहीत, आम्हाला काही सांगत नाहीत म्हणून तक्रारी करतो.

कधी मोकळेपणानं न बोललेल्या वडलांना मुलगी तरुणपणी कसं सांगणार की, 'बाबा, मला अमुक अमुक मुलगा आवडलाय. आम्हाला लग्न करायचं आहे तो असा असा आहे. तुम्हाला हे सगळं कसं वाटतंय?' तिनं जर विचार केला की, आजवर वडील कुठे काय मोकळेपणानं बोललेत आपल्याशी? आपण कशाला काय सांगा? आपण पळून जाऊनच लग्न करू. बाबा विरोधच करतील. हे आपलं संचित त्या वडलांनीच घडवलेलं असतं अनेकदा.

मुलांना मोकळेपणानं बोलण्याची संधी जशी आपण नाकारतो तस त्यांचे स्वत चे प्रश्न मांडण्याची संधीही नाकारतो. एकदा असं झालं की, माझ्या एका मैत्रिणीनं अचानक फोन केला. उद्या रात्री तुम्ही चौघं आमच्याकडे जेवायला यायचं म्हणाली. मी हो म्हणून टाकलं. पंचाईत झाली शोनीलची. त्याची दुसऱ्या दिवशी सकाळी वर्गात चाचणी–परीक्षा होती छोटीशी. त्याला सकाळी लवकर उठून अभ्यास करायचा होता. शिवाय त्याला रात्री लवकर झोप येते. कुणाकडे जेवायला गेलं की उशीर होतो. तो कंटाळतो तो यायला तयार नव्हता. त्याला घरात ठेवून जाणंही शक्य नव्हतं. सोबत नव्हती. मैत्रिणीला नाही म्हणणंही शक्य नव्हतं. शेवटी तो अभ्यासाची पुस्तकं घेऊन जेवायला आला आणि पहाटे लवकर उठवण्याचं वचन मी त्याला दिलं. शिवाय जेवून लवकरच आम्ही घरी यायला निघालो, गप्पा मारत बसलो नाही.

एरवी ह्या प्रसंगात शोनीलचं अकांडतांडव, रडणं, माझं रागावणं, सर्वांचाच मूड जाणं असं घडू शकलं असतं; पण शांतपणे विचार केल्यावर जाणवलं की, आता मुलं मोठी झाल्यावर अशी अचानक आमंत्रणं टाळायला हवीत. हा प्रश्न सांगून टाळायला हवीत. जायचं ठरवलं तर मुलांची कुठे तरी रहायची सोय करायला हवी. यासाठीही पुरेसा अवधी हवा. शोनील मोठा झाला आहे, स्वतःचं काही मत मांडतो आहे, याचा अर्थ त्याला शिंगं फुटलो तो ऐकेनासा झाला असं नाही. तो आपले प्रश्न शब्दात मांडायला शिकतो आहे ते आम्ही समजून घ्यायला हवेत.

आपले प्रश्न शब्दात मांडता येत नाहीत म्हणून मोठेपणी किती पंचाईत करून घेतो आपण स्वतःची? मला हे आवडत नाही. मला असं वागणं जमणार नाही मी असं करणार नाही, माझ्या मनात महत्त्व या गोष्टीला आहे, मी अमुक एक ठरवलेलं आहे ते मला केलंच पाहिजे असं कधी बोलू शकतो आपण?

हे घरातही शिकवलं जात नाही आणि शाळेत तर नाहीच नाही. शिक्षण संपल्यावर आपल्या पायावर उभे राहून आपण जगात वावरू लागलो की जाणवत माणसांशी बोलावं कसं हे कधी आपल्या अभ्यासक्रमात का नव्हतं? माणसं कशी ओळखावीत? आपण दुसऱ्यासाठी किती काम करावं? दुसऱ्याकडन कोणत्या अपेक्षा कराव्यात? आपल्या सहकाऱ्यांशी कसं वागावं? कामं कशी करून घ्यावीत? रागवावं कसं? समजून कसं सांगावं? माणसाला माणस म्हणून वागवणं म्हणजे काय? अनेक प्रश्न जाणवत राहतात. त्याचबरोबर आपण इतिहासातल्या सनावळ्या पाठ केल्या त्या कुठे गेल्या? भूगोलात हजारो गावांची नावं, तिथे काय काय तयार होतं ते पाठ केलं होतं, त्याचं काय झालं? शास्त्रातली सूत्रं शिकलो होतो त्याचा काय उपयोग झाला? भूमितीतली प्रमेयं सोडवली त्यातलं एकही आज आठवत नाही. असे किती तरी विषय. मान्य आहे या विषयांनी माणसाच्या बुद्धीचे अनेक पैलू लक्षात आणून दिले. कार्यकारणभाव समजावला; पण त्यासाठी शाळेची अकरा अधिक कॉलेजची सहा वर्षं घालवायलाच हवी होतो का? अनेक विषय शिकवणं महत्त्वाचं का शिकण्याची कला शिकवणं महत्त्वाचं? मुलांच्या अभ्यासक्रमात अनेक नवनवे विषय कोंबले जात


वीस कलमांचा
हा संदेश
सर्व निरोगी,
शिक्षित देश
83/408

आहेत. दप्तरं फुगत आहेत. मुलं ओझ्यानं वाकून जात आहेत. पालक हे ओझं कमी करायच्या प्रयत्नात मुलांवरचा भार आणखीन वाढवत आहेत. वर्षानुवर्षं शिक्षणतज्ज्ञ विचार करतायत, संशोधन करतायत, परदेशी जाऊन अभ्यास करून येताहेत, तरीही काहीही बदलत नाहीय. बिघडतच चाललं आहे.

शिक्षणात, राजकारणात, समाजात मुलांना कुणी पालक नाहीत हेच खरं मुलाची काळजी घ्यायला हवी असं यांच्यातल्या कुणाला कसं वाटत नाही ?

कधीकधी वाटतं जबाबदार पालकाच्या भूमिकेची अपेक्षा कुणाकडून करायची ? इथे मोठी माणसंच मुळात मोठी होत नाही आहेत. माना हलू लागल्या तरी पैशाची, सत्तेची, प्रतिष्ठेची, मानमरातबाची, नावाची हाव सुटत नाही. ह्या माणसांनी कुणाचं पालन करावं ? कुणाचं पालक व्हावं ?

जबाबदार पालक व्हायचं म्हणजे स्वतः झिजून दुसऱ्याच्या भल्यासाठी झटावं लागतं. समाजाला असं पालकत्व हवं असतं. आजची मोठी माणसं आपल्यामागून येणाऱ्या तरुणांना आपली कामं पुढं चालवण्यासाठी तयार करत असतील, त्यात मन घालत असतील, प्रसंगी स्वतः दोन पावलं मागं रहात असतील तर समाज पुढे जातो. चागली कामं पुढं जात रहातात. चांगल्या परंपरा निर्माण होतात. हे जितकं घरात खरं आहे तितकंच समाजातही खरं आहे.

आपल्या तरुण मुलीला मागं ठेवून, स्वतः सुंदर साड्या नेसून, नटून-थटून, पाहुण्याच्या पुढे पुढे करणाऱ्या आईला काय म्हणू आपण ? नावं ठेवू, नाही का? आपापल्या कामाच्या ठिकाणी याहून वेगळं काय चालतं ? मोठ्या माणसाना लहानांची माया नाही. ठराविक वयानंतर तरुण पिढी तयार करणं ह्या आपल्या कामाचाच एक भाग आहे हे कुणाला सांगायचं ?

समाजातलं पालकत्व असं दिवसेंदिवस मरताना दिसतं आहे. यातूनच तरुणांपुढं आदर्श नाहीत, तरुण माणस मोठ्यांचा मान राखत नाहीत अशी खणाखणी सुरू होते.

तरुण माणसं वृद्धाना मान देत नाहीत. मुलं आईवडलांचं करायला तयार नसतात हे तरुणांमधलं पालकत्व संपल्याचं लक्षण आहे. पालकत्व ही काही मोठ्यांमध्येच असावी अशी भावना नव्हे. ती लहानांच्या मनातही मोठ्यांसाठी असायला हवी. आपले आई-



वडील वयस्कर झाले की, त्यांच्या शारीरिक-मानसिक शक्ती कमी होतात. आधार हवा असतो तेव्हा आपल्याला त्यांचं पालक बनावंच लागतं हेही सहजपणे घडायला हवं. निरोगी समाजात ते घडतं. मातृ-पितृऋण मानायचं म्हणजे भूतकाळाविषयी कृतज्ञता मनात ठेवायची. लहान मुलांचं पालकत्व स्वीकारण म्हणजे भविष्याची काळजी घेणं. यातून पालकत्वाची एक साखळी आपण निर्माण करत असतो. दोन पिढ्यांमधला मायेचा दुवा बनत असतो. ही साखळी कायम अखंड रहायला हवी. ती तुटून चालणार नाही. ती तुटली तर समाजातलं बाळपण एकाकी बनतं आण म्हातारपण, बाळपणसुद्धा एकाकी बनतं आणि तरुणपणाला ओढून धरणारे हे दोन दुवे तुटले की, तरुणपण स्वैर बनतं.

केवळ स्वतःच्या विकासाबद्दल–स्वातंत्र्याबद्दल जागरूक असणाऱ्या स्वयकेंद्रित व्यक्तिमत्वाबद्दल म्हणूनच मला भीती वाटते. ही वृत्ती फोफावली, माणसं भूतकाळ–भविष्यकाळाचं ऋण मानेनाशी झाली तर आज आपण आपल्या ज्येष्ठांना देतो आहोत तीच वागणूक उद्या आपल्या वाट्याला येणार आहे, हे दिसू लागतं आणि मुलाकडे होणारं दुर्लक्ष पुढच्या अनेक पिढ्यांकडे केलेलं दुर्लक्ष बनणार आहे हे दुष्ट चक्रच नव्हे तर वाढत राहणारी दुष्ट साखळी आपण निर्माण करत आहोत.

मान्य आहे सर्वांवरचेच ताण वाढले आहेत. वाढत आहेत. जगणं सोपं झालं तर माणसामाणसांच्या नात्यातले ताणही कमी होतील ही आशा. माणसाना वापरून घेण्याची वृत्ती कमी होईल; पण समृद्ध देशामध्ये तरी मुलांची काळजी घेणारा, त्याना जपणारा समाज असतो का ? शेवटी काही मूल्यं ही कितीही ताणात जगावं लागलं तरी पाळायचीच असतात. मुलाची काळजी हे असं मूल्य आहे.

आपलं ज्ञान आणि आपलं जीवन यात सगळीकडे इतकी तफावत दिसते की, मुलाचे प्रश्न त्याला अपवाद कसे होतील ? मुलाला सहा महिने अंगावर पाजलच पाहिजे हे पोस्टर्स लावून जाहिराती करून सांगायचं आणि नोकरी करणाऱ्या बाईला प्रसूतीची रजा तीनच महिने. चॉकलेट खाऊ नका दात किडतात म्हणायचं आणि टी. व्ही. वर, सिनेमात, रंगीत रंगीत जाहिराती पहायच्या चॉकलेटसच्याच. कुणाला पर्वा आहे आमच्या आरोग्याची ?

गरजू मुलांना आपापल्यापरीनं सहाय्य देण्याचं काम संस्था करतायत, व्यक्ती करतायत, सरकारही करतं आहे. आपणही त्याला हातभार लावावा; पण समाजात पालकत्व निर्माण कसं होईल हा प्रश्न राहतोच

एका लहान मुलानं लिहिलेला लेख आहे. मोठी माणसं लहान मुलाना कसा त्रास देतात ते त्यानं लिहिलंय. त्यात दुकानात वस्तू आणायला गेलं की किती वेळ पैसे पुढे धरून उभं राहिल तरी दुकानदार लक्षच देत नाही, बसमध्ये चढताना मोठी माणसं आपल्याला ढकलून स्वतः पुढं चढतात. रस्त्यावर क्रिकेट खेळताना चेंडू कुणाच्या घरात गेला तर परत देत नाहीत, वाचनालयातला शिपाई कार्ड नेलं तर बघतही नाही आणि एखाद दिवशी नाही नेलं तर घर लांब असलं तरी परत पाठवतो, अशा अनेक गोष्टी लिहिल्यात. त्यात शेवटी एक लिहिलं आहे तो रस्त्यातून जात असताना कुणाचा तरी त्याला पाय लागला. तेवढ्यात डोक्यात टप्पल बसली. त्यानं वळून पाहिलं तर टप्पल मारणारा त्यालाच म्हणत होता– 'काय रे पोरा, तंगड्या लाब झाल्या का तुझ्या ? लाथा कशाला मारतोस ?' त्याला वाटलं आपणपण या माणसाला मारावं; पण त्यानं लिहिलं आहे–

'पण मारणार कसा ? तो मोठा होता आणि मारलं तरी सगळे त्याच्याच बाजूला जाणार ! माझ्या बाजूला कोण येणार ?'

आठ वर्षांच्या मुलाला सुशिक्षित शहरातल्या भर रस्त्यावरच्या गर्दीत आपल्या बाजूला कोणीही येणार नाही हा विश्वास आज आपला समाज, आपण देतो आहोत !

धन्य आपण पालक आणि धन्य ती मुलं– आपल्या देशाचे भावी आधारस्तंभ ! □

रंगभूमी

# १९८३ : काही शतकमहोत्सवी नाटके

वि. भा. देशपांडे

एखादे वर्ष संपल्यावर त्याचा आढावा किंवा जमाखर्च निरनिराळ्या स्तरांवर घेता येतो. रंगभूमीच्या संदर्भात गतवर्षाचा विचार करायचा तर तोही दोन-तीन पद्धतींनी करता येईल. एक तर एकूण नवीन आलेली नाटके, जुन्या नाटकांचे पुनरागमन, दुसरे म्हणजे प्रत्येक नाटकाचे वाङ्मयीन आणि प्रायोगिक मूल्य यांचा विचार, तिसरे म्हणजे कोणती नाटके या वर्षात प्रेक्षकांना अधिकतेने भावली त्याची मीमांसा आदी. तूर्त तिसऱ्या प्रकाराचा विचार अपेक्षित आहे.

१९८३ या वर्षात सुमारे ४५ नाटके नव्याने रंगभूमीवर आली. कानेटकर, तेंडुलकर, मतकरी यांची नाटके यामध्ये तर होतीच पण; अगदी प्रथमच नाटयलेखन करणाऱ्या सुभाष भेंडे यांचेही नाटक होते. यात ज्या नाटकांनी शतकमहोत्सवी किंवा त्याहून अधिक प्रयोग केले त्याची दखल घेणे महत्त्वाचे आहे. केवळ प्रयोगसंख्येमुळे नव्हे तर ती नाटके जनसामान्यांना कोणत्या कारणांसाठी आवडली असतील, त्याचबरोबर आणखी दोन-तीन नाटके गुणवत्तेने चांगली असूनही ती पसंतीस का उतरली नसतील असा दुहेरी शोध घेणे महत्त्वाचा ठरेल !

ज्या नाटकानी शतकोत्तर नाटकांचे प्रयोग या वर्षी केले त्यामध्ये 'बावनखणी,' 'टूरटूर' 'गगनभेदी' आणि 'मुखवटे' याचा अंतर्भाव महत्त्वाचा आहे. 'बावनखणी' हे विद्याधर गोखले याचे संगीतनृत्यमय नाटक. सस्कृत नाटकात भाण या नाटयप्रकाराशी साम्य असलेले हे नाटक. भाणमध्ये लेखनात स्वैरता असते तशी गोखल्यानी ती वापरली. पण हे नाटक लेखकनाच्या संदर्भात इतके पसरट आणि शब्दबंबाळ करून टाकले की, ते नाटक आहे तसे वाचणे किंवा पाहणे हे एक सोसणेच होते. मग हे नाटक लोकांना कोणत्या कारणासाठी आवडले असेल तर त्याचे उत्तर प्रयोगनिर्मितीत आहे. ते असे की, भालचंद्र पेंढारकरांनी या प्रयोगाची निर्मितिमूल्ये उच्च श्रेणीची राखली. द. ग. गोडसे यांचे नेपथ्य हे जसे त्याला कारणी ठरले तसेच माया जाधवची नृत्ये, एकूणच तिचे नृत्यदिग्दर्शन, फैय्याज आणि नयना आपटे ह्या दोघीचे सुरेल गायन आदी गोष्टींची प्रेक्षकांना मोहिनी पडली. त्यात वावगे काहीच नव्हते. म्हणजे नृत्य, संगीत, नेपथ्य आदी गोष्टी समाधानकारक असल्या तर प्रेक्षक मूळ सहितेतल्या अनेक त्रासदायक गोष्टींकडे दुर्लक्ष करतो. हे नाटक आवडणारा प्रेक्षक प्रामुख्याने संगीत नाटकाचा प्रेक्षक आहे. त्याला तृप्त करणारे सगीत नाटक अलिकडच्या काळात रंगभूमीवर आलेले नाही. स्वाभाविकच सर्व दोष स्वीकारून संगीतरंजनासाठी या प्रेक्षकाने या नाटकाचे स्वागत मोठ्या प्रमाणात केले !

मराठी प्रेक्षकाला संगीत नाटक किंवा नाटकातले संगीत आवडते तसेच त्याच्या बरोबरीने विनोदही मोठ्या प्रमाणात आवडतो. पुरुषोत्तम बेर्डे याचे 'टूरटूर' हे नाटक याचमुळे लोकांना आवडले असे वाटते. अर्थात हे एक मुक्त नाटय आहे. त्यात विनोद, संगीत आणि त्याला पूरक असे एक कथासूत्र घेऊन तमाशा किंवा वगनाटयाच्या दिशेने पण आधुनिक बाजाने हे नाटक पेश झाले. लेखनापासून सर्व कलाकाराच्या गुणाचा ताजेपणा हा जसा प्रयोगाच्या यशाला कारणी ठरला तसाच या नाटयसघाने प्रयोगाची केलेली जाहिरात लक्षवेधी ठरली. जाहिरातीतील शब्दयोजनेमुळे प्रेक्षकाचे मन चाळवले गेले आणि पाहू या तरी काय गम्मत आहे, अशा हिशेबाने प्रयोगाला प्रतिसाद मिळत गेला. हे सारे कलाकार व्यावसायिक नाहीत. यामध्ये हौशी आणि व्यावसायिक असे मिश्रण होते; पण प्रयोगाची सफाई मात्र कलात्मकतेचे भान राखून व्यावसायिक गुणवत्तेची होती. 'टूरटूर' आवडणे याचा आणखी एक चांगला अर्थ आहे, तो म्हणजे हौशी, निम्न व्यावसायिक अशा नव्या दमाच्या कलाकारांना उत्साह वाटायला लावणारा आहे. आपल्या वाटेने जाऊनही प्रेक्षकांपर्यंत आपण पोहोचू शकतो हा आत्मविश्वास अशी नाटके निर्माण करीत असतात.

अशीच आपली वाट न सोडता विशिष्ट प्रेक्षकाला आपले नाटक आवडायला लावण्याचा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न अमोल पालेकरानी 'मुखवटा' नाटकाच्या निमित्ताने केला. या नाटकाचे शंभरावर प्रयोग होऊन अधूनमधून अद्यापही प्रयोग चालू आहेत. वास्तविक हे नाटक तसे नवे नाही आपल्यापैकी अनेकांना माहीत आहे की, हिंदी आणि मराठी भाषांमध्ये 'आधेअधुरे' ह्या नाटकाचे प्रयोग यापूर्वी झालेले आहेत. सत्यदेव दुबेने केलेला हिंदी प्रयोग तर अनेकांच्या स्मरणात आहे त्यात अमोल मुलाच्या भूमिकेत होता. नंतर डॉ. श्रीराम लागूंनी मराठीत हा प्रयोग केला होता. अमोलने केवळ 'आधेअधुरे' या नाटकाचे 'मुखवटे' नाव बदलले एवढ्यापुरताच वेगळेपणा केला नाही तर या नाटकाची एकूण संकल्पना आणि निर्मिती सर्वांसमोर नव्याने मांडली. सहितेत थोडेफार बदल केले आणि मुख्य म्हणजे संपूर्ण निर्मितीची संकल्पना स्वत:च साकार केली. नेपथ्य, प्रकाशयोजना, दिग्दर्शन आणि महत्त्वाच्या चार भूमिका त्याने स्वीकारून स्वत:च्या नाटकाच्या प्रवासातला एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. स्वत:ची चित्रपटातली प्रतिमा त्याने यासाठी खर्ची घातली नाही. केवळ त्या कारणासाठी येणारा प्रेक्षक काही प्रमाणात होताही; पण अशा प्रेक्षकाचे कुतूहल काही वेळापुरतेच असते. तो नाटक पाहण्यात विशेष लक्ष घालीत नाही. कारण त्याचा हेतूच वेगळा असतो. या नाटकाच्या वेळी मात्र वेगळा अनुभव आला. जो प्रेक्षक अमोलला पाहण्यासाठी म्हणून आला तो पुढे नाटकात गुतून राहिला. त्याने अमोलचे अतिशय गंभीर आशयाचे नाटक तितक्याच गांभीर्याने पाहिले. हा अनुभव केवळ पुणे-मुबईपुरताच आला नाही तर अगदी

कोपरगाव, कोल्हापूर अशा आणखी वेगवेगळ्या गावी आला. (यातल्या कोल्हापूर–बेळगाव दौऱ्यात काही काळ मी बरोबर होतो. प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया टिपत होतो.) अमोलच्या बरोबरीनेच भारती आचरेकर या गुणी कलवतीचेही कौतुक प्रेक्षकानी मोठ्या प्रमाणात केले.

'गगनभेदी' हे आणखी एक शतकमहोत्सवी नाटक. वास्तविक हे नाटक रंगभूमीवर आले ते १९८२ मध्ये; परंतु याचे शतकी प्रयोग घडले १९८३ या वर्षात. या नाटकात संगीत, विनोद असे काही नसूनही हे नाटक प्रेक्षकांना आवडले आणि आजही त्याचे प्रयोग मोठ्या प्रमाणात चालू आहेत. कानेटकराचे लेखन, मधुकर तोरडमलांचे दिग्दर्शन आणि मध्यवर्ती भूमिकांचा अभिनय (आता यशवत दत्त) तसेच चंद्रलेखाच्या मोहन वाघांची दिमाखदार नाट्यनिर्मिती ह्या आणि अशाच काही कारणांनी हा प्रयोग आवडत गेला. एका बाजूने अनेकांनी कानेटकरांच्या नाट्यसंहितेवर जोरदार झोड उठवली होती. विशेषत: शेक्सपिअरच्या चार महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा (हॅम्लेट, इयागो, ऑथेल्लो, लियर) कानेटकरानी एकाच नाटकात आणण्याचा अट्टाहास केला त्यावर खूप लिहिले आणि बोलले गेले. त्या त्रुटी अनेकाच्या विशेषत: संबधितांच्या तर नक्कीच ध्यानात आल्या आहेत; पण ही सारी टीकाचर्चा एका बाजूला आणि प्रयोगाचे जोरदार स्वागत एका बाजूला असे या नाटकाचे चित्र निर्माण झाले. याचा एकच अर्थ करता येतो की, काही नाटकाबाबत होणारी चर्चा–टीका गृहीत धरून किंवा दुर्लक्षित करून प्रेक्षक हे नाटक पाहात राहिले.

ह्या चारही नाटकांतील उण्याअधिक गोष्टी गृहीत धरून प्रेक्षकांना ही नाटके मोठ्या प्रमाणात आवडली हे प्रयोगसंख्येवरून सिद्धच झाले आहे. यावरून एवढेच म्हणता येते की, मराठी प्रेक्षकाची अभिरुची भिन्नस्तरीय तर आहेच; पण या अभिरुचीचा अदाज नेमका लागत नाही. कारण याच प्रेक्षकाने तेंडुलकरांचे 'कन्यादान', रत्नाकर मतकरीचे 'खोल खोल पाणी' मोठ्या प्रमाणात का स्वीकारले नाही हा प्रश्न राहतोच. 'खोल खोल पाणी' चे आता नाट्यावलोकन दूरदर्शनवरून झाले आहे.त्याने काही फरक पडतो का ते पाहायचे ! ☐

# नाट्यपंढरी....

## ☐ भीम आणि भीम

कृष्णाजी प्रभाकर तथा काकासाहेब खाडिलकराचे 'कीचकवध' महाराष्ट्र नाटक मंडळीच्या रंगभूमीवर आले. त्यात नटश्रेष्ठ गणपतराव भागवतांच्या कीचकाबरोबर नटवर्य त्र्यंबकराव प्रधानाचा भीमही मोठा सुरेख होई. गौरवर्ण, बोलके डोळे, भरदार पैलवानी देहयष्टी, ठणठणीत आवाज भीमाच्या भूमिकेला अगदी हवे तसेच प्रधान होते. अभिनयाची जाण उत्तम. भीमाच्या भूमिकेसारखाच त्याचा रामशास्त्री (भाऊबदकी) खूप गाजला होता.

एकदा काय झाले की, श्रीमंत शाहूमहाराज आपल्या परिवारासह विंगमध्ये 'कीचकवध' पहायला बसले होते. नेहमीसारखीच प्रयोगाची रगत चढती होती. तिसऱ्या अकातला वल्लभ–सैरंध्रीचा दुसरा प्रवेश टिपेला पोचला होता. विशेषत: कंकभट (धर्म) निघून गेल्यावर सैरंध्री–वल्लभ (भीम) यांच्यातल्या प्रवेशात, काकासाहेबांची वीरवाणी (लेखणी) भीमाच्या तोंडून नुसती आग ओकते. 'भर रस्त्यावर सर्वांदेखत त्याला (कीचकाला) रथातून ओढून काढून लाथ मारून ठार करीन ... कौरवांच्या रक्ताने भिजलेल्या माझ्या हातांनी तुझी वेणी घालण्याची प्रतिज्ञा कधीही खोटी व्हायची नाही...तू नुसता हुकूम कर या क्षणी कीचकाला नाहीसा करतो!' इत्यादी भीमाचे भाषण–नि–अभिनय, प्राण ओतून प्रधान रंगवीत होते. सैरंध्री त्याची समजूत घालून त्याला ढोलीत लपून रहा म्हणून सांगत विंगमध्ये कसे तरी ढकलते. क्रोधाने भडकलेला भीम–प्रधान आत आले, ते थरथर कापत नि धापा टाकीतच ! त्यांना मोठ्या प्रेमाने जवळ घेऊन शाहूमहाराज म्हणाले, 'शाब्बास रे भीमा, मोठे झाक काम केलेस पन दमलास व्हय ?' असे म्हणत त्याची मोठ्या कौतुकाने पाठ थोपटली.

अभिनयश्रेष्ठ केशवराव दाते यांनी ही सुखदस्मृति मोठ्या कौतुकाने नि थोड्या मिस्किलपणे नोंदली आहे. महाराष्ट्र नाटक मंडळीत, प्रधान खूपच धिप्पाड असल्याने मोठे मल्लच वाटत; पण त्याक्षणी ते शाहूमहाराजांजवळ उभे असताना, त्यांच्या बगलेपर्यंतसुद्धा पोचत नव्हते, इतके लहान दिसत होते. सहाजिकच आम्हा महाराष्ट्र कंपनीच्या नटवर्गाचा गर्व नाहीसा झाला ! ☐


## ☐ कुस्त्यांचा पंच

कीचकवधाच्या रूपाने, काकासाहेब खाडिलकरांच्या समर्थ लेखणीने, त्या वेळेच्या हिंदुस्थानातल्या (१९०७–८ चा काल) ब्रिटिश राजवटीचे–कर्झनशाहीचे–चित्र हुबेहुब उभे केले. इतके सुदर रूपकात्मक नाटक दुसरे नाही. त्यातल्या मदोन्मत्त, अहंकारी कीचकाची भूमिका भागवत अशी करीत की त्याच्या एंट्रिलाच, प्रेक्षकांना कीचकातला कर्झन दिसे. विराटपर्वातल्या कीचकाच्या व्यक्तिमत्त्वाला रतिमात्र न दुखवता खाडिलकरांनी कर्झन उभा केला आहे– ही त्यांच्या लेखणीची जादू ! काही प्रयोग झाल्यावर या नाटकावर सरकारने बंदी घातली कीचकवध मागे पडले; पण 'महाराष्ट्रा' च्या नटमंडळीच्या डोक्यातून ते नाटक गेले नव्हते. १९११ साली भागवत वारले. १९२४–२५ च्या सुमारास महाराष्ट्र नाटक मंडळीची सूत्रे दात्यांच्या हातात असताना त्या नाटकावरची बंदी उठवली गेली. दात्यानी पुन्हा कीचकवध रंगभूमीवर आणले. या वेळी अर्थातच नटाची पहिली फळी नव्हती. गंमत अशी की पहिली सैरंध्री – आता कीचक (माधराव टिपणीस) झाली होती. रत्नप्रभा–भीम झाली होती (केशवराव दाते) दात्यानी नाटक छान बसविले होते. काकासाहेबांनी काही तालमी घेऊन हात फिरविला होताच. प्रयोग देखणा होई.

नाशिकच्या मुक्कामात कीचकवध गाजत होते ओळीने खेळ चालू होते. ज्या थिएटरात खेळ होत होते, त्याच थिएटरांत एका रविवारी कुस्त्याचा फड होता. कॉंट्रॅक्टर केशवरावाकडे आला नि त्याना कुस्तीचे पच म्हणून बोलावू लागला. केशवराव म्हणाले, 'अहो, मला कुस्तीतलं काही समजत नाही.' त्यावर तो म्हणाला, 'वा राव, रोज भीम कसा झोकात करता ? त्या कीचकाला डोळ्याचं पातं लवतं न लवत, तोच पट काढून उलटा करता !' तेव्हा केशवरावांच्या लक्षात आले की, हा आपल्या भीमाच्या भूमिकेच। पराक्रम. कारण केशवराव भीमाचे सोग उघड्या अंगाने करीत. कधीकधी पजाबी पैरण घालीत. त्याचा तो भीम पाहून कॉंट्रॅक्टरची खात्री झाली होती की, हा आखाड्यात खेळणारा गडी आहे. म्हणूनच तो आला होता केशवरावानी त्याची खूप समजूत घातली; पण तो ऐकेच ना ! अखेर केशवरावाना ते निमत्रण स्वीकारणे भागच पडले आता प्रत्यक्ष मैदानात केशवरावांनी कुस्त्याचे काय निकाल दिले ते त्याचे त्यांनाच माहीत !

MANOOS WEEKLY ( Licensed to post without perpayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW–28


# ज्यावेळी दोघेजण तुमच्यावर अवलंबून असतात त्यावेळी एकाचा विमा उतरविणे आवश्यक असते. अर्थात् तुमचा स्वतःचा !



तुमचे कुटुंब सुरक्षिततेसाठी तसेच संरक्षणासाठी सर्वस्वी तुमच्यावर अवलंबून असते. आयुर्विमा उतरवा जेणेकरून पुरेशा वित्त-संचयाचा आधार तुम्ही तुमच्या कुटुंबासाठी निर्माण करू शकाल. पॉलिसी संपूर्ण रकमेसाठी चालू असतांना केवळ एक हप्ता भरल्यानंतर दैववशात् मृत्यू घडल्यास विम्याची संपूर्ण रक्कम तुमच्या कुटुंबाला दिली जाते. अशा प्रकारचे संपूर्ण संरक्षण केवळ आयुर्विमा महामंडळच देऊ शकते. इतर कोणत्याही खाजगी बचत अथवा अमानत रक्कम योजना हे संरक्षण देऊ शकत नाहीत.

इतर योजनाहून आयुर्विम्याचे निश्चित फायदे कोणते हे तुम्हाला आयुर्विमा एजंट समजावून सांगेल. तुमच्या कुटुंबाच्या गरजानुसार योग्य पॉलिसीची निवड करण्यासाठी तो मार्गदर्शन करील. आजच त्याचा सल्ला घ्या अथवा नजिकच्या आयुर्विमा कार्यालयाशी अधिक माहितीसाठी संपर्क साधा.

सुरक्षित भविष्यासाठी आजच आयुर्विमा उतरवा.

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया**

RADEUS/LIC/14-83